सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

लातूर | शुक्रवार, १८ एप्रिल २०२५ । वर्ष ३ रे अंक ५१ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

पंजाब किंग्ज वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरु

## विचारपुष्प



हिंदू राष्ट्राच्या परम् वैभवाचे साधन म्हणून धर्माचे रक्षण करणे आणि त्यासाठी हिंदूंची विजयशाली संघटित कार्यशक्ती, अर्थात् प्रत्येक हिंदूच्या हृदयात राष्ट्राप्रति समर्पणाचे संस्कार रुजवून, त्याला सुसंस्कारित करून, त्याचे अनुशासनबद्ध संघटन निर्माण करणे होय.

- **दत्तोपंत ठेंगडी,** भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

## महत्त्वाचे

### निर्देशांकाने गाठला ७८ हजारांचा टप्पा

**मुंबई** : टॅरिफच्या मुद्यावर अमेरिका-जपानची चर्चा ही बातमी देशांतर्गत शेअर बाजारासाठी अतिशय सकारात्मक ठरली आणि निर्देशांकाने मोठी झेप घेत ७८ हजारांचा टप्पा गाठला. मुंबई बाजाराचा निर्देशांक



१५०८ अंकांनी वाढून ७८,५५३ वर बंद झाला तर निफ्टीत ४१४ अंकांची लक्षणीय वाढ नोंदविण्यात आली. निफ्टी २३,८५१ वर बंद झाला. जागतिक व्यापार युद्धात गेल्या काही दिवसात शिथिलता आल्याने बाजार सावरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यातूनच गुंतवणूकदार थोडे आश्वस्त होऊन शेअर्स खरेदी करत आहेत. याचा परिणाम म्हणून सलग चौथ्या दिवशी निर्देशांक आणि निफ्टीत वाढ झाली. या तेजीतही आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपनी विप्रोचे शेअर्स पाच टक्क्यांनी घसरले होते. जानेवारी ते मार्चच्या निराशाजनक तिमाही निकालांमुळे विप्रोच्या शेअर्समध्ये मोठी घसरण नोंदविण्यात आली.

### आम्ही बाप चोरला नाही, हृदयात पुजला : शिंदे

**मुंबई** : बाप चोरला हे रडगाणे सुरूच आहे, आम्ही बाप चोरला नसून तो कायम हृदयात पुजला आणि यापुढेही पुजत राहू. पण, तुम्ही पाप झाकण्यासाठी त्यांचा आवाज चोरला, त्यांचे विचार चोरले आणि हे विचार चोरण्याचे पाप आम्ही नाही तुम्हीही केले अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांचे जुने व्हिडीओ दाखवत उद्धव ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. प्रसार माध्यमांशी बोलताना शिंदे म्हणाले, बाळासाहेब यांनी काँग्रेससोबत जाण्याची वेळ येईल तेव्हा राजकारणातून बाहेर जाईन असे म्हटले होते. पण त्यांनी बाळासाहेबांच्या विचारांच्या विरोधात जावून निर्णय घेतला. आम्ही आज आणि उद्यादेखील बाळासाहेबांच्या विचारावरच समोर जाणार आहे. जनतेने तुम्हाला गेल्या निवडणुकीत धडा शिकवला, हे विसरू नका.

### स्वारगेट प्रकरणात ८९३ पानी आरोपपत्र दाखल

**पुणे** : राज्यभरात खळबळ माजवणाऱ्या स्वारगेट एस.टी. स्थानक बलात्कार प्रकरणी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत आरोपी दत्तात्रय गाडे याच्याविरोधात ८९३ पानांचे आरोपपत्र शिवाजीनगर येथील सत्र न्यायालयात दाखल केले आहे. ५२ दिवसांत खंडणीविरोधी पथकाने हा तपास पूर्ण करत आरोपपत्र दाखल केले आहे. हा धक्कादायक प्रकार २५ फेब्रुवारी रोजी सकाळी सहाच्या सुमारास घडला होता. परगावी जाण्यासाठी स्वारगेट एस.टी. स्थानकात आलेल्या एका तरुणीकडे आरोपी दत्ता गाडे याने स्वत:ला वाहक असल्याची बतावणी केली. त्यानंतर तरुणीला एका शिवशाही बसमध्ये नेऊन, दरवाजा बंद करून तिला जीवे मारण्याची धमकी देत दोनदा बलात्कार केला. या घटनेनंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. पोलिसांनी तत्काळ तपास सुरू करत आरोपीला अटक केली. मात्र, अद्याप आरोपीचा मोबाईल पोलिसांच्या हाती लागलेला नाही, अशी माहिती तपासातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.



# पुढील सुनावणीपर्यंत वक्फ मालमत्ता रद्द नाही





## ● केंद्र सरकारचे आश्वासन; न्यायालयाने उत्तरासाठी दिले सात दिवस ● पुढील सुनावणी ५ मे रोजी

◆ **नवी दिल्ली, १७ एप्रिल**


संसदेने पारित केलेल्या वक्फ सुधारित कायद्याच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बाय युजरसह १९९५ च्या कायद्यानुसार वक्फ मंडळाने घोषित केलेली मालमत्ता रद्द केली जाणार नाही आणि केंद्रीय वक्फ परिषद व राज्य वक्फ मंडळांमध्ये बिगरमुस्लिम सदस्यांची नियुक्ती केली जाणार नाही, असे आश्वासन केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिले. या आश्वासनाची नोंद घेत न्यायालयाने उत्तर सादर करण्यासाठी सात दिवसांचा वेळ सरकारला दिला. ५ मे रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

वक्फ मालमत्ता रद्द करणे, वक्फ बाय युझर आणि वक्फ परिषद आणि राज्य वक्फ मंडळांमध्ये बिगरमुस्लिमांची नियुक्ती या तरतुदींवर अंतरिम आदेश पारित करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रस्तावाचा केंद्र सरकारने कडाडून विरोध केला. मुख्य न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठापुढे गुरुवारी सुनावणी झाली. सात दिवसांच्या आत यावर केंद्र सरकार थोडक्यात उत्तर सादर करणार आहे. तसेच पुढील सुनावणीपर्यंत वक्फ सुधारित कायद्यातील कलम ९ आणि १४ अंतर्गत परिषद अथवा मंडळावर नियुक्ती केली जाणार नसल्याचे सॉलिसिटर जनरल यांनी न्यायालयाला सांगितले, असे खंडपीठाने म्हटले आहे.

केंद्र सरकारचे म्हणने ऐकून घेतल्याशिवाय संसदेने पारित केलेल्या कायद्याला स्थगिती देऊ नये, अशी विनंती सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी खंडपीठाला केली. तुषार यांचे म्हणणे ऐकल्यानंतर खंडपीठाने वक्फ सुधारित कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर उत्तर दाखल करण्यासाठी केंद्र सरकारला सात दिवसांचा कालावधी दिला. तसेच पुढील सुनावणी ५ मे रोजी निश्चित केली.

आजच्या सुनावणीतील महत्त्वाचे मुद्दे म्हणजे वक्फ बाय युजर आणि वक्फ परिषद आणि राज्य मंडळांवरील बिगरमुस्लिमांची नियुक्ती या कायद्यातील तरतुदींवरील हंगामी स्थगिती म्हणजे केंद्र सरकारला धक्का मानला जात आहे.

या सुनावणीत कायद्याच्या विरोधात राजीव धवन, कपिल सिब्बल, अभिषेक मनू सिंघवी, सी. यू. सिंह, राजीव शाकधर, संजय हेगडे, हझेफा अहमदी आणि शादान फरासत यांनी बाजू मांडली. तर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, राकेश द्विवेदी व रणजित कुमार यांनी कायद्याच्या बाजूने युक्तिवाद केला. ◂(वृत्तसंस्था)



### पाच याचिकांवर सुनावणी

वक्फ कायद्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात १५० पेक्षा जास्त याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मात्र, फक्त पाचच याचिका प्रातिनिधिक म्हणून स्वीकारल्या जाणार असून त्यावर सुनावणी होईल. त्यामुळे सर्व याचिकांमधून पाच याचिका म्हणून निवडून न्यायालयाला सादर करण्यावर सहमती झाली आहे.

### आपलाच विजय झाल्याचा समर्थक-विरोधकांचा दावा

आजच्या निकालावर कायद्याचे विरोधक आणि समर्थक यांनी आनंद व्यक्त केला. दोन तरतुदी वगळता उर्वरित तरतुदींवर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे तसेच कायद्याला स्थगिती दिलेली नाही. वक्फ बाय युजर आणि नोंदणी असलेल्या वक्फ मालमत्ता वगळता नोंदणी नसलेल्या वक्फ मालमत्तांविरोधात कारवाई करता येणार आहे, असे हिंदू पक्षकार विष्णू गुप्ता यांचे वकील वरुण कुमार सिन्हा यांनी म्हटले आहे. दुसरीकडे वक्फ बाय युजर आणि वक्फ परिषद आणि राज्य वक्फ मंडळ नियुक्तीसंदर्भातील निकालावर आम्ही समाधानी आहोत, असे आपचे आमदार अमानतुल्ला खान, काँग्रेस खासदार इमरान प्रतापगडी यांनी म्हटले आहे.

# राष्ट्रपतींना कोणीच निर्देश देऊ शकत नाही

◆ **नवी दिल्ली, १७ एप्रिल**

न्याय पालिकेच्या अमर्यादित अधिकारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतांना उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी कोणतीही शक्ती राष्ट्रपतींना निर्देश देऊ शकत नसल्याचे म्हटले आहे.



राज्यसभेच्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या सहाव्या तुकडीला संबोधित करतांना धनकड म्हणाले की, न्यायपालिकेचा अधिकार हा फक्त सल्ला देण्याचा आहे, सल्ला ही सहमती नाही, तर सल्ला हा फक्त सल्लाच आहे. राष्ट्रपतींना निर्देश देता येईल, असे वातावरण देशात निर्माण करता येणार नाही.

देशात राष्ट्रपतींचे पद सर्वोच्च आहे, आणि राष्ट्रपती संविधानाचे रक्षण, संरक्षण आणि बचावची शपथ घेत असतात, याकडे लक्ष वेधत धनकड म्हणाले की, अशी शपथ फक्त राष्ट्रपती आणि राष्ट्रपतींद्वारा नियुक्त राज्यपालच घेत असतात. संविधानचे रक्षण आणि संरक्षण करण्याची शपथ तिन्ही सेनादलांचे सर्वोच्च सेनापती असलेले राष्ट्रपती घेत असतात. उपराष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री, न्यायाधीश संविधानाचे पालन करण्याची शपथ घेत असतात. काही दिवसांपूर्वी न्यायालयाने राष्ट्रपतींना निर्देश दिले होते.

राष्ट्रपतींकडे विचारार्थ ज्या फाईल पाठवल्या जातात, त्यावर त्यांनी तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यायला पाहिजे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच दिले आहे.

विधानसभा वा लोकसभा निवडणूक लढवणाऱ्याला आपली संपत्ती जाहीर करावी लागते, मात्र न्यायाधीशांसाठी ते अनिवार्य नाही, असे स्पष्ट करत धनकड म्हणाले की, राष्ट्रपतींना निर्देश दिले जातील, अशी स्थिती खपवून घेता येणार नाही. घटनेच्या अनुच्छेद १४५(३ ) अंतर्गत न्याय पालिकेला संविधानाची व्याख्या करण्याचा अधिकार आहे. असा अधिकारही पाचपेक्षा जास्त न्यायमूर्तींच्या संविधानपीठाला असतो. ◂(तभा वृत्तसेवा)



वक्फ सुधारित कायद्याच्या विरोधात झालेल्या आंदोलनानंतर मुर्शिदाबाद जिल्ह्यात हिंसाचार उसळला होता. न्यायालयाच्या आदेशानंतर या भागात निमलष्करी दल तैनात करण्यात आले आहे

### हिंदीकरणाचा प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही

**मुंबई** : हिंदी ही राष्ट्रभाषा नसून देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची? तुमचे त्रिभाषेचे सूत्र सरकारी व्यवहारांपुरतेच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका. राज्यात हिंदीकरणाचा प्रयत्न कदापि यशस्वी होऊ देणार नाही अशा शब्दात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीच्या निर्णयावरून राज्य आणि केंद्र सरकारला इशारा दिला. अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्याचा प्रस्ताव आहे.

# बंगालमधील २६ हजार शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा

### नवीन भरती होईपर्यंत शिकवू शकणार

◆ **नवी दिल्ली, १७ एप्रिल**

पश्चिम बंगाल शिक्षक भरती घोटाळा प्रकरणात गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने सुमारे २६,००० बडतर्फ शिक्षकांना दिलासा दिला. न्यायालयाने म्हटले आहे की ज्या शिक्षकांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे ते नवीन निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अध्यापन सुरू ठेवू शकतात. जरी २०१६ च्या घोटाळ्याच्या प्रकरणात त्याचे नाव आले नव्हते. न्यायालयाने म्हटले, कोणत्याही निर्णयामुळे मुलांचे शिक्षण बाधित होऊ नये अशी आमची इच्छा आहे.

सरन्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले, बंगाल स्कूल सर्व्हिस कमिशन (एसएससी) ला ३१ मे पर्यंत भरती प्रक्रियेसाठी अधिसूचना जारी करावी लागेल. निवड प्रक्रिया ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करावी लागेल. बंगाल सरकार आणि एसएससीला ३१ मेपर्यंत भरतीची जाहिरात जारी करावी लागेल आणि त्याचे संपूर्ण वेळापत्रक न्यायालयात सादर करावे लागेल. जर प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण झाली नाही तर न्यायालय योग्य ती कारवाई करेल आणि दंड आकारेल.

तथापि, गट क आणि गट ड मधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कोणताही दिलासा मिळालेला नाही. यातील बहुतेक कर्मचाऱ्यांवरील आरोप सिद्ध झाले आहेत, असे न्यायालयाने म्हटले आहे. ३ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने कोलकाता उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला होता. ◂(वृत्तसंस्था)

# 'घरगुती हिंसाचार' प्रकरणी सासूलाही तक्रार करता येणार

### अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्वाळा

**अलाहाबाद, १७ एप्रिल**

सासूला सून किंवा कुटुंबातील इतर कोणत्याही सदस्याकडून त्रास दिला जात असेल. तसेच तिचा शारीरिक किंवा मानसिक छळ होत असेल तर तिला पीडित व्यक्तीच्या कक्षेत आणता येईल. घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ च्या कलम १२ अंतर्गत सासूने सुनेविरुद्ध केलेला तक्रार अर्ज कायम ठेवण्याचा अधिकार असेल, असे अलाहाबाद उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.



या प्रकरणी सून आणि तिच्या कुटुंबातील सदस्यांना समन्स बजावण्याचा सत्र न्यायालयाचा निर्णयही उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. तक्रारदार सासूने लखनौ अतिरिक्त सत्र न्यायालयात सूनेविरोधात तक्रार दाखल केली होती. तिने तक्रारीत म्हटले होते की, सून आपल्या मुलास स्वत:च्या पालकांसोबत राहण्यासाठी दबाव आणत आहे. या कारणावरून ती आपल्यासह कुटुंबातील अन्य सदस्यांशी गैरवर्तन करत आहे. वारंवार खोटे खटले दाखल करण्याची धमकीही ती देत आहे. या तक्रारीची अतिरिक्त सत्र न्यायालयाने दखल घेतली. सुनेसह तिच्या पाच नातेवाईकांना समन्स बजावला. सुनेने समन्स आदेशाला आव्हान देणारी याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

# निवडणूक सुधारणांविरोधातील याचिकांवर उत्तरासाठी केंद्राला तीन आठवड्यांची मुदत

### काँग्रेस सचिव जयराम रमेश यांची याचिका

**नवी दिल्ली, १७ एप्रिल**

१९६१ च्या निवडणूक नियमांमध्ये अलिकडेच केलेल्या सुधारणांविरुद्ध काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश आणि इतरांच्या याचिकांना उत्तर देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी निवडणूक आयोगाला आणखी तीन आठवड्यांची मुदत दिली. मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या न्यायासनाने १५ जानेवारी रोजी रमेश यांच्या याचिकेवर केंद्र आणि निवडणूक आयोगाला नोटीस बजावली होती आणि उत्तर मागितले होते. निवडणूक आयोगाकडून उपस्थित असलेले वरिष्ठ वकील मनिंदर सिंग यांनी उत्तर दाखल करण्यासाठी आणखी तीन आठवड्यांची मागणी केली. न्यायालयाने सिंग यांच्या प्रार्थनेला मान्यता दिली आणि २१ जुलैची सुनावणीसाठी तारीख निश्चित केली. रमेश यांच्याव्यतिरिक्त, श्याम लाल पाल आणि कार्यकर्त्या अंजली भारद्वाज यांनी दाखल केलेल्या अशाच दोन जनहित याचिका प्रलंबित आहेत. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि अभिषेक सिंघवी यांनी रमेश यांचे प्रतिनिधित्व केले. १९६१ च्या निवडणूक नियमांध्ये सुधारणा अत्यंत हुशारीने करण्यात आल्याचे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे आणि मतदाराची ओळख उघड होईल ,असा दावा करत सीसीटीव्ही फुटेज पाहण्यास मनाई करण्यात आली आहे. सिंघवी यांनी पूर्वी म्हटले होते की मतदानाचे पर्याय कधीही उघड केले जात नाहीत आणि सीसीटीव्ही फुटेज मते उघड करू शकत नाहीत आणि पुढील सुनावणीच्या तारखेपूर्वी निवडणूक आयोग आणि केंद्राला त्यांचे उत्तर दाखल करण्यास सांगावे अशी विनंती न्यायालयाला केली.



रमेश यांची याचिका डिसेंबरमध्ये दाखल करण्यात आली होती आणि सर्वोच्च न्यायालय निवडणूक प्रक्रियेची क्षीण होत चाललेली अखंडता पुनर्संचयित करण्यास मदत करेल, अशी आशा व्यक्त केली होती. सरकारने सीसीटीव्ही कॅमेरा आणि वेबकास्टिंग फुटेज सारख्या काही इलेक्ट्रॉनिक कागदपत्रांची सार्वजनिक तपासणी रोखण्यासाठी तसेच उमेदवारांच्या व्हिडी ओ रेकॉर्डिंगचा गैरवापर रोखण्यासाठी निवडणूक नियमात बदल केले आहेत.

# महाराष्ट्रातील दुर्मिळ 'स्टेगोडॉन हत्ती'चे जीवाश्म चंद्रपुरात!

**आज जागतिक वारसा दिन**

◆ **चंद्रपूर, १७ एप्रिल**

चंद्रपूर तालुक्यात वर्धा-पैनगंगा नदीपात्रात २५,००० ते १२,००० वर्षांदरम्यान विदर्भात विचलन करणारे आणि आज लुप्त झालेले दुर्मिळ 'स्टेगोडॉन हत्ती'चे जीवाश्म आढळले आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारची 'प्लीस्टोसीन' काळातील हत्तीची ही दुर्मिळ जीवाश्म आहेत.

डायनासोरनंतर विशालकाय प्राण्यांची जीवाश्मे पहिल्यांदाच विदर्भात सापडली आहेत. या जीवाश्मासोबतच पाषाणयुगीन अवजारेसुद्धा मिळाली असून, दुर्मिळ हत्तींचे जीवाश्मे आणि पाषाणयुगीन अवजारे एकाच ठिकाणी सापडणे हेही अतिशय महत्त्वाचे मानले जाते.





दातावरून ही लुप्त झालेल्या स्टेगोडॉन हत्तीची जिवाश्मे आहेत, असे मत अनेक परदेशी संशोधक तसेच वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिओलोजीचे निवृत्त प्राध्यापक आणि संशोधक अविनाश नंदा यांनी व्यक्त केले आहे. ते आजच्या आशियायी हत्तींचे पूर्वज होते. याच ठिकाणी 'एलेफास नामाडीकस' या लुप्त झालेल्या हत्तीसदृश्य डोकेसुद्धा आढळल्याने या हत्ती जीवाश्मांचे सविस्तर विश्लेषण करण्याची गरज संशोधक प्रा. सुरेश चोपणे यांनी अधोरेखित केली आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### अशी आहेत जीवाश्मे

सापडलेल्या जीवाश्म अवशेषात हत्तीच्या मांडीची हाडे, चर्वण करणारी दात आणि डोक्याची कवटी, छातीची हाडे अशा अवयवांचा समावेश आहे. अजून हत्तीची दोन लांब सुळे दात सापडले नसले तरी, एक तुकडा मात्र मिळाला आहे. गेल्या दोन-तीन दशकांपासून ही जीवाश्मे नदीच्या पुरामुळे वाहून गेली असल्याने महत्त्वाचे पुरावे नष्ट झाले आहेत. परंतु, अजूनही काही ठिकाणी सजीवांची जीवाश्मे जमिनीत दडलेली आहेत. सविस्तर उत्खननात ती बाहेर येवू शकतात.

### पाषाणयुगीन मानवाची अवजारे

हत्तींच्या जीवाश्मासोबत पाषाणयुगीन मानवाने बनवलेली दगडी अवजारेही सापडली आहेत. एकाच ठिकाणी ही अवजारे सापडल्यामुळे मानव हत्तींची शिकार करीत होते, हे सिद्ध होते. तर, मानवाच्या अती शिकारीमुळे हत्ती विलुप्त झाले असावे. या अवजारात हात कुऱ्हाडी आणि इतर प्रकारची अवजारे प्रा. सुरेश चोपणे यांना आढळली असून, ती त्यांनी संग्रहालयात ठेवली आहेत.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# नागपूरनंतर सोलापूरमध्येही बोगस मान्यतेचा धक्कादायक प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १७ एप्रिल-**

राज्यातील नागपूर येथील शिक्षक भरती आणि शालार्थ आयडी घोटाळा सध्या सर्वत्र चर्चेचा विषय असतानाच, सोलापूर जिल्ह्यात देखील याच धर्तीवर मोठ्या घोटाळ्याचे धागेदोरे उघडकीस येत आहेत. शिक्षक भारती सोलापूर या शासनमान्य संघटनेने वारंवार निवेदनाद्वारे हे प्रकरण उपस्थित करूनही, माध्यमिक शिक्षण विभाग आणि पुणे येथील उपसंचालक कार्यालयाने आजतागायत कोणतीही ठोस कारवाई केली नाही, असा आरोप संघटनेने केलेला आहे.



शिक्षक भारतीच्या माहितीनुसार, खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये बनावट व बोगस मान्यतांवर शिक्षकांची भरती करून त्यांना शालार्थ आयडी मिळवून देण्यात आले आहेत. यासाठी पूर्वीच्या काही शिक्षणा धिकाऱ्यांनी शासन निर्णय डावलून बोगस मान्यता दिल्याचे पुरावे संघटनेने वेळोवेळी सादर केले आहेत. सोलापूर माध्यमिक शिक्षणाधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालेल्या तसेच बदली होऊन गेलेल्या काही अधिकाऱ्यांनी त्यांच्या सेवाकाळानंतर अनेक बोगस मान्यता मोठ्या रकमा घेऊन दिलेल्या आहेत. अशा मान्यतांची नोंद व ती माध्यमिक शिक्षण विभागात नसताना देखील त्यांच्या शालार्थच्या प्रस्तावावर माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी शिफारस करून पुणे उपसंचालक कार्यालयाकडे पाठवले आहेत. यामुळे बोगस मान्यता व शालार्थ बाबतीत सोलापूर मध्ये मोठे रॅकेट सक्रिय असल्याचा शिक्षक भारतीने दावा केला आहे.

विशेष म्हणजे, काही लाभार्थ्यांनी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळवताना चुकीची माहिती दिली असून, त्यांच्या कुटुंबातील सदस्य आधीपासूनच शासकीय सेवेत असल्याचेही निदर्शनास आले आहे. खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये नोकरी मिळवताना काहीजण शिक्षक पात्रता परीक्षा घोटाळ्यातील काळ्या यादीतील उमेदवार असताना मान्यता मिळवलेल्या आहेत.

> शिक्षण व्यवस्थेतील प्रामाणिक शिक्षकांवर अन्याय होऊ नये, आणि गुणवत्ताधारक उमेदवारांना संधी मिळावी यासाठी शिक्षक भारतीचा संघर्ष सुरूच राहील. बोगस मान्यतांचे समर्थन कोणीही करू शकत नाही. या मान्यता देताना मोठा आर्थिक व्यवहार झालेला आहे. यासाठी संघटनेच्या निवेदनानुसार चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई व्हावी.
>
> **- सुजितकुमार काटमोरे,**
> जिल्हाध्यक्ष, शिक्षक भारती सोलापूर

शिक्षक भारतीच्या निवेदनाची दखल घेऊन शिक्षण आयुक्त कार्यालयाकडून बोगस मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यां विरोधात चौकशीचे आदेश दिले गेले आहेत. परंतू शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्या कार्यालयाने या आदेशाची अंमलबजावणी केली नाही. बोगस मान्यता देणाऱ्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना नेमकं वाचवतंय कोण ? याचा शोध घेणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर, शिक्षक भारतीच्या निवेदनांना दुर्लक्ष करून, ही माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहचू न देण्याचा प्रयत्न माध्यमिक शिक्षण विभागात सुरू असल्याचे शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी सांगितले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर, नागपूर येथील गाजत असलेल्या शिक्षक भरती व शालार्थ आयडी घोटाळ्याची पुनरावृत्ती सोलापूरमध्येही झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याची तातडीने सखोल चौकशी करण्याची मागणी शिक्षक भारतीने निवेदनाद्वारे थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे. नागपूर प्रमाणे सखोल चौकशी होऊन बोगस मान्यता देणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या हातात बेड्या पडणार का? याकडे सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

## महत्त्वाचे...



### भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळा; संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

भगवान परशुराम जन्मोत्सव प्रतिष्ठान या संस्थेतर्फे भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्यामित्त २९ एप्रिल रोजी भगवान परशुराम जयंती मिरवणूक त्यानंतर भगवान परशुरामांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना आणि पूजा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. हा सोहळा उत्तमामरीतीने पार पाडावा तसेच विविध कार्यक्रमाच्या समन्वयासाठी संपर्क कार्यालयाचे उद्घाटन गुरुवारी सायंकाळी डफरीन चौकातील ब्राह्मण समाजसेवा संघाच्या कार्यालयात करण्यात आले. हा उद्घाटनाचा कार्यक्रम पंचांगकर्ते मोहनराव दाते, परशुराम जन्मोत्सव प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन कुलकर्णी, जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बी.जी. कुलकर्णी, कार्याध्यक्ष बजरंग कुलकर्णी, परशुराम जन्मोत्सव सोहळा स्वागत समितीचे अध्यक्ष प्रमोद तमन्नवार, मीनाताई चाटी, डॉ. माधुरी दबडे आदींच्या हस्ते भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलनाने करण्यात आले. हे कार्यालय २९ एप्रिल पर्यंत दररोज सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत चालू राहणार आहे. रामभाऊ तळवळकर यांनी प्रास्ताविक केले. मोहनराव दाते यांनी परशुरामासंबंधी आणि त्याच्या जन्मासंबधीची माहिती दिली. नितीन कुलकर्णी आणि रमण कुलकर्णी यांनी पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. यावेळी डॉ. माधुरी दबडे, रोहिणी तडवळकर आदींनी कार्यक्रमा नियोजना संदर्भात सूचना केल्या.



### तुळजापूर येथील आरोग्य शिबीरात २१० रुग्णांची तपासणी

**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

तुळजापूर येथील आरोग्य शिबीरात २१० रुग्णांची तपासणी करण्यात आली. उप-जिल्हा रुग्णालय तुळजापूर येथे डॉ. सुवर्णा मलगोंडा यांचे मलगोंडा हॉस्पिटल, अक्कलकोट व अपेक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सोलापूर व उप-जिल्हा रुग्णालय तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने व एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत मोफत महा-आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात तुळजापूर येथील २१० नागरिकांचे ईसीजी, ब्लड शुगर, वजन व बीपी, या सर्व तपासण्या करण्यात आल्या व मोफत औषधेही देण्यात आली. डॉ. प्रथमेश मलगोंडा यांनी सुमारे ३० रुग्णांचे तपासणी केली. या मोफत आरोग्य शिबिरासाठी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दीपक चोरमुले, डॉ. घाटे, डॉ. अखिलकुमार राठोड व योजनेचे आरोग्यमित्र विकास माळवदकर आणि रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



### मिरवणुकीत हॉटेल्स, दुकाने चालू ठेवा; भीमदल संघटनेच्यावतीने निवेदन

**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव मिरवणूकीवेळेस शहरातील सर्व हॉटेल्स, दुकाने चालू ठेवण्याबाबत भीमदल संघटनेच्या वतीने पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांना भिमदल संघटनेचे संस्थापक शशिकांत कांबळे यांनी निवेदन दिले. दरवर्षीप्रमाणे सोलापूरमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त २० एप्रिल रोजी मिरवणूक निघणार आहे. दरवर्षी मिरवणूक दरम्यान सोलापूर शहरातील बरेचसे हॉटेल बंद असतात, त्यामुळे आंबेडकर अनुयायीचे खूप हाल होतात. तरी प्रशासनाने हॉटेल धारकांना हॉटेल चालू ठेवण्याबाबत आवाहन करावे असे निवेदनात नमूद आहे. यावेळी सचिन अक्कलकोटे उपस्थित होते.

# डिव्हायडर रंगवणाऱ्या व्यक्तीला वाचवण्यात तीन वाहनाचा अपघात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**



केगाव येथील घटना

डिव्हायडर रंगवणाऱ्या व्यक्तीला वाचवण्यात तीन वाहनचा विचित्र अपघात झाला. पुणे महामार्ग क्रमांक ६५ वरती केगाव दरम्यान रस्त्याच्या बाजूचे डिव्हायडर रंगवण्याचे (पांढरे पट्टे) मारण्याचे काम सुरू आहे. यामधील कामगारांनी सुरक्षितेकरिता सुरक्षा गार्ड न लावल्यामुळे आणि रंगकाम करणारा व्यक्ती रस्त्याच्या थोडसं बाजूला आल्यामुळे त्याला वाचवण्याकरिता टिपर क्र एम एच १३ डी क्यू ०५०५) चालकाने अचानक ब्रेक मारला.

एका कामगाराला वाचवण्याच्या प्रयत्नामध्ये या टिपरला पाठीमागे असलेला मालट्रक क्रमांक (एम. एच. १४ जि.यु ७७६२) येऊन धडकला. तर त्या मालकट्रूला एक प्रवासी कार क्रमांक (आर जे ११ जीबी ७५८१ )येऊन धडकल्याने तीन वाहनांचा विचित्र अपघात महामार्गावरील केगाव येथे झाला आहे. महामार्गावरील या अपघातामुळे थोडा वेळ ट्राफिक जाम झाले होते. शहरातील फौजदार तावडी पोलीस स्टेशन च्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन सदर वाहनांचा पंचनामा करत वाहतुकीला मार्ग मोकळा करून दिला.

# इनरव्हील क्लबकडून विविध संस्थांना मदतीचा हात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

इनरव्हील क्लब परिमंडळ ६ अंतर्गत १३ क्लबतर्फे मोहोळ तालुक्यातील मोरवंची येथील प्रार्थना फाउंडेशन संचलित वृध्दाश्रम आणि अनाथाश्रमाला आटाचक्की व मसाला ग्रायंडर उपलब्ध करून देण्यात आले. तसेच अन्य संस्थांनाही मदतीचा हात देण्यात आला.



इनरव्हील क्लबच्या जिल्हा ३१३ च्या जिल्हाध्यक्षा डॉ. शोभना पालेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात हे साहित्य प्रार्थना फाउंडेशनचे प्रमुख प्रसाद मोहिते आणि अनु मोहिते यांना सुपूर्द करण्यात आले. याशिवाय इनरव्हील क्लब सोलापूरतर्फे लष्कर भागातील वसंतराव नाईक प्रशालेतील विद्यार्थी तंत्रस्नेही होण्यासाठी ई-लर्निंग डिजिटल संच भेट देण्यात आले. तसेच ७ गरजू महिलांना स्वावलंबी होण्यासाठी शिलाई यंत्रांचे वाटप करण्यात आले. या समाजोपयोगी उपक्रमास डॉ. मेतन फाऊंडेशनचे सहकार्य लाभले.

तसेच इनरव्हील क्लब सोलापूर व इनरव्हील क्लब उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा येथील श्री तुळजाभवानी अनाथ, अपंग व मतिमंद मुलांच्या अनाथाश्रमालाही आटा चक्की भेट देण्यात आली. डॉ. शोभना पालेकर यांनी अध्यक्षीय भाषणात इनरव्हील क्लब परिमंडळ ६ अंतर्गत विविध १३ शाखांनी एकत्र येऊन सामाजिक उपक्रम राबविले. यातून सकारात्मक संदेश दिल्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. क्लबच्या परिमंडळ समन्वयक तथा माजी जिल्हाध्यक्षा रेखा माने यांचे मार्गदर्शन व पाठपुराव्यामुळे हे सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. क्लबच्या माजी जिल्हाध्यक्षा पद्मजा अय्यंगार, विद्यमान अध्यक्षा श्रद्धा काबरा व सचिवा दीप्ती देसाई यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.



# मंत्री नितेश राणे यांच्या विरोधात सोलापुरात आंदोलन

## राणेंना दाखविले कोंबड्याचे फोटो

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

राज्याचे मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे हे गुरूवार, दि.१७ एप्रिल २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यांचे आगमन सोलापूर विमानतळावर झाले आणि ते शहरात वाहनांद्वारे बाहेर पडताच उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी त्यांना कोंबड्याचे फोटो दाखवून घोषणाबाजी केली.

मंत्री राणे दि. १७ एप्रिल २०२५ रोजी चिपी विमानतळ, सिंधुदुर्ग येथून विमानाने सायंकाळी सोलापूरला आले होते. यावेळी त्यांच्या गाड्या सोलापूर विमानतळावरून रस्त्यावर येताच रस्त्याच्या बाजूला उभे राहून ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना कोंबडीचे फोटो दाखवित कोंबडीचोर, कोंबडीचोर अशी घोषणाबाजी केली. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे उपशहरप्रमुख संतोष घोडके यांनी जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केल्याची माहिती स्थानिक आंदोलकांनी दिली.

दरम्यान, मंत्री राणे हे सोलापूर विमानतळ येथून मोटारीने एमआयडीसी रोड, पेट्रोलपंप सोलापूर येथे मल्लिकार्जून पाटील यांच्या निवासस्थानी गेले. त्यांनी मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर येथे ५१ फुटी हनुमान मुर्तीच्या महाआरतीस उपस्थिती लावली आणि श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे स्वामी समर्थ यांचे दर्शन, सायंकाळी ६ वाजता हिंदु विराट सभा आदी कार्यक्रमांसाठी नियोजित दौऱ्याप्रमाणे मार्गस्थ झाले.



# छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्या वक्तृत्व स्पर्धेत ४५ विद्यार्थी सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्या वतीने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ४५ विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

तरुण पिढी संस्कारक्षम आणि धैर्यशील व्हावी यासाठी छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याचा आणि पराक्रमाचा इतिहास त्यांना अवगत व्हावा या उद्देशाने स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे कामकाज सुरू असल्याचे मत या केंद्राचे अध्यक्ष तथा विद्यापीठाच्या अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांनी व्यक्त केले. समाज कोणत्या दिशेने चालला आहे याचा मागोवा घेऊन भावी पिढीने आपली वाटचाल करायला हवी अशी अपेक्षा आपल्या मनोगतातून माजी आमदार विनायकरावजी पाटील यांनी व्यक्त केली. मान्यवरांच्या शुभहस्ते वक्तृत्व स्पर्धेचे उदघाट्न करण्यात आले. यावेळी मंचावर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे अध्यक्ष प्रा. सचिन गायकवाड, समन्वयक प्रा. डॉ. विकास पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, अध्यासन केंद्राचे सदस्य डॉ. नेताजी कोकाटे, डॉ. विष्णू वाघमारे, डॉ. विकास शिंदे, डॉ. अरुण सोनकांबळे यांची उपस्थिती होती.

वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय टेंभूर्णी येथील डॉ. संजय साठे आणि शिवाजी महाविद्यालय बार्शी येथील डॉ. रविकांत शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. विकास शिंदे यांनी केले तर सूत्रसंचालन सहायक कुलसचिव तथा अध्यासन केंद्राचे सचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

### डॉ. आंबेडकर जयंती अध्यक्षपदी बंगाळे

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**



स्टुडंट्स युथ असोसिएशनच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव अध्यक्षपदी शेखर बंगाळे यांची निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष गौरव पवार, कार्याध्यक्ष मनोजकुमार तम्मेवार, सचिव संदीप कांबळे, राहुल सावंत, सहसचिव चंद्रशेखर पाटील, प्रसिद्धीप्रमुख प्रविण चाफाकारंडे, खजिनदार मळगे, सहखजिनदार लक्ष्मीकांत शिवणगी यांची निवड करण्यात आली.

### आयुक्तांनी केली बस डेपोंची पाहणी

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज सात रस्ता येथील मनपा परिवाहनच्या बस डेपो, राजेंद्र चौक येथील बस डेपो,बुधवार पेठे जागेची पाहणी केली. यावेळी उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी परिवाहन विभागाची संपूर्ण माहिती आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांना दिली.यावेळी सहायक आयुक्त गिरीष पंडित, पडगानूर, गुंड आदी उपस्थित होते.

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्याचे अनुदान द्या

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

प्रधानमंत्री आवास योजना टप्पा क्रमांक दोन मधील ६३ हजार लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आले आहे. आवास योजनेसाठी एक लाख २० हजार रूपये अनुदान असुन त्या सर्व लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे १५ हजारांचे अनुदान देण्यात आले होते. यापैकी ५ हजार ५०० लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे ७० हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे.

मात्र उर्वरित ५७ हजार ५०० लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे अनुदान लाभ देण्यात आले नव्हते. त्यामुळे ग्रामीण भागातील घरकुलचे बांधकाम रखडले होते. ऊन्हाळ्यात पाणीटंचाई व बांधकाम साहित्य मध्ये झालेली वाढ यामुळे अनेक लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम थांबविले होते. त्यामुळे लाभार्थ्यांमधून दुसऱ्या टप्यातील अनुदान देण्याची मागणी होत होती.

> **बांधकाम जलद गतीने पूर्ण**
>
> दुसऱ्या टप्यातील ६३ हजार लाभार्थ्यांपैकी ५५०० लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे ७० हजार रुपये अनुदान वाटप करण्यात आले होते. उर्वरित ५७ हजार ५०० लाभार्थ्यांना दुसऱ्या टप्याचे ७० हजार रुपये अनुदान जमा करण्याचे देण्यात आले आहेत .यामुळे घरकुल बांधकाम जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.
>
> **- संदिप कोहीनकर,**
> **प्रभारी, मुख्य कार्यकारी अधिकारी**

या मागणीची दखल घेऊन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाला उर्वरित सर्व लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे ७० हजार रूपये अनुदानाचे वाटप करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे बांधकाम पूर्ण करण्यास मदत होणार आहे. अनुदान देताना संपूर्ण बांधकाम पूर्ण झाल्यानंतरच रक्कम देण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.



# लोकमंगल महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समता दिन म्हणून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अनंत शेरखाने (विद्या प्रतिष्ठान कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय) हे लाभले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन, लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे, प्रा. स्वप्नील कदम, प्रा. निशा काटे, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन अमृता माळी यांनी व आभार प्रदर्शन रोहन पवार यांनी केले.

# मिळकत कर भरण्यासाठी ऑनलाईनसह सर्व पेमेंट गेटवेची सुविधा उपलब्ध

## उपायुक्त आशिष लोकरे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

महापालिकेच्या मिळकत कराची छापील देयकांची छपाई करण्यास काही कालावधी लागणार असल्याने महानगरपालिका मिळकत कर भरण्यासाठी संकेतस्थळावर तसेच मिळकत कर भरण्याकरीता क्यू आर कोड सुविधा तसेच फोन पे, गुगल पे अशा सर्व पेमेंट गेटवेची सुविधा कार्यान्वित करण्यात आलेली आहे, अशी माहिती सोलापूर महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके दि.८ एप्रिल २०२५ रोजी ऑनलाइन पध्दतीने महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून, एसएमएस व्दारे देयकांची लिंक पुढील आठवडयामध्ये पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर छापील देयकांचेही वाटप करण्यात येणार आहेत. छापील देयकांची छपाई करण्यास काही कालावधी लागणार असल्याने महानगरपालिका मिळकत कर भरण्यासाठी www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर व ऑनलाइन पध्दतीने कर भरण्याकरीता https://smccity.solapurcorporation.org/counter receipt online.aspx ही लिंक ओपन करुन मिळकत कर भरता येईल. मिळकत कर भरण्याकरीता क्यू आर कोड सुविधा तसेच फोन पे, गुगल पे अशा सर्व पेमेंट गेटवेची सुविधा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

शहरातील मिळकतदारांनी मिळकत कराची देयक प्राप्त होण्याची वाट न पहाता लिंकव्दारे देयकातील थकबाकीसह संपूर्ण कराचे बिल ऑनलाईन पध्दतीने भरुन मनपा करावर देण्यात येत असलेल्या ६ टक्के सुटीचा लाभ घ्यावा. ऑनलाईन कर भरण्यास काही अडचण आल्यास मालमत्ता कर कार्यालयास संपर्क साधून रोखीनेही कर भरु शकता. दिनांक २५ सप्टेंबर २०२४ पूर्वी मागील संपूर्ण थकबाकीसह चालू आर्थिक वर्षातील महानगरपालिका कराची रक्कम एकरकमी भरून मिळकत कर ऑनलाईन भरल्यास ६ टक्के व रोखीने भरल्यास ५ टक्के सुटीचा लाभ घ्यावा. महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन सोलापूर महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

## उसंतवाणी
१४८२



'ईडी'ची कडक। कारवाई खास।
आवळला फास। मजबूत ॥१॥

सोनिया राहुल। अडकले त्यात।
काँग्रेसचा हात। भ्रष्टाचारी ॥२॥

पक्षाचा पेपर। त्याची मालमत्ता।
कोण खाई हप्ता। सुखनैव ॥३॥

कुटुंबाचा पक्ष। अवघे गुलाम।
करती सलाम। घराण्याला ॥४॥

कायद्याची काठी। बसता जोरात।
पडले घोरात। घराणे हे ॥५॥

सत्ता होती तेंव्हा। चाले मनमानी।
आता मानहानी। जनतेत ॥६॥

कांत म्हणे बट्टा। गांधी या नावाला।
कशाचा 'हवाला'। कोण देतो ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
१७ एप्रिल २०२५

# आपले सरकार पोर्टलवर दिरंगाईसाठी विभाग प्रमुखांना रोज एक हजाराचा दंड लावा

## मुख्यमंत्र्यांच्यांचे मुख्य सचिवांना निर्देश

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १७ एप्रिल:**

राज्य शासनाने सेवा हक्क अधिनियमांतर्गत १०२७ सेवा अधिसूचित केल्या असून त्यापैकी ५२७ सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिसूचित सेवा पोर्टलवर उपलब्ध करून द्याव्यात. यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखाला दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिवांना केल्या.

फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात विविध सामाजिक क्षेत्रांची वॉररुम बैठक पार पडली. यावेळी आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना, आपले सरकार पोर्टलवरील अधिसूचित सेवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कार्यान्वयन, अग्रीस्टॅक उपक्रम यांचा आढावा घेण्यात आला.

ते म्हणाले, '१आपले सरकार पोर्टलवर विविध विभागांच्या १३८ इंटिग्रेटेड सेवा ३१ मेपर्यंत उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसेच उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन कराव्यात. याप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन सेवा उपलब्ध करण्यास दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांवर दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावण्याची कारवाई करण्यात यावी. यासंदर्भात मुख्य सचिवांनी परिपत्रक काढावे, असे निर्देशही त्यांनी दिले. सेवा हक्क अधिनियमासंदर्भात पुढील प्रक्रिया राबविताना कोणकोणत्या नवीन सेवा अधिसूचित करता येतील, याबाबत १५ सप्टेंबरपर्यंत माहिती द्यावी.

सेवा ऑनलाईन करण्याच्या प्रक्रियेचे प्रमाणीकरण करण्याची कार्यवाही 'महाआयटी'ने करावी. एका अर्जाच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ घेता यावा यादृष्टीनेही प्रक्रियेत बदल करावा. ऑक्टोबरपर्यंत जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आपला महाराष्ट्र देशात अव्वल व्हावा यादृष्टीने प्रयत्न करावा, असे सांगून ते म्हणाले,' आदिवासी, शेतकरी, विद्यार्थी यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांना सामाजिक सुरक्षा प्रदान करतानाच त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा-लाभांच्या स्थितीची रिअल टाईम माहिती उपलब्ध होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ट्रॅकिंग प्रणाली आणखी मजबूत करण्यावर भर द्या, असे निर्देश दिले. ते म्हणाले,' प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत येणारी सर्व उद्दिष्ट्ये वर्ष २०२६ अखेर पूर्ण करावीत. आदिवासी भागातील मोबाईल मेडिकल युनिटचे जिओटॅगिंग करावे, घरोघरी नळ योजनेसाठी ग्रामसभेचा ठराव घ्यावा. पूर्ण झालेली बहुद्देशीय केंद्रे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करा. आदिवासी बांधवांना पक्की घरे बांधून देण्याच्या कामाला गती द्या. जमीन अधिग्रहणासाठी आदिवासी विकास विभागाने विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करून देऊन उर्वरित रस्ते पूर्ण करून घ्यावेत. नाशिक, नंदुरबार, पालघर, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बांधवांचे दावे लवकरात लवकर निकाली काढून त्यांच्या नावावर ७/१२ करून देण्यात यावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

### मेडिकल कॉलेजच्या भविष्यातील विस्तारासाठी २० एकर जागा राखीव ठेवा

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या कार्यान्वयनाचा आढावा घेतला. या महाविद्यालयांच्या उभारणीला गती देण्यासाठी त्यातील अडचणी तातडीने सोडविण्याच्या संबंधितांना सूचना केल्या. अंबरनाथ, वर्धा, पालघर येथील महाविद्यालयांसाठी जागा निश्चित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. भविष्याचा विचार करूनच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची उभारणी केली पाहिजे. महाविद्यालयांना जागा उपलब्ध करून देताना भविष्यात विस्तारासाठी किमान २० एकर जागा राखीव ठेवावी. नवीन महाविद्यालयांसाठी १४८९ पदांची मागणी करण्यात आली असून त्यापैकी ३०० पेक्षा जास्त पदे अजूनही भरली गेली नाहीत. त्यामुळे एमपीएससीमधून तांत्रिक पदे वगळण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीसमोर आणावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

### ॲग्रीस्टॅक'च्या अद्ययावतीकरण आणि वापराबाबत यंत्रणा उभारा

'ॲग्रीस्टॅक'च्या नोंदणीत देशात तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या महाराष्ट्राला 'शेतकरी ओळखपत्र नोंदणी'त पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी नोंदणीची प्रक्रिया गतिमान पद्धतीने राबवावी. शेतकऱ्यांची नोंदणी, हंगामी पिकांची माहिती, ई-पिक पाहणी, गाव नकाशांची माहिती उपलब्ध करताना अचुकता व गुणवत्तेवर भर द्यावा. ॲग्रीस्टॅकच्या अद्ययावतीकरण आणि वापराबाबत यंत्रणा उभारावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. 'ॲग्रीस्टॅक' उपक्रमांतर्गत १ कोटी १९ लाख शेतकरी ओळखपत्र नोंदणीचे उद्दिष्ट असून आतापर्यंत ९२ लाख ३५ हजार शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. कृषी गणना २०२१-२२ नुसार १ कोटी ७१ लाख १० हजार ६९७ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येत असून त्यापैकी ७८ लाख ७५ हजार ४७७ शेतकऱ्यांची नोंदणीही ठराविक कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावा, असे सांगितले.

# १०० दिवसांच्या केलेल्या कामाची 'पीपीटी' विभागीय आयुक्तांकडे सादर

## उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेप्रमाणे राज्याच्या सर्वांगिण प्रगतीसाठी १०० दिवसांचा आराखडा तयार करण्यात आला होता. या आराखड्यात लोक केंद्रीत योजना, तंत्रज्ञानाच्या उपयोगाने सहजतेने नागरिकांना लाभ मिळणाऱ्या योजनांचे ध्येय धोरण ठरविले होते. या आराखड्यातून सोलापूर येथील प्रत्येक विभागांनी ठोस कामगिरी बजावली असून, याबाबतची पीपीटी (कामाचा आराखडा) विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे आज (दि. १७) पाठविण्यात आली असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली.



मध्यंतरी विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी १०० दिवसांत सोलापूरकर जिल्हा प्रशासनाने केलेल्या कामाचा आढावा घेतला होता. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा प्रशासन विभागाने या सुचनांची योग्य पध्दतीने अंमलबजावणी केल्याने पुलकुंडवार यांची शाब्बासकीही मिळविली होती. दरम्यान, हा सात सुत्री कार्यक्रम जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबध्द राबविण्यात आला. सध्या या कामाची पीपीटी विभागीय स्तरावर पाठविली असून, आपल्या कामाचा स्तर विभागात उंच वाटला तर पुढील आठवड्यात उच्चस्तरीय संस्थेच्या समितीकडून या कामकाजाची पाहणी झाल्यानंतर जिल्ह्याचा राज्यातील गुणक्रम कळणार असल्याचेही नाटेकर यांनी सांगितले.

या उपक्रमांतर्गत जिल्हाभरातील कर्मचारी-अधिकाऱ्यांनी काम जोरात केले आहे. या कार्यक्रमातून सर्वसामान्यांचा शासकीय कार्यालयाकडे पाहण्याचा पूर्वीचा नकारात्मक दृष्टिकोन बदलून सकारात्मक दृष्टिकोन केला आहे. तसेच या कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर सोलापूर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक आला पाहिजे, असे आवाहन विभागीय आयुक्त पुलकुंडवार नुकतेच केले होते. त्या ध्येयाने सर्व विभागप्रमुखांनी काम केले आहे. या अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाचा पोट खराबा जमीन तसेच बिगर शेती असलेल्या जमिनीसाठी सनद वाटप कार्यक्रम हा अत्यंत चांगला झाला असून, राज्यातील इतर जिल्ह्यापेक्षा वेगळा व लोकांसाठी खूप महत्त्वपूर्ण केला आहे. अभिलेखासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करून त्या अनुषंगाने अभिलेखाचे निंदनीकरण व सुसूत्रीकरण केले आहे. इतकेच नाहीतर मुदतबाह्य अभिलेखे नष्ट केले आहेत. यामुळे कामात अत्यंत सुसुत्रता आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न आमच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केला आहे. आता विभागीय स्तरावरील निकालानंतरच पुढील दिशा ठरणार आहे.

# मेव्हणीकडे शरीर सुखाची मागणी; भाऊजीविरूध्द गुन्हा

**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

९ वर्षापूर्वी दुधात झोपेच्या गोळ्या घालून मेव्हणीवर अत्याचार केल्याचा व्हिडीओ दाखवून ब्लॅकमेल करून शरीर सुखाची मागणी करणा-या भावजीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

सुनील चौगले (रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. यातील आरोपी याने सन २०१६ मध्ये त्याच्या मेव्हणीला दुध प्यायला दिले होते. त्यात त्याने झोपेच्या गोळ्या घातल्या होत्या. यानंतर आरोपीने मेव्हणीवर अत्याचार करून त्याचा व्हिडीओ तयार केला. यानंतर तो व्हिडीओ तिच्या पतीला दाखवितो म्हणून अनेकवेळा अत्याचार केला. दरम्यान १४ एप्रिल रोजी रात्री आरोपीने ब्लॅकमेल करून पुन्हा फिर्यादीकडे शरीरसुखाची मागणी केली. त्यावर मेव्हणीने नकार देताच तिला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने खाली पाडून गळा दाबला. या गुन्ह्याचा तपास पोलीस करत आहेत.

# दिग्दर्शक महेश मांजरेकर यांना व्ही.शांताराम पुरस्कार जाहीर

## अनुपम खेर, काजोल यांना स्व.राज कपूर जीवन गौरव जाहीर; राज्य सरकारच्या पुरस्काराची घोषणा



**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि.१७ एप्रिल-**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या मानाच्या व्ही.शांताराम जीवन गौरव, चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान, स्व.राज कपूर जीवन गौरव, स्व.राज कपूर विशेष योगदान तसेच गानसम्राज्ञी लता मंगेशकर या पुरस्कार गुरुवारी जाहीर करण्यात आले.

यंदाच्या वर्षी हे पुरस्कार महेश मांजरेकर, मुक्ता बर्वे अनुपम खेर काजोल देवगन हे कलाकार व जेष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना गौरविण्यात येणार आहे.

२५ एप्रिलला सायंकाळी वरळी येथील एनएससीआय डोम येथे हा सोहळा होणार आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी आज केली. पत्रकार परिषद घेऊन पुरस्कारांची घोषणा केली. या वर्षीचा चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार नामवंत अभिनेता, दिग्दर्शक व निर्माते महेश मांजरेकर जाहीर झाला आहे. १० लाख रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे त्याचे स्वरूप आहे. व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना प्रदान केला जात असून ६ लाख, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे स्वरूप आहे. हिंदी चित्रपट सृष्टीतील मानाच्या स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार प्रख्यात अभिनेते अनुपम खेर यांना मिळत असून स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री काजोल देवगण यांना मिळणार आहे. या दोन्ही पुरस्कारांचे अनुक्रमे १० व ६ लाख रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र असे स्वरूप आहे. १९९३ पासून देण्यात येणारा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यावर्षी मराठीतील ज्येष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. १० लाख रोख, मानचिन्ह, मानपत्र व शाल यांसह दिला जातो. या सोहळ्याशिवाय, संविधान अमृत महोत्सव आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने २० एप्रिलला सायंकाळी ६:३० वाजता गेटवे ऑफ इंडिया येथे एक खास सांगीतिक मानवंदना कार्यक्रम होणार आहे.

यावेळी जेष्ठ सुरेश वाडकर, आदर्श शिंदे, वैशाली सामंत, उर्मिला धनगर, नंदेश उमक आदी कलाकार सहभागी होणार असून, संचालन सुबोध भावे करणार आहेत. कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीतं, नाट्यप्रवेश व नृत्य सादर केले जातील. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

# उत्तर तहसिल कार्यालयाच्या वतीने भरली फेरफारांची शाळा

▸ १५२ शेतकरी बांधवांनी घेतला लाभ ▸ अनेक शेतकऱ्यांनी केले उपक्रमाचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी कार्यालय व सर्व तलाठी सजामध्ये फेरफारांची शाळा हा नाविन्यपुर्ण उपक्रम दर गुरूवारी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने (दि. १७) रोजीही या शाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक शेतकऱ्यांनी उपस्थिती लावली आणि या उपक्रमाचे कौतुकही केले. दरम्यान, या कार्यक्रमात जवळपास १५२ शेतकऱ्यांनी आपला फेरफारही काढून घेतला.



दरम्यान, एखाद्या गुरूवारी शासकीय सुट्टी असल्यास सदरचा फेरफारांची शाळा उपक्रम लगतच्या कार्यालयीन दिवशी राबविण्यात येणार आहे. मंडलाधिकारी आणि तलाठी बांधवांनी आज ज्या-त्या सज्जावर शेतकऱ्यांना फेरफार दिल्याने त्यांचा तहसील कार्यालयाकडील प्रवास आणि आर्थिक ताणही कमी झाल्याने शेतकरी बांधवांनी या उपक्रमाचे कौतुकच केले. सदरचा उपक्रम हा अतिशय महत्वाकांक्षी उपक्रम असून, या कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना वेळेत सुविधा पुरविणे हा याचा मुख्य उद्देश असल्याची माहिती तहसीलदार निलेश पाटील यांनी दिली. तरी सर्व शेतकरी बंधुंनी दर गुरूवारी आपल्या प्रलंबित अनोंदणीकृत, नोंदणीकृत फेरफार नोंदीच्या निर्गतीकरीता संबंधित मंडळ अधिकारी किंवा ग्राम महसूल अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून सदरचे कामकाज पुर्ण करून घ्यावे, असे आवाहन तहसिलदार निलेश पाटील यांनी केले आहे.

# एटीएम कार्ड बदलून देऊन वृध्दाची ४३ हजारांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

एटीएम मशिनमध्ये मशीनमध्ये अडकलेले कार्ड काढून देण्याच्या बहाण्याने वयोवृद्ध व्यक्तीच्या खात्यावरून ४३ हजार रुपये काढून फसवणूक केली आहे. ही घटना १० एप्रिल रोजी सव्वा अकराच्या सुमारास सात रस्ता येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेच्या एमटीएममध्ये घडली.

याबाबत विश्वनाथ धोडींबा खेत्रे (वय ६४, रा. दोन नं. झोपडपट्टी विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन अज्ञात इसम विरुध्द सदर बझार पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. विश्वनाथ खेत्रे हे सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. १० एप्रिल रोजी सकाळी सव्वा अकराच्या सुमारास पेंशन काढण्यासाठी सात रस्ता येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेत गेले होते. मात्र बँक बंद होती. बँक बंद असल्याने एटीएम मध्ये गेले होते. तेव्हा एटीएम मधून पैसे काढत असताना एटीएममध्ये पेंशन कार्ड आडकले. पैसे निघाले नाहीत. त्यावेळी आरोपी सदर ठिकाणी होते,दोघांपैकी एकाने मशीन कार्ड काढून देतो.असे म्हणाला,त्यावेही विश्वनाथ खेत्रे हे बाजूला सरकले. दुसऱ्याने वयोवृद्ध फिर्यादीस बोलण्यात गुंतवून ठेवले. त्यावेळी लक्ष विचलित करून खात्यावरील ४३ हजार ३०० रुपयांची रक्कम वेळोवेळी काढून घेत फसवणूक केली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस अंमलदार चव्हाण हे करीत आहेत.




# अवैध कत्तलखाने केले सील; प्रशासनाची मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

शास्त्री नगर दक्षिण सदर बजारमध्ये ३ अनधिकृत कत्तलखान्यात छापा मारून सिल केले आहेत.

आयुक्त सचिन ओंम्बासे यांच्या आदेशावरून सदर बजार पोलिस आयवळे यांच्या ५ पोलिस टीम, मंडई अधीक्षक तोडकर, सहा निरीक्षक कट्टिमनी व इतर सहकारी सोबत उपायुक्त किरणकुमार मोरे, सहा आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी पार पाडली.

महाराष्ट्र शासन प्राणी कल्याण कायदा संनियंत्रण समिती सदस्याकडून आव्हान करण्यात येतड आहे की शहरात कोठेही अनधिकृतरित्या कत्तलखाने व गोमातेची हत्या चालू असेल तर त्याचे फोटो, व्हिडिओ रेकॉर्डिंग करुन लोकेशन महापालिका मंडई अधीक्षक किंवा पोलीस कट्रोल रूमवर कळवावे. त्यांच्यावर त्वरित योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच अन्न व प्रशासन विभागातर्फे मास व मच्छी दुकानासाठीचा परवाना दिला जातो. परंतु जिल्ह्यामध्ये हजारोच्या संख्येत विनापरवाना दुकाने अनेक भागात राजरोस सुरू असून दुकानाच्या मागील बाजूस बकरे व कोंबड्या उघड्यावर गटारी व उकरड्या शेजारीच कापले जातात व तेच मास उघड्यावर विक्री केली जाते. त्यामुळे अश्या अनधिकृत व बेकायदेशीर दुकानावर अन्न व प्रशासन विभागाने पोलिसांची मदत घेऊन कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अन्यथा पुन्हा बर्डफ्लू सारखे संसर्गजन्य रोग प्रसरू शकतील.

मृत प्राणी व पक्षी यांच्या करिता विद्युत दाहिनी तयार असून ती अद्याप कार्यान्वीत का होत नाही. मागील ३ वर्षापासून प्राणी क्लेश प्रतिबंधीत समितीचे गठन पशु उपायुक्त हे करत नाहीत त्यामुळे या सगळ्या गोष्टीवर कोणाचेच नियंत्रण राहत नाही. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार व्हावा, ही पशु-पक्षी व प्राणी प्रेमींची अपेक्षा आहे.

# मेट्रो मार्ग ७ अ मधील भुयारी बोगद्याचे 'ब्रेक थ्रू' यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि. १७ एप्रिल-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) ते अंधेरी पूर्व या मेट्रो मार्ग ७ अ मधील १.६५ किलोमीटर लांबीच्या भुयारी बोगद्याचे ' ब्रेक थ्रू ' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. यावेळी मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार पराग अळवणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच कळ दाबून 'ब्रेक थ्रू' कामाला सुरुवात केली. यानंतर या कामाची पाहणी केली. हा भुयारी बोगदा मेट्रो ७ अ वर डाऊनलाईन वर आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ स्टेशन ते एअरपोर्ट कॉलनी स्टेशन दरम्यान हा बोगदा असणार आहे. ही मेट्रो जोडणे मुंबई महानगर प्रदेशातील एकूण मेट्रो जाळ्यासाठी महत्त्वाचा टप्पा असणार आहे.

या मेट्रो मार्गामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील मीरा-भाईंदर व पुढे वसई - विरार हा भाग छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत मेट्रोने जोडले जातील. तसेच ठाणे व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुद्धा मेट्रो ने जोडण्यात येईल. या मेट्रो मार्गाचे ५९ टक्के काम पूर्ण झाले आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये टीबीएम मशीन जमिनीपासून ३० मीटर खाली भूगर्भात उतरवण्यात आली.

मेट्रो मार्ग तीनच्या वरून, सहार उन्नत रस्त्यांच्या पायाखालून, मोठ्या सांडपाणी वाहिन्या व जलवाहिन्यांना क्रॉस करून विविध अडचणींवर मात करून या बोगद्याचा ब्रेक थ्रू पूर्ण करण्यात आला. या मेट्रो मार्गामुळे मुंबईकरांना कुलाबा ते वसई विरार, मीरा भाईंदर पर्यंत आरामदायी प्रवास अनुभवता येणार आहे. या मार्गामुळे मुंबई महानगर प्रदेशातील विविध मेट्रोमार्ग थेट विमानतळापर्यंत मेट्रोने जोडले जातील. मेट्रोमार्ग ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) च्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ या भूमिगत स्थानक मार्गासोबत सुलभ संलग्न करणे शक्य होईल. प्रवाशांसाठी सुरक्षित आरामदायी व सुलभ प्रवास शक्य होणार आहे. दाटीवाटीच्या नागरी परिसरातून मेट्रोसाठी उन्नत व भूमिगत मार्गाची रचना केल्यामुळे विमानतळ परिसरात मेट्रो बांधकामासाठी कमी जागा व्यापली जाणार आहे.



**मेट्रो मार्ग ७ अ विषयी.. :** या मेट्रो मार्गाची लांबी ३.४ किलोमीटर असून त्यापैकी उन्नत मार्ग ०.९४ किलोमीटर आणि भूमिगत २.५० किलोमीटर आहे. या मार्गावर दोन स्थानके असणार आहेत. एक स्थानक उन्नत मार्गावर एअरपोर्ट कॉलनी तर दुसरे स्थानक भूमिगत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे असणार आहे. उन्नत मेट्रो मार्ग ०.५७ किलोमीटर असेल दुहेरी बोगद्याची लांबी २.०३५ किलोमीटर आहे. १ सप्टेंबर २०२३ रोजी डाउनलाईन बोगद्याचे पहिले ड्राईव्ह सुरू झाले. या बोगद्याची लांबी १.६५ किलोमीटर असून लाइनिंगसाठी ११८० रिंग्स बसविण्यात आल्या आहेत. बोगद्याचा व्यास ६.३५ मीटर एवढा असून सहा भागात विशेष डिझाईन असलेल्या प्रिकास्ट रिंग वापरण्यात आल्या आहेत.



# पाणी जपून वापरा

## मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१७ एप्रिल-**

बार्शी शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या उजनी पाईपलाइनला सोमवारी कंदर गावाजवळ गळती झालेली होती. ही गळती दुरुस्त करुन काल शहरात पाणी पुरवठा सुरु करण्यात आला होता. मात्र आज दि. १६ एप्रिल रोजी कंदर हेडवर्क्स येथे महावितरणच्या कामासाठी विद्युत पुरवठा खंडित झाल्याने पुन्हा एकदा पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे.

यामुळे आज आणि उद्या बार्शी शहरातील नियमित पाणीपुरवठा होत नाही. नागरिकांच्या मागणीनुसार काही भागांमध्ये सध्या टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.दरम्यान, या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन प्रशासक तथा मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

## अग्रलेख...

# धोक्याची नवी घंटा!

दहशतवाद ही एकट्या भारताची समस्या नाही, तर उभ्या जगाला या समस्येचा धोका भेडसावत असल्याने दहशतवादाच्या विरोधात जागतिक मतैक्य निर्माण झाले पाहिजे, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वारंवार दिला आहे. भारताला सीमेपलीकडच्या आणि आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा सर्वाधिक फटका बसला असल्याने यापुढे दहशतवादी किंवा अतिरेकी कारवायांच्या विरोधात शून्य सहिष्णुता हेच भारताचे धोरण राहील, असेही केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. दहशतवादाने पोखरलेला आणि सर्वाधिक झळा सोसणारा देश म्हणून या समस्येकडे जगाचे लक्ष वेधण्यासाठी मोदी सरकारने केलेल्या प्रयत्नांची जगाने दखल घेतलीच; पण या प्रयत्नांमुळेच दहशतवादाविरोधात जागतिक मतैक्य तयार करण्यातील भारताच्या नेतृत्वाची प्रशंसाही झाली होती.

गेल्या काही वर्षांत जागतिक आर्थिक स्थिती आणि अनेक देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे दहशतवादासारख्या गंभीर समस्येकडे जगाचे काहीसे दुर्लक्ष झाले. त्यामुळे दहशतवादी कट्टरपंथीयांना कारवायांसाठी रान मोकळे मिळाले. भारताने या कारवायांच्या विरोधात कंबर कसलीच; पण संयुक्त राष्ट्रांच्या मंचावर हा मुद्दा केंद्रस्थानी आणून ती जगाच्या गळी उतरविण्यासाठीही पुढाकार घेतला. ही समस्या संपविण्यासाठी शून्य सहिष्णुता हेच धोरण योग्य ठरेल, ही भारताची भूमिका ठाम राहिली, म्हणूनच दहशतवाद्यांच्या सुरक्षित आश्रयाची भूमी मानल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया मोडून काढण्यासाठी कठोर पावले उचलून भारताने आपल्या या धोरणाचा पुरावा जगाला दाखविला. जम्मू-काश्मिरातील दहशतवादी कारवायांत सहभागी होणाऱ्यांना क्षमा नाही; त्यांना एक तर जेलची हवा खावी लागेल किंवा थेट जहन्नुमचा रस्ता दाखवावा लागेल, असा स्पष्ट इशारा केंद्र सरकारने संसदेच्या सभागृहातूनच दिला, तेव्हा दहशतवादी कारवायांना खतपाणी घालणाऱ्या सर्वांनाच भारताच्या कठोर धोरणाची धडकी भरविणारी जाणीव झाली होती. त्याआधीच्या काही दिवसांत भारताने केवळ इशारे न देता थेट कारवाई करून जवळपास ३० दहशतवाद्यांना जहन्नुमचा रस्ता दाखविलादेखील होता. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या कटाचा सूत्रधार तहव्वूर राणा यास भारतात आणून केंद्र सरकारने या धोरणाच्या पाठपुराव्याचे बळही जगाला दाखवून दिले. दहशतवादाची पाळेमुळे जेथे जेथे रुजू पाहतील, तेथे तेथे त्यांचा नायनाटच केला पाहिजे, हे धोरण जगाला पटवून देण्याची कृतिशीलता भारताने अवलंबिल्याने दहशतवादग्रस्त भारतातील कारवायांची हिंमत आता कमी झाली आहे. ब्रिटनमध्ये दहशतवादी कट्टरपंथीयांच्या कारवायांमुळे लोकशाहीपुढेच आव्हाने उभी राहिल्याची भीती गेल्या वर्षी तेव्हाचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी व्यक्त केली, तेव्हा ही समस्या ब्रिटनपुरतीच आहे, असे कदाचित अन्य देशांतील अनेकांस वाटूनही गेले असेल. या कट्टरपंथी शक्ती देश तोडणाऱ्या आणि अस्थिरता माजविणाऱ्या कारवायांत मग्न असून, या शक्तींचा सामना करण्यासाठी उभ्या देशाने संघटित झाले पाहिजे, असे आवाहन करताना, इस्लामी कट्टरपंथीयांना कठोर कारवाईचा इशारा देत त्यांनी भविष्यातील चिंतेचे भयही अधोरेखित केले होते. आज ते भय ब्रिटनला भयाणपणे भेडसावू लागले आहे. आधीही अशा अनेक कारवायांचा धुमाकूळ ज्या ब्रिटनने अनुभवला, त्यांना आता कट्टरपंथीयांच्या नव्या संकटाने घेरले आहे. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असलेल्या ब्रिटनच्या तुरुंगांवर कट्टरपंथी इस्लामी दहशतवाद्यांच्या टोळ्यांनी ताबा मिळविल्याच्या बातम्या केवळ त्या देशासमोरील संकटाचे संकेत समजून दुर्लक्षित करण्याजोग्या नाहीत. कारण, तेथील आजची ही स्थिती एका रात्रीत तयार झालेली नाही. अमेरिकेतील ११ सप्टेंबरच्या दहशतवादी हल्ल्यानंतर जगातील दहशतवादी कारवायांनी अचानक उचल खाल्ली होती. या हल्ल्यानंतर ब्रिटनमध्येही दहशतवादी कट्टरपंथीयांच्या कारवाया वाढल्या आणि अनेक दहशतवाद्यांना ब्रिटनने तुरुंगात घातले. २०२२ पर्यंत या देशातील वेगवेगळ्या तुरुंगांमध्ये दहशतवादी कारवायांशी संबंधित असलेल्या इस्लामी कट्टरपंथीयांची संख्या दीडशेहून अधिक होती. आता हे कैदी संघटित होऊन तुरुंग प्रशासनातील अधिकाऱ्यांवरच हल्ले चढवू लागले आहेत. गेल्या १२ एप्रिलला हाशीम अबीदी नावाच्या कैद्याने एचएमपी फ्रँकलँड तुरुंगात गरम तेल आणि धारदार हत्यारे घेऊन तीन तुरुंग अधिकाऱ्यांवर हल्ला केला. हा अबीदी २०१७ मधील मँचेस्टर एरिना बॉम्बस्फोटातील आरोपी आहे. त्याच्या विरोधात २२ हत्यांच्या आरोपावरून खटला सुरू आहे. त्याने या तुरुंगातील अन्य कैद्यांना धमकावून किंवा दहशत दाखवून आपली टोळी तयार केली आहे. जे कैदी त्याच्या टोळीत सहभागी होणार नाहीत, त्यांना ठार मारण्याची धमकी देऊन दहशत माजविली आहे. या हल्ल्यामुळे ब्रिटनमधील तुरुंगात दहशतवादी कट्टरपंथीयांच्या वाढत्या वर्चस्वाची गंभीर जाणीव आता ब्रिटन प्रशासनास झाली आहे आणि कट्टरपंथीयांना स्वतंत्रपणे डांबण्याच्या ब्रिटिश नीतीचा भस्मासुर आता ब्रिटनच्याच डोक्यावर हात ठेवण्यासाठी सज्ज झाल्याचे दिसत आहे. आता ब्रिटनमधील तुरुंगांच्या प्रशासनावरच इस्लामी कट्टरपंथीयांचा कब्जा प्रस्थापित झाल्याची चिंता तेथे उघडपणे व्यक्त होऊ लागली आहे. कट्टरपंथी दहशतवाद्यांकडून तुरुंगांमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या कारवाया होऊ शकतात, त्यामुळे या कैद्यांना एकत्र ठेवू नये, ही बाब तुरुंग प्रशासनाच्या ध्यानात आली नसावी की त्याकडे दुर्लक्ष केले गेले, याचा शोध दहशतवादग्रस्त ब्रिटनला नव्याने घ्यावाच लागेल. तुरुंगांवर पूर्ण ताबा प्रस्थापित झाल्याची या कट्टरपंथीयांची भावना झाली आहे, ही ब्रिटनसाठीच नव्हे, तर दहशतवादाच्या झळा पोहोचूनही या समस्येची गंभीर दखल न घेणाऱ्या सर्वांसाठीच धोक्याची पूर्वसूचना ठरणार आहे. असे काही होऊ शकते याची जाणीव तुरुंग प्रशासनास नव्हती, असेही नाही. अशा कट्टरपंथीयांनी एकत्र ठेवणे धोकादायक ठरू शकते, असा इशारा देणारा अहवाल इयान एचिसन या माजी तुरुंग अधिकाऱ्याने पूर्वीच सादर केला होता. अशा कैद्यांची तीन तुरुंगांमध्ये स्वतंत्र व्यवस्था करावी, असेही त्याने सुचविले होते. या हल्ल्यामुळे ब्रिटनमधील तुरुंग सुरक्षेचा गंभीर मुद्दा समोर आला आहे, असे एचिसन यांनी म्हटल्याचे 'द टेलिग्राफ' या वृत्तपत्राने नमूदही केले आहे. हा हल्ला म्हणजे तुरुंग प्रशासनाच्या अपयशाचा गंभीर परिणाम असल्याचा स्पष्ट आरोप मँचेस्टर हल्ल्यातून बचावलेल्या एका नागरिकाने केला आहे, तर काहीतरी गंभीर त्रुटी राहिल्या, अशी कबुली ब्रिटनच्या पंतप्रधान कार्यालयानेही दिली आहे.

दहशतवाद आणि हिंसाचारापासून मुक्ती मिळाल्याखेरीज संघटित राष्ट्रांच्या क्षमतेचादेखील पूर्ण वापर करता येणार नाही, त्यामुळे दहशतवादाच्या विरोधात जगाने एकवटले पाहिजे, असे पंतप्रधान मोदी यांनी डिसेंबर २०२० मध्ये दक्षिण आशियाई देशांच्या ३६ व्या संकल्प दिनानिमित्त पाठविलेल्या संदेशात म्हटले होते. भारताने दहशतवादाची कडू फळे भोगली आहेत, या समस्येकडे पाहण्याची भारतीयांची दृष्टी अधिक संवेदनशील आहे. ब्रिटनमध्ये तुरुंगात असतानाही इस्लामी कट्टरपंथी आपल्या हिंसक बळाच्या जोरावर एखाद्या यंत्रणेस वेठीस धरतात, तेव्हा अशा शक्तींना वेसण घालण्यासाठी राजनैतिक इच्छाशक्ती, हिंमत आणि निर्धार या बाबींचीच गरज असते, हे अधोरेखित होते. ब्रिटनमधील हल्ल्याने याची जाणीव जगाला करून दिली आहे. भारताची आग्रही भूमिका स्वीकारून संघटितपणे दहशतवादाविरोधात जागतिक स्तरावर शून्य सहनशीलता धोरण स्वीकारणे व दहशतवादास संरक्षण देणाऱ्या, दहशतवादाचे समर्थन करणाऱ्या आणि दहशतवादास खतपाणी घालणाऱ्या शक्तींना एकाकी पाडणे ही जगाची गरज ठरली आहे. गेल्या महिन्यात अमेरिकेच्या नॅशनल इंटेलिजन्सच्या डायरेक्टर तुलसी गबार्ड यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन दहशतवादाच्या समस्येवर चर्चा केली. ही केवळ भारताची नव्हे, तर जगापुढील समस्या आहे आणि दहशतवाद निपटण्यासाठी भारताकडून होणाऱ्या प्रयत्नांस अमेरिकेचे समर्थन असेल, अशी ग्वाही या भेटीनंतर त्यांनी दिली. जागतिक मतैक्य घडविण्याच्या दृष्टीने भारत सरकारच्या प्रयत्नांस मिळणाऱ्या सकारात्मक प्रतिसादाचा हा पैलू ब्रिटनमधील या हल्ल्याच्या घटनेनंतर लक्षणीय ठरतो. कट्टरपंथीयांच्या दहशतवादाच्या झळा पोहोचण्याआधी त्याच्या विरोधात संघटितपणे उभे न राहिल्यास ते संकट कोणाच्याही दारात उभे राहू शकते, याची जाणीव जगाला झाली आहे. ▌

## जीवन जिज्ञासा

प्राचार्य प्र. श्री. डोरले

# महाभारत ते भारत (१७)

मागील काही लेखांकांमधून महाभारतातील अस्त्र विद्येबद्दल, त्यांतील अणुविज्ञानाबद्दल माहिती घेण्याचा प्रयत्न केला. त्यासंदर्भात दूरध्वनीवरून अनेक जिज्ञासू, या विषयात आवड असणारे तसेच वैज्ञानिकदृष्ट्या यात काही संशोधन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक बंधू आणि संशोधन कार्यात मग्न असलेल्या विदुषींचे फोन आलेत. त्यावर सविस्तर बोलणेही झाले. त्यातून त्यांच्या जिज्ञासेतून काही महत्त्वाच्या शंका वा अपेक्षा प्रकट झाल्यात. त्याचे स्वरूप सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे आढळले -

-भारतीयांची प्राचीन अस्त्रविद्या ही अणू विज्ञानावर आधारित होती. ते ज्ञान त्यांनी कशातून साध्य केले?

-त्या ज्ञानाची महती वा उपयोजन करणारी ग्रंथ संपदा अस्तित्वात आहे काय?

-अस्त्रांचा विनियोग जर मंत्र संहितेवर आधारित असेल तर ती सारी जरी काळाच्या ओघात नष्ट झाली असे गृहीत धरले, तरी त्यातील काहींचे तरी अस्तित्व असेल की नाही? आणि

- या सर्व ज्ञानाचा, अस्त्र विनियोग करण्याचा आधारभूत घटक कोणता होता? वा कशामुळे या ज्ञानाचा विनियोग सिद्ध झाला?

वरील प्रकट झालेल्या अपेक्षांची पूर्ती करण्याचा, मी माझ्या अल्प वाचिक ज्ञानातून प्राप्त माहितीच्या आधारे या लेखांद्वारे करण्याचा प्रयत्न करीत आहे. वाचकांनी, जिज्ञासूंनी तो गोड करून घ्यावा. या लेखाने महाभारतातील अस्त्र विज्ञान हा विषयांश (टॉपिक) पूर्ण करीत आहे.

चक्रवर्ती भरताचे नावाने आपल्या देशाचे नाव 'भारत' आहे, हे ऐतिहासिक सत्य आहे. त्याला कुणीही नाकारू शकत नाही. याच देशात ऋषिमुनींच्या दिव्य तपस्येतून, साधनेतून चिरंतन सत्यावर अधिष्ठित व निसर्गनियमांवर- ज्याला आजच्या परिभाषेत आपण 'कॉस्मिक लॉज' म्हणतो- आधारित एक जीवन पद्धती निर्माण झाली. जगात ती 'हिंदू संस्कृती' या नावाने परिचित आहे. संपूर्ण जगात ती पसरली होती. हे जगातील विविध देशांमध्ये चालू असलेल्या उत्खननातून प्रकट होणारे वर्तमानकालीन सत्य आहे. या संस्कृतीचे उन्नयन आणि विकास वेदांमधील ज्ञानामुळे झाला म्हणून हिला 'वैदिक संस्कृती' याही नावाने ओळखतात. आज सहस्रावधी वैदिक शाखांमधून काळाच्या ओघात बोटावर मोजण्याइतक्याच उपलब्ध आहेत, पण आधुनिकतम (लेटेस्ट) विज्ञानाची बीजभूत संकल्पना त्यात आढळून घेतात. जिज्ञासूंगी 'न्यूक्लिअर वैदिक गॉडसब' हा संशोधन ग्रंथ वाचावा. ग्रांथिक रूपाने हा पुरावाच आहे. रामायण, महाभारत या ग्रंथांमधील युद्धसर्ग वा युद्धपर्व हे चिकित्सेने, आधुनिक विज्ञानाच्या संदर्भात वाचले तर त्यातील समान सूत्र आपल्या सहजपणाने लक्षात येऊ शकते. ही सर्व अस्त्र संपदा मंत्राधिष्ठित होती. मंत्र म्हणजे ध्वनी; ध्वनीमधून नादलहरी निर्माण होतात.

नादांमधून कंपने निर्माण होतात, ते गतियुक्त असतात. त्या गतीतील कंपनांमध्ये संघटितपणे आघात करण्याचे सामर्थ्य असते. स्थूलापेक्षा सूक्ष्मात अधिक शक्ती असते. त्यामुळे विश्वातील अणू-रेणूंचे विघटन करण्याचे, त्यांना एकत्रित करण्याचे सामर्थ्य मंत्र साधनेमुळे त्या व्यक्तीत आलेले असते. त्यातून विविध अस्त्रांची रचना आणि उपयोजना ते करू शकतात. त्यासाठी किमान एक तप साधना करावी लागेल. त्यातून मंत्रसिद्धी आणि अस्त्रसिद्धी प्राप्त होत असे. त्यामुळे या गोष्टी कपोलकल्पित व कविकल्पना नाहीत तर भारतीयांना आधुनिक विज्ञानाधिष्ठित युद्ध विज्ञानाचे, प्रगत स्वरूपाचे ज्ञान होते; याच्या या पाऊलखुणा आहेत.

महाभारतातील अस्त्र विज्ञान अधिक प्रगत स्वरूपाचे होते. सर्व अस्त्रांमध्ये 'ब्रह्मास्त्र', 'ब्रह्माशिरसास्त्र', 'नारायणास्त्र' हे अतिभयानक मारक क्षमता, संहार क्षमता असणारी अस्त्रे होती. आधुनिक काळातील हॅड्रोजन बॉम्ब, अणुबॉम्ब, परमाणू बॉम्ब हे त्याचेच रूप आहे. वरील सर्व अस्त्रांना परास्त करणारे 'पाशुपतास्त्र' होते. ते प्राप्त करण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला भगवान शिवाची आराधना करण्याचा आदेश दिला होता, तो त्याने पाळला. शिवाला प्रसन्न केले आणि पाशुपतास्त्र मिळविले. ते अर्जुनाला देताना भगवान शिवांनीच या अस्त्राचे सामर्थ्य वर्णन केले आहे. ते म्हणतात- हे अर्जुना! तुला मी हे माझे अत्यंत प्रिय असे पाशुपतास्त्र देतो आहे. महेन्द्र, यमधर्म, कुबेर, वरुण, वायू, यक्ष, किंनर, गंधर्व यांनाही हे अस्त्र माहीत नाही. मग मानवाची कथाच काय? या अस्त्राच्या प्रभावाने संपूर्ण जगाचा विनाश होऊ शकतो. या अस्त्राला सर्व त्रैलोक्यात अवध्य अशी कोणतीही शक्ती नाही. या अस्त्राचा प्रयोग केवळ धनुष्यबाणांनीच होतो असे नाही, तर नुसत्या मानसिक संकल्पाने, डोळ्यांनी, वाणीनेही याचा प्रयोग करता येऊ शकतो- मनसा, चक्षुषा वाचा धनुषाच निपातयेत - इतर अस्त्रांचे प्रक्षेपण, संधानासाठी धनुष्यबाणाचे म्हणजे 'जड' स्वरूपी माध्यमाची आवश्यकता होती. पाशुपतास्त्र हे त्यापेक्षा सूक्ष्म स्तरावर कार्यरत होणारे होते. त्यामुळे ते अधिक प्रभावी होते.

आपले विश्व हे कोट्यवधी वर्षांपूर्वी उत्पन्न झाले आहे. त्याचा उत्पत्तिक्रम आणि संहार क्रमाचे गणित भारतीय ऋषिमुनींनी लक्षावधी वर्षे आधीच मांडून ठेवले आहे. आजचे विज्ञान तेच सिद्ध करते आहे. स्टिफन हॉकिंग आधुनिक विज्ञान महर्षींचे स्पष्ट म्हणणे आहे की, 'ऑल द बॅचेस ऑफ द मॉडर्न सायन्सेस आर गोईंग टू प्रूव्ह द ओन्ली फॅक्ट, दॅट देअर इज अ वन्सेस इन द युनिव्हर्स.' भारतीय तत्त्वज्ञानाने यालाच 'पुरुष आणि प्रकृतीचे अद्वैत' म्हटले आहे. या अद्वैताचे पाच घटक भौतिक स्तरावर कार्यरत असणारे आहेत- पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश. हे पाचही घटक संख्यात्मकदृष्ट्या परस्परांशी निगडित आहेत. आबद्ध आहेत. अणूपासून उत्क्रांत मानवापर्यंत आणि मानवापासून तो ब्रह्मांड नायकापर्यंत सर्व एकरस, एकात्म (होमोजिनियस) आहे. त्यालाच तात्त्विक भाषेत 'पंचीकरण सिद्धांत' असे म्हटले. भारतीय अस्त्रविद्या ही या पंचीकरणावर आधारित आहे. संपूर्ण विश्वातील विविध पदार्थांचे नामरूपात्मक गणित, जसे 'पृथ्वी' १/२ उर्वरित आप, तेज, वायू, आकाश, प्रत्येकी १/८ तन्मात्रा = पृथ्वी - या प्रमाणे सर्व द्रव्यांमध्ये समजावे. या तन्मात्रांचे (मॉलिक्यूल्स) संघटन, विघटन, रूपांतरण आणि कॉम्बिनेशन करून संधान म्हणजे त्या त्या अस्त्राचे प्रक्षेपण केले जात असे. जसे पृथ्वी तत्त्वप्रधान अस्त्र- पर्वतास्त्र, आप तत्त्वप्रधान- पर्ज्यनास्त्र, तेज तत्त्वप्रधान- अग्निअस्त्र, वायू तत्त्वप्रधान- वायव्यास्त्र, आकाश तत्त्वप्रधान- अंतरिक्षास्त्र. कुरुक्षेत्रात ही सर्व अस्त्र वापरली गेली होती. पाशुपतास्त्राचे काम काही पडले नाही. कारण ते अधिक सूक्ष्म आणि मानसिक स्तरीय (मेंटल लेव्हल) होते.

आधुनिक काळात धृतराष्ट्री वृत्तीशी संघर्ष करण्यासाठी तर ते नियतीने राखून ठेवले नसेल ना...? ▌

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# कृत्रिम बुद्धिमत्तेची उबाठा!

उद्धवराव, तुम्ही बाळासाहेबांचे वारस, दुभंगलेल्या शिवसेनेचे प्रमुख, माजी मुख्यमंत्री वगैर वगैरे. म्हणूनच तुम्हालाच म्हणून सांगतो, बरळले किंवा जीभ सैल झाली, हे शब्द संजय राऊत सारख्यांनाच लागू होतात. पण, तुम्ही बुधवारी सायंकाळी नाशकात जे काही बोललात न ते नळावर पाणी भरणाऱ्या महिला जशा भांडतात किंवा टोमणे मारतात; तसेच काहीसे जाणवले. बाळासाहेबांचे चिरंजीव म्हणण्यापेक्षा त्यांचे (विचाराचे नव्हे) राजकीय वारसदार म्हणून न त्या भाषणात नावीन्य नव्हते. तुम्ही जे म्हणताय न की भारतीय जनता पार्टीने मुख्यमंत्रिपदाचा शब्द फिरवला म्हणून आम्हाला फारकत घ्यावी लागली. त्या क्षणापासून तुम्ही आणि (राहुल गांधीसोबत बरोबरी करणारे) चिरंजीव आदित्य कोणताही कार्यक्रम असला तरी तेवढेच बोलता! त्यात थोडा बदल झाला तो शिंदेंनी शिवसेना फोडल्यानंतर! आता तर तुम्हा बापलेकांचे भाजपा, मोदी, शाह, फडणवीस आणि शिंदे यांच्या नावाचा उल्लेख केल्याशिवाय भाषणं संपतच नाही. कालही तेच टेप तुम्ही वाजवली. हळूहळू नागरिकांना अशी भाषणं मुखोद्गत् होतात बरं! पण, काल एक नावीन्य होते. एरवी तुम्ही पिताश्री, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांना आठवता आणि आठवलेच पाहिजे ते कर्तृत्ववान वडील होते. त्यांच्या एका हाकेवर महाराष्ट्र बंद होत होता. तुम्हीच नव्हे तर अख्ख्या महाराष्ट्राने त्यांना स्मरलेच पाहिजे. नाशकात मात्र उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शिवसेना प्रमुख बाळासाहेबांचे आजच्या स्थितीला अनुसरून भाषण वाजवले. एका क्षणापर्यंत बाळासाहेबच बोलत असल्याचे जाणवले. त्यांचा तो रुबाबदार आवाज पुन्हा कानावर पडला, त्यांची वाक्य फेकण्याची ती ताकदही त्यात होती. परंतु, ते 'एआय' या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून! एखाद्या कार्यक्रमात बाळासाहेबांना आठवणे, त्यांना वंदन करणे, त्यांच्या आठवणींना उजाळा देणे, त्यांची स्वप्न पूर्ण करण्यासाठीचे आवाहन वगैरे उद्धवराव आम्ही समजू शकतो. परंतु, आजची परिस्थिती बाळासाहेबांच्या तोंडी घालून पुन्हा महाराष्ट्रातील लोकांना भावनिक साद घालण्याचा प्रयत्न नाशकात महानगर पालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर निर्धार मेळाव्यात झाल्याचे जाणवले. खरंच सांगतो राजे हो, एआयच्या माध्यमातून बाळासाहेबांचा आवाज ऐकायला मिळाला; हा पहिलाच प्रयोग होता. बाळासाहेब असते तर कसे बोलले असते हे एआयच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न तोडकाच ठरणार आहे. आयुष्यभर कोणतेही राजकीय पद घेणार नसण्याच्या शब्दावर कायम राहणारे बाळासाहेब देशातील सर्वच राजकीय पक्षांसाठी आदरणीय नव्हते तर त्यांच्या शब्दाला तेवढा मानही होता. पण, तुम्ही त्यांचे राजकीय वारस ठरलेले एका मुख्यमंत्रिपदासाठी आपल्या तीर्थरूपांच्या विचारांनाच तिलांजली दिली. तुम्ही तर मुख्यमंत्री, पुढे जाऊन पंतप्रधान करणाऱ्यांच्या रांगेत (रिमोट कंट्रोल) बसणारे व्हायला हवे होते. बाळासाहेबांनी नाही का पहिल्यांदा ब्राह्मण म्हणून मनोहरपंत जोशी यांना मुख्यमंत्री केले होते. एका चिठ्ठीवर त्यांना राजीनामा द्यायला लावून प्रखर शिवसेना नेते नारायण राणे यांना मुख्यमंत्री केले. तीच परंपरा तुम्ही चालवली असती तर बाळासाहेबांना वंदन करून तुम्हाला तुमची ताकद दाखवता आली असती कालच्या निर्धार मेळाव्यात. पण, पुन्हा तुम्हाला बाळासाहेबांचा आधार घ्यावा लागला. शिवसेनेमुळे भारतीय जनता पार्टी वाढल्याचे या मेळाव्यात पुन्हा उल्लेख झाला. पण, तुम्ही कमजोर पडलात म्हणून भाजपा वाढली. अजून एक गोष्ट, भाजपा कार्यकर्ते आणि हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्यांना भाजपाने वेगवेगळे लढावे, असे अनेक दिवसांपासून वाटत होते. खेड्यापाड्यात पाऱ्यावरही गप्पा रंगत होत्या. अनेकांनी ताकद तर अजमावा, असे देवेंद्र फडणवीसांना बोलून दाखवले होते. परंतु, त्यांनी आहे त्यांच्यासोबत लढू असे जाहीर केले होते. तुमच्याच सोबतचा विषय नाही तर एकनाथ शिंदे आणि नंतर सोबत आलेले अजित पवार यांनाही सोबत घेत ते महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा लढले हो! आणि तुम्ही तेच मुख्यमंत्रिपदाचे तुणतुणे घेऊन अजूनही फिरत आहात. याच मेळाव्यात तुम्ही काँग्रेसच्या वतीने बोलायला आलो नसल्याचे म्हणत राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केली आणि दुसऱ्याच क्षणाला काँग्रेसचे कौतुकही केले. भाजपाचे बेगडी हिंदुत्व आपल्याला मान्य नसल्याचे तुम्ही म्हणालात. तुम्ही भाजपाचे कट्टर दुश्मन आम्ही समजू शकतो. पण, पुढे बसणाऱ्यांना मान्य नसल्याचे तुम्ही ठोकून दिले. त्यांना मान्य नाही हे तुम्ही कसे काय ठरवू शकता. बघा टाळ्यांनी हुरळून जात याच भाषणात आपण दुप्पट आमदार निवडून आणू शकतो, असे आविर्भावात बोलून गेलात. लगेच तुमच्याच मेंदूने तुम्हाला एवढे आमदार नाहीत, असे सुचवल्याने तुम्ही पुन्हा तेवढे आमदार नाहीत, अशी पुस्ती जोडली. आता भाजपावाले गोमूत्र वाटतात हे थोतांड असल्याचेही तुम्ही म्हणालात. उद्धवराव तुम्हाला शेवट 'जी' उपाधी लावत उद्धवजी असे म्हणावेसे वाटत होते. पण पुन्हा तुम्हाला 'जी' म्हणजे संघ, भाजपा, हिंदुत्व वाटले असते. पण, तुमची ही सर्व धडपड, आगपाखड जी काही सुरू आहे ती फक्त खुर्चीसाठीच ना! बरं, महाविकास आघाडीत तुमच्या मताला किती प्राधान्य आहे, याची कल्पना तुम्हाला आहेच. जनतेनेही तुम्हाला धूळ चारली आहे. आगामी मुंबई महानगर पालिकेच्या रणधुमाळीत तुमच्या गटाचा पालापाचोळा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाळासाहेबांच्या विचार पुन्हा व्यक्तिशः अंगीकारा. तुम्हाला एआयच्या माध्यमातून बाळासाहेबांच्या आवाजात साद घालण्याची वेळ येणार नाही. बाळासाहेब ये नामही काफी है उद्धवजी! ▌

९८८१९०३७६५

## दखल

मोरेश्वर बडगे

# ॲडव्हान्टेज देवेंद्र फडणवीस

'एक अकेला देवेंद्र क्या करेगा' असे शरद पवारांच्या लाडक्या कन्या खासदार सुप्रिया सुळे मागे म्हणाल्या होत्या. एकटे देवेंद्र काय करू शकतात ते उभा महाराष्ट्रच नव्हे तर देश पाहतो आहे. भाजपासोबत निवडणूक युती करून नंतर शरद पवारांसोबत बसणाऱ्या उद्धव ठाकरे यांना देवेंद्र फडणवीसांनी मोठी अद्दल घडवली. स्वतःच्या राजकारणासाठी महाराष्ट्राला वेठीस धरणाऱ्या शरद पवारांची सद्दी संपवली. त्यांच्या जोरावर आत्मघात करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना घरी बसवले. त्यासाठी फडणवीसांनी त्याग केला. उपमुख्यमंत्रिपद स्वीकारले. दुसरा असता तर रुसून बसला असता. फडणवीसांनी अडीच वर्षे कळ काढली. मोदी-शाहांनी पुन्हा त्यांच्याकडे महाराष्ट्राची सूत्रे दिली आणि आपण बघत आहोत. महाराष्ट्र पुन्हा विकासाची उड्डाणे घ्यायला सिद्ध झाला आहे. अमरावती विमानतळाचे उद्घाटन हा त्यातला एक नमुना आहे. विदर्भाने स्वप्नातही पाहिलं नसेल अशा गोष्टी विदर्भात घडत आहेत. अमरावतीला विमानतळ आलं आहे. पहिलं विमान घेऊन फडणवीस आपल्या सहकाऱ्यांसह अमरावतीला आले, हा ऐतिहासिक क्षण आहे. ही गोष्ट काँग्रेसवालेही करू शकले असते, परंतु केलं नाही. अमरावती हे विदर्भातले महत्त्वाचे शहर आहे. विभागीय आयुक्तांचे मुख्यालय आहे. संत्रा आणि कापूस यांचे मोठे मार्केट आहे. अमरावतीच्या अंबादेवीला ऐतिहासिक महत्त्व आहे. शिर्डी, मुंबई इथल्या देवदेवतांचे मार्केटिंग झाले. विदर्भ मात्र आपल्या देवांचे, देवासमान महापुरुषांचे मार्केटिंग करू शकला नाही. तुकडोजी महाराज, गाडगेबाबा इथेच होऊन गेले. त्यांची 'खंजिरी' आपणच विसरत चाललो. अमरावतीला थेट रेल्वे नाही. मुंबईला जायचे म्हणजे मोठी सर्कस आहे. मुंबई ही मायानगरी आहे. पुढे जायचे असेल तर मोठ्या शहरांशी थेट संपर्क असावा लागतो. मुंबईच्या संपर्कात राहिलेले छत्रपती संभाजीनगरसारखे शहर मोठी झेप घेऊ शकले; त्याचे रहस्य लक्षात येऊ शकते. २५ वर्षांपूर्वी संभाजीनगरात दोन पंचतारांकित हॉटेल होती, विमानतळ होते. पुणे, नाशिक, औरंगाबाद ही शहरे वाढली. कारण मुंबईशी थेट संपर्क साधता येत होता. कोल्हापूरचं उदाहरण घ्या. कोल्हापूरच्या विमानतळाचा विस्तार होताच त्या शहराचं महत्त्व कमालीचं वाढलं आहे. नागपूरची समस्या वेगळी आहे. विमानतळ असूनही नागपूर वाढू शकलं नाही. कारण इथल्या राजकीय नेत्यांना ती दूरदृष्टीच नव्हती. बलाढ्य इंडोरामा कंपनी नागपूरला आली तेव्हाची गोष्ट आहे. त्या कंपनीत जाताना वाटेत वाहतूक कोंडी व्हायची. 'उड्डाणपूल करून देत असाल तर मी दुसरे युनिट इथे आणतो' असे इंडोरामाच्या मालकाचे म्हणणे होते. पण त्याला कोणी प्रतिसाद दिला नाही. विदर्भाची ही मोठी शोकांतिका आहे. एवढी मोठी एमआयडीसी असतानाही विदर्भातल्या तरुणांना नोकरीसाठी मुंबई-



पुण्याला धावावे लागते. पोरं पुण्याला आणि म्हातारे आईवडील नागपुरात अशी अलिकडे नागपूरची ओळख होऊ लागली आहे. आता या गोष्टीला ब्रेक लागेल, असा विश्वास वाटतो. कारण व्हिजन असलेले नेतृत्व सत्तेत आले तर काय होते, याचा प्रत्यय आपल्याला देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने येतो आहे. राष्ट्रीय कीर्तीच्या संस्था तसेच कार्यालये आज नागपुरात दिसतात. नितीन गडकरी-देवेंद्र फडणवीस या नेतृत्वाच्या जोडीला आलेली ही विकासाची फळं आहेत. विदर्भाचे राज्य मिळाले असते, तरी आले नसते एवढे पैसे आज विदर्भात येऊ पाहत आहेत. गडचिरोलीचा 'स्टील हब' तर विदर्भाला 'हॉट स्टेशन' बनवणार आहे. फडणवीसांच्या रूपातला एक नेता किती उड्डाणं घेऊ शकतो, याचे हे ट्रेलर आहे. 'अभी तो पिक्चर बाकी है.'

अमरावतीला विमानतळ होणार ही गोष्ट आपण गेली कित्येक वर्षे ऐकतो आहोत. फडणवीसांनी ते मनावर घेतलं. २०१९ मध्ये काम सुरू झालं. अवघ्या पाच वर्षांत विमानतळ सज्ज आहे. सध्या आठवड्यातून तीन दिवस मुंबईची सेवा असणार आहे. पण हे वाढेल. लवकरच तुम्ही पाहाल. अनेक कंपन्या इथून आपली विमानं सोडतील. देशाच्या कुठल्याही कोपऱ्यात विमानाने जाता येईल. याचा फायदा केवळ प्रवाश्यांनाच होईल अशातला भाग नाही. उद्योगधंदेही वाढतील. मोठमोठे उद्योगपती आणि त्यांचे अधिकारी विमानाने जाणे पसंत करतात. इथे यावे असे अमरावतीमध्ये सारे काही आहे. फक्त विमानतळ नव्हते. आता साऱ्यांना यावे लागेल. कारण इथं संत्रा आणि कापूस. टेक्स्टाईल हबच्या माध्यमातून अमरावती मोठी झेप घेऊ शकते. महाआघाडीच्या राजकारणाने चुथडा केला. देवेंद्र सरकारचे प्रकल्प आणि योजना थांबवल्या. 'स्थगिती सरकार' म्हणूनच उद्धव यांना इतिहासात ओळखले जाईल. महायुतीची सत्ता येताच कुलुपं उघडणे सुरू झाले. विकासाच्या या वाटचालीत अमरावतीचे विमानतळ गेमचेंजर ठरणार आहे. विकासाच्या आघाडीवर महायुतीचे सरकार नवनवी उड्डाणं घेत असताना राजकीय आघाडीवरही महायुतीची पकड घट्ट होताना दिसत आहे. काँग्रेस राष्ट्रीय पक्ष असला, तरी महाराष्ट्रात तो व्हेंटिलेटरवर आहे. भाजपाशी कसे लढायचे हेच काँग्रेसच्या नेत्यांना कळेनासे झाले आहे. त्या गडबडीत काँग्रेसवाले नको त्या चुका करीत चालले आहेत. काँग्रेसमध्ये इनकमिंग ठप्प आहे. ओसाडगावची पाटीलकी करायला कोण जाणार? शरद पवार थकले आहेत. मग उरले उद्धव ठाकरे आणि त्यांची उबाठा. महापालिकेच्या निवडणुका सुप्रीम कोर्टात रखडल्या आहेत. कोर्टाचा निकाल होऊन त्या कधीही लागू शकतात. त्यामुळे सारेच राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते हाय अलर्टवर आहेत. राजाचा प्राण कुण्या पोपटात होता अशी गोष्ट आपण ऐकतो. तसे उद्धव ठाकरे यांच्या 'शिल्लक सेने'चे प्राण मुंबई महापालिकेत आहेत. गेली कित्येक वर्षे मुंबई महापालिका ठाकरे सेनेच्या हातात आहे. गेल्या निवडणुकीत फडणवीस यांच्या कृपेमुळे ती कशीबशी ठाकरे यांच्या हातात राहिली. मात्र आता अवघड आहे. विधानसभेच्या निवडणुकीत उबाठाचे २० आमदार निवडून आले. त्यातले १० मुंबईतले आहेत. म्हणजे अजून धुगधुगी आहे. गेल्या लोकसभा-विधानसभा निवडणुकीत उद्धव 'हिरव्या आश्रया'ला गेले होते. त्याचा त्यांना फायदा झाला नाही. मात्र आता ते 'आपण हिंदुत्व सोडले नाही' असे वारंवार सांगत आहेत. महाविकास आघाडी तशीही केव्हाच मोडीत निघाली आहे. उद्धव यांचे आकर्षण संपले आहे. त्यांचेच लोक त्यांना सोडून जात आहेत. ही गळती थांबायचे नाव घेत नाही. शरद पवारच काय, काँग्रेसही उबाठासोबत आघाडीला तयार होईल, अशी हवा नाही. उद्धव यांची कोंडी झाली आहे. कोणाशी लढायचे? कोणाच्या जोरावर लढायचे? भाजपाशी लढायचे की शिंदे सेनेशी? की राज ठाकरे यांच्या मनसेशी? नियती पूर्ण हिशोब चुकता करायला निघाली आहे. मराठी टक्का मुंबईत आतापर्यंत ठाकरेंना वाचवत आला. मात्र आता तिथेही उद्धव यांचे पत्ते उलटे पडत आहेत. एकनाथ शिंदे हे राज ठाकरे यांच्या भेटीला गेल्याने वेगळ्याच युतीची चर्चा सुरू झाली आहे. महायुतीत चौथा भिडू घुसणार का? कुठल्याही परिस्थितीत भाजपाला यावेळी मुंबईत आपला महापौर बसवायचा आहे. त्यासाठी भाजपाला किमान निम्म्या जागा लढवाव्या लागतील. शिंदेंच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. मुंबईसोबत त्यांना ठाणेही जिंकायचे आहे. राज ठाकरे महायुतीत आले तर त्यांना किती जागा मिळतील? राजकारणात खूप काही घडणार आहे. पण एक पक्के. टार्गेट उद्धव हेच असतील. ▌

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### आई रागावते...!

दोन अल्पवयीन मुली आई अभ्यासासाठी रागावते म्हणून घरातून पळून गेल्या. रात्री एका दुकानाच्या बाजूला झोपल्या. सकाळी पुढे जाणार होत्या, परंतु पालकांची पोलिसात तक्रार व पोलिसांच्या सतर्कतेमुळे सापडल्या. रात्री कोणी गैरकृत्य किंवा गैरफायदा घेतला नाही हे नशीब. आईने तुम्हाला जन्म दिला. तुमच्या चांगल्यासाठी, वळण लावण्यासाठी रागवावे लागते. सासरी गेल्यावर आईचाच उद्धार होतो. पूर्वी लहान मुले अंगावर पिताना दूध थुंकत, चावा घेत. आईने रागवले की रडणे, परंतु लगेच आईची प्रेमाची मिठी. किती विलोभनीय क्षण असायचे. आता पती-पत्नी पोटाकरिता बाहेर जातात. मुलांना हवा तसा वेळ देऊ शकत नाही. त्यांची भरपाई अति लाडवणे. त्यामुळे त्यांना वाईट सवयी, न ऐकणे वगैरे गोष्टी घडतात. एखादे वेळी आई रागावली की त्यांना अपमान वाटतो व त्यातूनच आत्महत्या, पळून जाणे वगैरे घडते. 'छडी लागे छम-छम, विद्या येई घम-घम' अशी म्हण आहे. चटके देणे, उपाशी ठेवणे, कोंडून ठेवणे वगैरे अघोरी उपाय करू नये. तुम्ही मुलाला जन्म दिला. त्याला योग्य व्यक्ती बनविणे तुमचे कर्तव्य आहे. रागावल्यानंतर मायेने जवळ घेणे, त्यांची चूक शांतपणे समजून सांगणे महत्त्वाचे आहे. आई जीवनाचा पहिला गुरू आहे. ती तुमच्या भल्यासाठी करते, हे घरातील प्रत्येक व्यक्तीने समजून सांगावे.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

●● ●●

### अमरावतीचे झाले; अकोला विमानतळाचे काय?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा २०४७ पर्यंत विकसित भारताचा संकल्प आहे. विकसित भारताच्या निर्मितीसाठी देशभरात हवाई वाहतुकीची भूमिका महत्त्वाची असणार आहे. देशातील प्रत्येक शहराचा सर्वांगीण विकास झाला तरच विकसित भारताचे लक्ष्य साध्य करता येईल. अकोल्यात ब्रिटिश काळापासून विमानतळ अस्तित्वात आहे. गत अनेक वर्षांपासून धावपट्टी विस्तारीकरणाअभावी विमानसेवा सुरू होण्यासाठी विलंब होतोय. अमरावती विमानतळ सुरू झाले, पण अकोलेकरांच्या वाट्याला अद्याप निराशाच आहे. विमानसेवेद्वारे अकोला शहर मोठ्या शहरांना जोडले गेल्यास दळणवळण सुलभ होईल, शहरात मोठे उद्योग येतील, बेरोजगारी दूर होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विदर्भातील आहेत. काही काळ ते अकोल्याचे पालकमंत्री होते. अकोल्याच्या समस्या त्यांनी जवळून पाहिल्या आहेत. सरकारने स्वतः पुढाकार घेऊन अकोला विमानतळाचा प्रश्न लवकर निकाली काढावा.

**अखिल देशपांडे**/अकोला

●● ●●

### सामाजिक अध:पतन

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानीच्या मंदिरातील ११ पुजारी ड्रग्ज व्यापारी असल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचली. ही बातमी जितकी धक्कादायक आहे तितकीच ती गंभीर आहे. देवीचा पुजारी ही आदरणीय व्यक्ती असते. भाविक त्याच्याकडे एक आदर्श म्हणून पाहत असतात. अशा व्यक्तीने आपल्या पदाला काळिमा फासत ड्रग्ज विक्रीसारख्या गंभीर गुन्ह्यात सहभागी होणे, ही गोष्ट लांच्छनास्पद आहे. देवीचे पुजारी ड्रग्जचा व्यवसाय करीत असतील तर ते एकप्रकारे सामाजिक अध:पतनच आहे. संबंधितांवर कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. तुळजापूरसारख्या छोट्या शहरात जर इतक्या राजरोसपणे ड्रग्जचा व्यवसाय चालत असेल तर काय म्हणावे? यामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता आहे म्हणूनच या प्रकरणाची सखोल चौकशी व्हायला हवी.

**श्याम ठाणेकर**/९९२२५४६२९५

●● ●●

### अल्पसंख्यक शाळांचा घोळ

महाराष्ट्रात 'उर्दू' माध्यम शाळा अल्पसंख्यक दर्जा प्राप्त आहेत. न्यायालयाने या शाळांना रोस्टरमुक्त करून उर्दू माध्यम शिक्षक भरतीकरिता रीतसर परवानगी दिलेली आहे. परंतु 'मराठी' माध्यम शाळा ज्यांच्या स्थापनेपासून 'अल्पसंख्यक' दर्जा नसताना त्या मागील १०-१५ वर्षांत अल्पसंख्यक कशा झाल्या? यावर विधानसभेत आजपर्यंत प्रश्न उपस्थित का झाला नाही? हे सारे प्रश्न अनुत्तरित राहण्यास नागपूर शिक्षक भरती घोटाळा कारणीभूत ठरतो. यात तथाकथित अल्पसंख्यक शिक्षण संस्थाचालक, अधिकारी वर्ग आणि शिक्षण मंत्रालय जबाबदार आहेत. कारण अल्पसंख्यक दर्जा हा मुंबईतील सचिवालयातूनच प्राप्त झालेला असतो. 'पवित्र पोर्टल' हे शिक्षक भरती प्रक्रिया राबवित असताना शिक्षणाधिकारी आणि उपसंचालक मंडळींनी या नियुक्त्या करून कोट्यवधीचे घबाड कमवून संस्थाचालकांचेही उखळ पांढरे केले. प्रश्न आहे गरीब प्रशिक्षित शिक्षक उमेदवारांचा कारण त्यांच्याकडे लाखो रुपयांची तरतूद नाही. ते केवळ ११ महिन्यांकरिता वेठबिगारी करीत आहेत. महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदेच्या शाळांतील प्रशिक्षणार्थी शिक्षकांना ताबडतोब कायम करावे म्हणजे भरती घोटाळ्याला लगाम लागेल! ▌

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## बाबासाहेबांना अभिवादन...



### जय भारत शाळा

जय भारत प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत साबळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशालेचे प्राचार्य नरसिंह आसादे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सिद्राम फुले, सचिव दिपक फुले, मारुती माळगे, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी उपस्थित होते. प्रास्ताविक नीता फुले यांनी केले. सूत्रसंचालन किरण गाटे यांनी केले तर आभार नारायण सूर्यवंशी यांनी मानले.

### सिद्रामप्पा हत्तुरे शाळा

सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक सचिन जाधव, सुधाकर कामशेट्टी, बालअध्यक्ष शिवम चव्हाण यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सुनिता शेजाळे, परमेश्वर काळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन मुसाअली मुल्ला यांनी केले. प्रास्ताविक सौंदर्या कल्लूरकर व आभार वैष्णवी वदुंळे हिने मानले.

### भारत मराठी विद्यालय

भारत मराठी विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस.के. सरसंबे होते. सहशिक्षिका एन.झेड. सय्यद यांनी प्रास्ताविक केले. यावेळी अब्दुल हिरीपुरे, कावेरी पंजलो, रिजयाबानो शेख या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षक एस.एम. ढाकणे यांनी देखील मनोगत व्यक्त केले. यावेळी टी.टी. वडावराव, जे.एच. हवालदार, मुस्कान मंगलूरे, सादीक पटेल उपस्थित होते. सूत्रसंचालन एच.ए. बागवान यांनी केले तर आभार एस.एम. शेख यांनी मानले.

### विद्यानिकेतन हायस्कूल

विद्यानिकेतन हायस्कूल व हिंगुलांबिका प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब ढगे अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक गोपीनाथ नवले यांनी केले. यावेळी अक्षया मादगुंडी, ईश्वरी हंचाटे, जैद पिरजादे, अनुष्का म्हेत्रे, ऐश्वर्या दंतकाळे, नंदिनी सीडगिड्डी, वेदांत इरावती, प्रगती तळभंडारे, लोकेश जेटगी, समृध्दी जानकर या विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानावर आधारित नाटक सादर केले. सूत्रसंचालन सहशिक्षिका रुपादेवी राजगे यांनी केले तर आभार शंकरगिरी यांनी मानले.

### विमल कन्या प्रशाला

मुरारजी पेठ, येथील शिवाजी मराठी विद्यालय व विमल कन्या प्रशालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे सचिव उज्वला ढमाळ यांनी प्रतिमेचे पूजन केले. यावेळी मुख्याध्यापक बिराजदार, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### भारत उर्दू विद्यालय

भारत उर्दू विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शाहीन अत्तार होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस एस.ए. सय्यद यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी आयेशा मुल्ला, जोया सातखेड या विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक तस्कीन शेख यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन फरहतबानो कालेभाई यांनी केले तर आभार रिजवान शेख यांनी मानले.

### श्रीमती नरसम्मा बसप्पा बंडा प्रशाला

श्रीमती नरसम्मा बसप्पा बंडा प्रशालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एम.डी. बिराजदार होते. यावेळी शिक्षिका जी.एस.काशेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बी.ए.रायनी यांनी केले.

### मल्लिकार्जुन हायस्कूल

हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे होते. यावेळी धरेप्पा हत्तुरे, भारत राऊत यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अनिलकुमार गावडे, भारत राऊत यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पर्यवेक्षक रमेश दिंडोरे, बसवराज कोरे, अण्णाराव तुप्पद, बाबुराव कलशेट्टी, प्रकाश चिवडशेट्टी, विद्याधर हुलगेरी, दत्तात्रय अगरखेड, संतोष हिरेमठ, परमेश्वर चांदोडे, गणेश कोरे, अमरनाथ कदारे, संतोष स्वामी, सुकेशनी गंगौडा उपस्थित होते. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले तर आभार रमेश आगवणे यांनी मानले.

### जिल्हा माहिती कार्यालय

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी जयंती निमित्ताने जिल्हा माहिती कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यालयातील कर्मचारी संजय घोडके, लिपिक पंकज बर्दापूरकर, जेष्ठ पत्रकार बाळासाहेब वाघमोडे, पत्रकार चंद्रशेखर गायकवाड, साप्ताहिक सोलापूर दणका संपादक विश्वनाथ व्हनकोरे, दै. अग्रणीवार्ताचे संपादक योगेश तुरेराव, साप्ताहिक क्रांतीसिंगचे संपादक संतोष शेलार, साप्ताहिक संत दामाजी संपादक सुनील चेळेकर इत्यादी उपस्थित होते.



## साहित्य कला विकास प्रतिष्ठानचा पुरस्कार हा माझ्या संशोधन कार्याचा सार्थ सन्मान : डॉ. शिंदे

**सोलापूर :** गुरुवर्य प्रा. ग्रंथमित्र डॉ. शिवाजीराव चव्हाण यांच्या विद्यार्थ्यांनी साहित्य कला विकास प्रतिष्ठानची स्थापना करून आपल्या गुरूंच्या विषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. या प्रतिष्ठांनचा पुरस्कार म्हणजे माझ्या संशोधन कार्याचा आणि गुरुपरंपरेचा सार्थ सन्मान आहे' असे उद्गार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी काढले. सातारा येथील छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालयातील पाठक हॉल येथे ते साहित्य कला विकास प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या ग्रंथमित्र डॉ. शिवाजीराव चव्हाण संशोधन पुरस्कार प्रदान सोहळ्यात बोलत होते. या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अशोक भोईटे यांच्या हस्ते डॉ. शिंदे तसेच सिने अभिनेते सयाजी शिंदे यांना 'ज्येष्ठ कलावंत', सूर्यकांत गुंजवटे यांना 'ग्रंथ शिक्षक' पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# सोलापूरच्या समस्या आता 'ॲक्शन मोडवर' घ्या

## सोलापूर विकास मंचच्या बैठकीत आयुक्त ओंबासे यांच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या समवेत आज सोलापूर विकास मंचच्या शिष्टमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त संदिप कारंजे, अतिरिक्त आयुक्त रवि पवार, उपायुक्त तैमुर मुलाणी, उपायुक्त आशिष लोकरे, नगररचना विभाग प्रमुख मनिष भुष्णुरकर, पाणीपुरवठा अधिकारी व्यंकटेश चौबे, सहाय्यक आयुक्त, सह्यायक अभियंता प्रकाश दिवाणजी, तपन डंके व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.



या बैठकीमध्ये शहराच्या विकासाशी निगडीत विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. त्यामध्ये अनेक वर्षांपासून प्रलंबित सोलापूर दुहेरी जलवाहिनी तथा नियमित पाणीपुरवठा,विजापूर रोड अतिक्रमण काढून सर्विस रोड करणे,महानगर पालिकेच्या गाळ्याचे भाडे करार नूतनीकरण, अलीकडील बांधकाम परवाना घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर दोषींवर कठोर कारवाई, अक्कलकोट एम.आय.डी.सी.मधील तथा होटगी रोड इंडस्ट्रीयल इस्टेट मधील पायाभूत सुविधा, संभाजी चौक ते सीएनएस हॉस्पिटल दरम्यानचा ५४ मीटर रस्ता, आणि शहरातील वाढती मटका, मावा, अनधिकृत बॅनर्स व मिरवणुकांची समस्या यांचा समावेश होता.

तर स्मार्ट सिटी प्रकल्पाचे ऑडिट, JNNURM² बस घोटाळ्याची चौकशी, महानगरपालिकेच्या जलतरण तलावांचे कंत्राटीकरण, ओपन स्पेसचा उत्पन्नक्षम उपयोग, महात्मा गांधी प्राणीसंग्रहालयाचा CSR निधीतून विकास, नवीन बांधकामांना झाडे लावण्याची सक्ती, रस्त्यांवरील अजोरा हटवणे, मृत पाळीव प्राण्यांसाठी अंत्यसंस्कार सुविधा, नवीन विकास आराखड्यावरील नागरिकांच्या सूचनांचा विचार व 'जुळे सोलापूर प्राधिकरण' स्थापनेचा प्रस्ताव या विषयांवरही शिष्टमंडळाने सविस्तर मांडणी केली.

आयुक्त डॉ. ओंबासे यांनी विकास मंचच्या वतीने मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न होत असल्याचेही यावेळी सांगितले. या बैठकीमुळे शहराच्या अनेक समस्यांवर प्रभावी पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सोलापूर विकास मंचने प्रशासनाला यापुढेही पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी सोलापूर विकास मंचचे मिलिंद भोसले, केतन शहा, विजय कुंदन जाधव, सुहास भोसले, प्रशांत भोसले, प्रसन्न नाझरे, इक्बाल हुंडेकरी, आनंद पाटील, आरती अरगडे, भारत पाटील, शुभदा पाटील आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते.



## वीरशैव लिंगायत जंगम अर्चक पुरोहित अध्यक्षपदी डॉ. होळीमठ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत जंगम अर्चक पुरोहित या संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ. शिवयोगी शास्त्री होळीमठ यांची निवड करण्यात आली.

संस्थेचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, अध्यात्मिक विकास व्हावा तसेच संपूर्ण महाराष्ट्रभरात पूजा विधी एकसूत्रीपणा येण्यासाठी त्याचबरोबर संपूर्ण समाजाने एकत्रित येण्यासाठी काल सोलापूर येथे झालेल्या महत्त्वपूर्ण महासभेत अखिल वीरशैव लिंगायत जंगम अर्चक पुरोहित महासभेचे महाराष्ट्र धर्मदाय सरकारी मान्यता मिळाली आहे. यावेळी राज्यस्तरीय नूतन पदाधिकारी कार्यकारणी निवड करण्यात आली आहे. त्यानंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार शेगावचे संगय्या स्वामी यांनी केला.

**अन्य पदाधिकारी :** उपाध्यक्ष राजपुरोहित प्रकाश स्वमी जंगम (रायगड), सचिव महेश कुगावकर (पुणे), सहसचिव ईश्वर स्वामी होळीमठ (सोलापूर), खजिनदार राजशेखर स्वामी (आहेरवाडी), संचालक-त्र्यंबकअप्पा पटवेकर स्वामी (नांदेड), राहुल जंगम (सातारा), विजयकुमार स्वामी (उदगीर), अनाजी जंगम (मुंबई).



## वालचंद कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

वालचंद कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावीचा निकाल १५ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आला. यावर्षी अकरावी कला व विज्ञान शाखेत इयत्ता निहाय गुणानुक्रमे प्रथम तीन विद्यार्थ्यांचा हृद्य सत्कार सोहळा शिक्षक व विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोहर जोशी होते. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. राजशेखर हिप्परगी, गुणवंत विद्यार्थी व पालक शिक्षक वृंद उपस्थित होते. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनुप म्हेत्रे यांनी केले. उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शैक्षणिक साहित्य,वाचनासाठी उपयुक्त पुस्तक व पेढा भरवून वर्गशिक्षक व शिक्षकांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित पालकांपैकी सौ. खंडेलवाल व सौ. बेल पवार या पालकांनी महाविद्यालयाच्या उपक्रमांचे कौतुक करून, अभ्यास व अभ्यास पूरक उपक्रमांसाठी महाविद्यालय नेहमी पूरक वातावरण उपलब्ध करून दिल्याबद्दल शिक्षकांचे व संस्थेचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन तुपकर यांनी केले. चंद्रशेखर कस्तुरे यांनी आभार मानले.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचे ब्रँड अँबेसिडर यशवंत कन्हेरे यांनी साधला संवाद

### महापालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिले धडे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील ब्रँड अँबेसिडर (स्वच्छता विभाग) यशवंत कन्हेरे यांनी सोलापूर महापालिकेतील स्वच्छता कर्मचा-यांना मार्गदर्शन केले.

सोलापूर महानगरपलिकेच्या वतीने दि. ३ ते १७ एप्रिल २०२५ या कालावधीमध्ये आयुक्त यांच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील झाडूवाला,बिगारी, सफाई कामगार यांची क्षमता बांधणी कार्यशाळा झाली. त्या अनुषंगाने मंगळवारी विभागीय कार्यालय क्र.६ कडील सर्व चतुर्थ श्रेणी सफाई कर्मचारी यांची आरोग्य निरीक्षक व मुख्य आरोग्य निरीक्षक यांच्यासाठी कार्यशाळा झाली.यावेळी मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधिक्षक अनिल चराटे व संबंधित झोनचे मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक त्यांच्या कर्मचा-यांसह उपस्थित होते. याच कार्यशाळेप्रसंगी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कडील ब्रँड अँबेसिडर (स्वच्छता विभाग) यशवंत कन्हेरे उपस्थित होते. यशवंत कन्हेरे, हे त्यांचे दुचाकीवरून स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत ३६ जिल्ह्यांतर्गत प्रवास करीत आहेत. आज त्यांनी या कार्यशाळेत त्यांनी उपस्थित राहून सर्व कर्मचा-यांशी संवाद साधला. या वेळेस त्यांनी कर्मचा-यांना चांगले आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता, रोजच्या कामामधील सामाजिक बांधिलकी, सुयोग्य वर्तन, वरिष्ठाचा सन्मान, व्यसनधिनता याबाबत मार्गदर्शन केले.

## श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय येथे 'छात्रार्पण सोहळा' संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय,हत्तुरे नगर,सोलापूर येथे 'छात्रार्पण सोहळा' मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आदरणीय सिद्धपा वरनाळ गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

ब्लॅक अँड व्हिच प्रायवेट लिमिटेड कंपनी व सेवा सहयोग फाउंडेशन, मुंबई यांच्या माध्यमातून प्रशालेस सोलार,ग्रीन बोर्ड, विज्ञान साहित्य,स्मार्ट टी.व्ही.इ.साहित्य देण्यात आले. याप्रसंगी ब्लॅक अँड व्हिच प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे पायपिंग इंजिनियर अभिजीत तपिसे,प्रोजेक्ट इंजिनियर श्रीशैल कापसे,उ.सोलापूरचे शिक्षण विस्तार अधिकारी आदरणीय बापूराव जमादार साहेब यांच्या उपस्थितीत सेवा सहयोग फाउंडेशन,मुंबईचे प्रोजेक्ट हेड राम रोकडे,अनिकेत गमरे,राजेश मोरे, विनोद सुरवसे, प्रशांत



कापसे,आनंद गायकवाड,प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे सर,उपक्रम प्रमुख धरेप्पा हत्तुरे सर,पर्यवेक्षक रमेश दिंडोरे यांच्या शुभहस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व सोलार, ग्रीन बोर्ड, विज्ञान साहित्य व स्मार्ट टी.व्ही.चे उद्घाटन करण्यात आले.

प्रमुख अतिथींचे मान्यवरांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी पायपिंग इंजिनियर अभिजीत तपिसे यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साधनांचा वापर करून ज्ञान वाढवावे असे सांगितले व ब्लॅक अँड व्हिच कंपनी सी.एस. आर.फंडातून गरजवंतांना मदत कशी करते याविषयी माहिती दिली.प्रोजेक्ट इंजिनियर श्रीशैल कापसे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावे व शाळेचे,आई-वडिलांचे नाव मोठे करावे असे म्हटले. राम रोकडे यांनी सेवा सहयोग फाउंडेशनच्या अभ्यासिका,किशोरी प्रशिक्षण,क्रीडा विकास यासारख्या विविध उपक्रमाविषयी माहिती सांगत या शैक्षणिक साधनांचा आवर्जून वापर करा असे सांगितले. तसेच विनोद सुरवसे यांनी गीत सादर केले. प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे यांनी मनोगत व्यत्क केले. तसेच शिक्षण विस्तार अधिकारी बाबुराव जमादार साहेब यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिलकुमार गावडे यांनी केले, तर सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले. रमेश आगवणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग
इंद्रभुवन रेल्वे लाईन्स, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, सोलापूर-४१३००१
ई मेल - drainsmac@gmail.com टेलिफोन नं. ०२१७-२७४०३५०

**- जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदा -**

सार्व. आरोग्य अभियंता/जावक क्र./साआअ/जनि. १४८ दि. १७/४/२०२५

सोलापूर महानगरपालिका सार्व आरोग्य अभियंता कार्यालयाकडील ड्रेनेज विभागाकडील खाली नमूद कामाचे ई-निवेदनाबाबत.

1. Tender ID-2025_SMC_1171262_1
2. Tender ID-2025_SMC_1171250_1

या कामाचे टेंडर शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. १७/०४/२०२५ पासून सकाळी १०.०० पासून पाहण्यास उपलब्ध आहे. कळावे दि. १७/०४/२०२५

सही/-
सहा. अभियंता ड्रेनेज
सोलापूर महानगरपालिका

**सावधानतेची जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या सावधनतेची जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- अ) डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे बाळे येथील शेतजमीन गट नं.१७/१ यांसी क्षेत्र ३ हे. ०२ आर. यांसी आकार रु.१४-६२ पैसे. यांसी चतु:सिमा:-पुर्वेस-गट क्र.१७/२, दक्षिणेस-गट क्र.१८, पश्चिमेस जय मल्हार नगर, उत्तरेस-गट क्र.१६. ब) डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे बाळे येथील शेतजमीन गट नं. १७/२ यांसी क्षेत्र २ हे. ७७ आर. यांसी आकार रु.१३-४४ पैसे. यांमी चतु: सिमा:-पुर्वेस-सोलापूर-कारंबा रस्ता, दक्षिणेस-गट क्र.१८, पश्चिमेस गट क्र.१७/१, उत्तरेस-गट क्र.१६.

वरील नमूद मिळकत ही १) श्री. मोहन शामराव सुरवसे, २) श्री. विकास हरीदास सुरवसे. ३) ऋषिका हरीदास सुरवसे, ४) पुजा हरीदास सुरवसे उर्फ पुजा प्रसाद निकम, ५) सुरेश शामराव सुरवसे व ६) सुरेखा जयंत सर्जेराव यांनी अविभक्त मालकी व कब्जे वहिवाटीची असून, त्यांनी सदरची मिळकत ही आमचे अशिल-१) अनंता नागनाथ सुभेदार व २) रुपेश प्रभाकर जक्कल, यांना कायम खुशखरेदी देण्याची बोलणी करून आमचे अशिलांकडून सदरच्या खरेदी-विक्री व्यवहारापोटी अंशतः पुर्तता म्हणून इसारा रक्कम स्विकारून आमचे अशिलांच्या नावाने दि.०७/०९/२०२४ रोजी करारपत्र लिहून दिलेली आहे व सदरची मिळकत आमचे अशिलांना नोंदणीकृत खरेदीखताव्दारे विकण्याचे मान्य व कबूल केले आहे. येणेप्रमाणे आमचे अशिल सदरची वर नमूद मिळकत खरेदी करणार आहेत. असे असतांना, सदरची वर नमूद मिळकत ही १) श्री. मोहन शामराव सुरवसे-वगैरे हे त्रयस्त व्यक्तींसोबत व्यवहार करण्याच्या प्रयत्नात असल्याचे खात्रीलायक माहिती आमचे अशिलांना नुकतेच समजलेले आहे. तरी सदर वर नमूद मिळकतीमध्ये आमचे अशिलांचे हक्क व अधिकार असल्याने कोणीही खरेदी-विक्री अथवा त्रयस्त व्यक्तींचे हक्क निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करु नये. तसे केल्यास आमचे अशिलांवर मुळीच बंधनकारक राहणार नाही. कोणाचेही फसगत होवू नये म्हणून सदरची सावधानतेची जाहीर नोटीस दिलीआहे.

ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली ता. १७/०४/२०२५.

सही/-
ॲड. संदीप सातलगाव
ऑफिस- चेंबर नं. २८, जिल्हा न्यायालय आवार,
सोलापूर मो.नं.९६६५४९०१४३
अशिलातर्फे ॲडव्होकेट

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
**ई-टेंडर सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सीपीएम, गति शक्ती, मध्य रेल्वे, सोलापूर खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-टेंडर मागवत आहे. **ई-टेंडर सूचना क्रमांक: 01-2025-**जीएसयू-सिव्हिल, **दिनांक: 15.04.2025. कामाचे नाव:** (अ) सोलापूर विभागातील अमृत स्टेशन योजनेअंतर्गत अक्कलकोट रोड स्टेशनवर दिव्यांगजनांसाठी एफओबीसाठी रॅम्पची तरतूद. **(ब)** सोलापूर विभागातील अमृत स्टेशन योजनेअंतर्गत अक्कलकोट रोड स्टेशनवर लिफ्टची तरतूद. (क) येथे पार्सल आणि गुड्स शेडशी संबंधित सुविधांची तरतूद **(1) सोलापूर:** सीजीएस कार्यालय आणि पार्सल कार्यालयाची तरतूद **(2) कलबुर्गी :** पार्सल कार्यालयाची तरतूद. **(3) कुर्डुवाडी:** हमाल कक्ष आणि सीजीएस कार्यालयाची तरतूद. **(4)** वडल: पार्सल कार्यालय आणि स्टोअर रूमची तरतूद. **(v)** पंढरपूर: हमाल खोलीची तरतूद. (ड) **वडळ** - वाडी स्टेशनच्या पीएफ **1/2** आणि **3/4** चे पुनर्बांधणी आणि इतर सुधारणा कामे. **कामाची अंदाजे किंमत:** रु. **21,31,91,771.00. बकाया रक्कम:** रु. **12,16,000.00.** काम **पूर्ण करण्याचा कालावधी: 12** (बारा) महिने. **देखभाल कालावधी: 6** महिने किंवा एक पावसाळा यापैकी जे नंतर असेल. **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ 09.05.2025** रोजी दुपारी **3.00** वाजेपर्यंत. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ **09.05.2025** रोजी दुपारी **3.30** वाजेनंतर. **वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in टीप:** संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल: **www.ireps.gov.in**

**सहाय्यक विभागीय अभियंता (GSU), मध्य रेल्वे, सोलापूर.**

Akar/Sur- 40

धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमली ता.१०/८/२०२५
दि.कि.अ.नं. ५४/२०२५
नि.५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**१) भास्कर वैजिनाथ शेळके,** वय ६७ वर्षे,
**२) प्रभाकर वैजिनाथ शेळके,** वय ६३ वर्षे,
**३) पद्माकर वैजिनाथ शेळके,** वय ५५ वर्षे,
सर्वाचा धंदा-शेती, रा. सर्व सुर्डी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणी नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार नं.१ ते ३ हे एकमेकाचे सख्खे भाऊ असून अर्जदाराची आई कमल वैजिनाथ शेळके ही होती ती दि.२९/१०/२०२४ रोजी मौजे सुर्डी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेली आहे. यातील अर्जदाराना त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता, शासनाचे घरकुल योजनेचा लाभ घेणेकरीता हेअरशिप (वारस) प्रमाणपत्राची गरज भासली असे कथन करुन अर्जदारानी या मे. कोर्टाकडे वारसा प्रमाणपत्राकरीता अर्ज केलेला आहे

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कोणाचे हक्कात कांही दस्त असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीख १०/६/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता.१५/४/२०२५

**सही/-**
**लिपीक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, बार्शी**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, बार्शी**

**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

Truhome FINANCE

**मागणी सूचना**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइट:** http://www. truhomefinance.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात**) कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे. कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| **श्री.अमितकुमार नानासाहेब मोटे (कर्जदार)**<br>**श्रीमती प्रगती अमितकुमार मोटे (सह-कर्जदार)**<br>**सौ.रंजना नानासाहेब मोटे (सह-कर्जदार)**<br>**निवासाचा पत्ता : पोस्ट रुक्मिणी निवास ना, पंढरपूर रोड, दिवाणी न्यायालयाजवळ,बाजारपेठ, मोहोळ, महाराष्ट्र- ४१३२१३.**<br>**तसेच येथे: ग्रामपंचायत घर, क्रमांक २८४२ मोहोळ, घर क्रमांक १२५ ४ २ब २३अ २१, मोहोळ महाराष्ट्र ४१३२४८**<br>**कर्जाची रक्कम – रु.३३,८३,७६३/-**<br>**लॅन क्रमांक - SLPHSOLR0000433**<br>**एनपीए तारीख – ०५/०४/२०२५** | एन.ए. गॅट क्रमांक १२५४/२बी/२ए/२१ असलेले, मोजमाप ०१.१०.६६, ग्रामपंचायत घर क्रमांक २८४२, मोहोळ, तालुका मोहोळ, जिल्हा - सोलापूर येथे स्थित आणि खालीलप्रमाणे सीमा: (तांत्रिक प्रमाणे)<br>पूर्व: प्लॉट क्रमांक २२<br>दक्षिण: प्लॉट क्रमांक १६<br>पश्चिम: रस्ता<br>उत्तर: रस्ता | मागणी सूचना तारीख: ११-०४-२०२५<br><br>दिनांक ०९-०४-२०२५ रोजी कर्ज खाते क्र. SLPHSOLR0000433 अंतर्गत रु. ३६,४७,७५२/- (रुपये छत्तीस लाख सत्तेचाळीस हजार सातशे बावन्न फक्त) नुसार नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज आणि आकस्मिक खर्च, किंमत इ. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - सोलापूर
दिनांक - १८.०४.२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

www.tarunbharat.net
तरुण भारत




## महत्त्वाचे

### नाडाची स्वच्छ क्रीडा परिसंस्था निर्माण करण्यावर राष्ट्रीय परिषद

**नवी दिल्ली :** भारतीय राष्ट्रीय डोपिंग विरोधी एजन्सीने (नाडा इंडिया) ने बुधवारी नवी दिल्ली येथील इंडिया इंटरनॅशनल सेंटर येथे एकत्रितपणे स्वच्छ क्रीडा परिसंस्था निर्माण करणे या विषयावर एक परिषद यशस्वीरित्या आयोजित केली. भारत २०३६ उन्हाळी ऑलिम्पिकचे आयोजन करण्यासाठी बोली लावत असताना, निष्पक्षता, अखंडता व स्वच्छ खेळासाठी वचनबद्धता सुनिश्चित करण्यासाठी देशाने आपली क्रीडा महत्त्वाकांक्षा एका मजबूत डोपिंग विरोधी प्रणालीसह पूर्ण केली पाहिजे, असे प्रतिपादन क्रीडा विभागाच्या सचिव सुजाता चतुर्वेदी यांनी परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी केले. प्ले ट्रू वीक २०२५ चा भाग म्हणून आयोजित या कार्यक्रमाने भारतात स्वच्छ, निष्पक्ष आणि मूल्यांवर आधारित क्रीडा वातावरण निर्माण करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या विविध भागधारकांना एकत्र आणले, असे त्यांनी यावेळी सांगितले. जागतिक डोपिंग विरोधी एजन्सीच्या (वाडा) आशिया/ओशनिया कार्यालयाच्या संचालक डॉ. मयुमी याया यामामोतो यांनी या वर्षीच्या जागतिक प्ले ट्रू मोहिमेत नाडा इंडिया आणि राष्ट्रीय भागधारकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. यावेळी दहा वेगवेगळ्या प्रादेशिक भाषांमध्ये नाडा इंडियाज फेअर प्ले गाईडचे अनावरण करण्यात आले. परिषदेत डोपिंग विरोधी धोरण, शिक्षण आणि चाचणी वाढवणे आणि खेळाडूंचे हक्क आणि जबाबदाऱ्यांबद्दल जागरूकता वाढवणे, विशेषतः उपचारात्मक वापर सवलतीच्या संदर्भात, यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर आकर्षक पॅनेल चर्चा झाली. राष्ट्रीय क्रीडा महासंघ, वैद्यकीय संस्था आणि आंतरराष्ट्रीय संघटनांमधील तज्ज्ञांनी भारताची डोपिंग विरोधी प्रणाली मजबूत करण्यासाठी व्यावहारिक अंतर्दृष्टी व कृतीयोग्य धोरणे सामायिक केली.

# बंगळुरूसमोर पंजाबचे आव्हान

**बंगळुरू, १७ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. या हंगामात घरच्या मैदानावर पहिला विजय मिळवण्यासाठी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसमोर पंजाब किंग्जच्या फिरकी गोलंदाजीचे आव्हान असणार आहे. तेव्हा आरसीबीचे यश, हे त्यांचे फलंदाज युझवेंद्र चहलच्या फिरकीवर कसे नियंत्रण ठेवतात, यावर अवलंबून असेल.

सध्या आयपीएल गुणतालिकेत आरसीबी व पंजाबचे सहा सामन्यात चार विजय आहे व ते प्रत्येकी ८ गुणांसह अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या स्थानावर आहेत. हे दोन्ही संघ आपले अव्वल चार क्रमांकात आपले स्थान मजबूत करण्यास उत्सुक आहे.

अलीकडेच मुल्लानपूर येथे झालेल्या केकेआरविरुद्धच्या सामन्यात युझवेंद्र चहल व ग्लेन मॅक्सवेलने आपल्या जादुई फिरकीने पंजाब किंग्जच्या १११ धावांचा बचाव केला. चहल व मॅक्सवेल व वेगवान गोलंदाज मार्को जॅन्सेनने प्रभावी मारा करत केकेआरला ९५ धावांतच गुंडाळले. केकेआरविरुद्ध चार बळी टिपून चहल आपल्या फॉर्ममध्ये परतला आहे. चहल जादूच्या चेंडूंपेक्षा लांबीच्या चेंडूमध्ये निपूण आहे. लेग-स्पिनर ऑफ-स्टंपच्या बाहेरून चेंडू टाकून त्याला आकर्षित करतो व फलंदाजांना मोठे फटके मारण्यासाठी चेंडूपर्यंत पोहोचावे लागते, त्यामुळे अनेकदा खोलवर झेल घेतले जातात.



तो त्याच्या गोलंदाजीचा वेगही खूप हुशारीने बदलतो व जर त्याला षट्कार मारायचे असतील, तर फलंदाजांना अतिरिक्त मेहनत घ्यावी लागते. मॅक्सवेल सुद्धा असाच एक फिरकीपटू आहे व तो मोठे वळणे किंवा डिपरऐवजी नियंत्रणावर अवलंबून असतो. त्याची ही कौशल्यपूर्ण गोलंदाजी पंजाबसाठी उपयोगी पडू शकते.

आरसीबीकडे कृणाल पांड्या व सुयश शर्मासारखे फिरकी गोलंदाज आहेत. त्यामुळे यजमान संघाला दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

पंजाब संघाकडे अर्शदीप सिंग व मार्को जानसेन यांच्यासारखे सक्षम वेगवान गोलंदाज आहेत, जरी ते विरोधी संघात जोश हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमार यांच्याइतके सुशोभित नाहीत.

**कर्णधार रजत विरुद्ध कर्णधार श्रेयस**

दुसरीकडे, रजत पाटीदार आणि श्रेयस अय्यर यांच्यात फारसे साम्य नाही. अय्यरने आपली क्षमता सिद्ध केली आहे, तो आयपीएल विजेता कर्णधार आहे आणि या स्पर्धेत फलंदाज म्हणून त्याचा उत्कृष्ट रेकॉर्ड आहे. पाटीदार हा आयपीएलमध्ये पहिल्यांदाच कर्णधार झाला आहे, पण त्याच्याकडे समकक्ष फलंदाज म्हणून चमकदार कामगिरी नाही. निकालांची पर्वा न करता त्याने संघाचे नेतृत्व करताना एक आश्वासक संयम दाखवला आहे.



विराट कोहली व हेझलवूड सारख्या सुपरस्टार्सनी भरलेल्या संघाचे नेतृत्व करताना पाटीदारने दबदबा निर्माण न करता अधिकृत भूमिका बजावली आहे. त्याला एका बहुमुखी प्रतिस्पर्ध्याविरुद्ध त्याच्या रणनीतिक व व्यवस्थापकीय सर्वोत्तम कामगिरीचा अनुभव घ्यावा लागेल.

जर एम. चिन्नास्वामीच्या खेळपट्टीने संथगतीचा खेळ कायम ठेवला तर पाटीदार हा एक उत्कृष्ट फिरकीपटू आहे. त्याला चहल व मॅक्सवेलच्या दुहेरी धोक्यालाही नामोहरम करण्याची जबाबदारी स्वतःवर घ्यावी लागेल. अय्यर हा सुद्धा फिरकीच्या सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक आहे, आरसीबीच्या कृणाल व सुयशचा सामना करण्यासाठी पंजाबच्या संघात तो सर्वोत्तम सुसज्ज आहे.

अलिकडेच झालेल्या कमी धावसंख्येच्या रोमांचक सामन्यात केकेआरवर १६ धावांनी विजय मिळवल्यानंतर एक संघ म्हणून पंजाबचा आत्मविश्वास उंचावलेला असेल. पण फलंदाजी आणि गोलंदाजीत मजबूत असलेल्या आरसीबीला पराभूत करणे कठीण प्रतिस्पर्ध्याचे काम असेल, याची पंजाबला चांगली जाणीव असेल. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**पंजाब किंग्ज वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**स्थळ :** एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# सुरुची-सौरभ जोडीचा सुवर्णभेद

**नेमबाजी विश्वचषक**

**लिमा, १७ एप्रिल**

पेरूमधील लिमा येथे आयोजित आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघ (आयएसएसएफ) विश्वचषक रायफल/पिस्तूल/शॉटगन स्पर्धेत सुरुची व सौरभ चौधरी या भारतीय जोडीने १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. या भारतीय जोडीने अंतिम फेरीत याओ कियानक्सुन व हू काई या चीनच्या जोडीला १७-९ असे पराभूत केले. किशोरवयीन सुरुचीचे हे तिसरे विश्वचषक सुवर्ण व सौरभचे नववे पदक आहे. यात मिश्र सांघिक विश्वचषकातील त्याचे पाचवे मिश्र सांघिक सुवर्णपदक व रौप्यपदकाचा समावेश आहे.

लास पाल्मास रेंजमध्ये पात्रता फेरीत या भारतीय जोडीने एकत्रित ५८० गुणांसह सुवर्णपदकाची लढत जिंकली. सुरुचीने सौरभला दोन गुणांनी मागे टाकले. चीनच्या जोडीने ५८५ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. निर्णायक सामन्यातही चीनच्या जोडीने २-६ व ४-८ अशी आघाडी घेतली, त्यानंतर भारतीय प्रशिक्षक समरेश जंग यांनी बोलावलेल्या टाइमआउटमुळे सामन्याच्या गतीत बदल झाला.



सुवर्णपदक विजेते सुरुची सिंग व सौरभ चौधरी

सुरुचीने संपूर्ण सामन्यात उत्कृष्टपणे लक्ष्य साधले व दरम्यान काही वेळा ती १०-रिंग चुकली. तिच्या टोकियो ऑलिम्पियन जोडीदाराने उच्च १० गुणांसह कामगिरी केली.

या जोडीने दहाव्या मालिकेत एकेरी शॉट्सच्या पहिल्या मालिकेनंतर गमावलेली आघाडी पुन्हा मिळवली. आठव्या मालिकेत बरोबरी झाल्यानंतर त्यांनी ११-९ अशी आघाडी घेतली. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. चीनच्या खेळाडूंनी दबावाखाली खेळत प्रथमच चुकीचा खेळ केला. शेवटी सुरुचीने १०.६ अशी, तर सौरभने १०.५ अशी कामगिरी केली, तर चीनचे दोन्ही खेळाडू १०-रिंग मारू शकले नाहीत. यापूर्वी, मनू भाकर व रविंदर सिंग या दुसऱ्या भारतीय जोडीला कांस्यपदकाच्या सामन्यात दुसरी चीनची जोडी- झांग यिफान/मा कियान्के यांच्याकडून ६-१६ असा पराभव पत्करावा लागला. यानंतर मनू भाकर व रविंदर सिंग या दुसऱ्या भारतीय जोडीने चौथे स्थान पटकावले. पात्रता फेरीतही ते ५७९ च्या एकत्रित प्रयत्नांसह चौथ्या स्थानावर होते.

यापूर्वी सुरुचीने सलग दोन विश्वचषक सुवर्णपदके जिंकताना दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकरवर मात केली. मनूला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. (वृत्तसंस्था)

# दक्षिण आफ्रिकेत नीरज चोप्राची दमदार सुरुवात

**८४.५२ मीटरची कामगिरी**

**नवी दिल्ली, १७ एप्रिल**

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राने दक्षिण आफ्रिकेतील पॉचेफस्ट्रूम येथे झालेल्या पॉच इन्व्हिटेशनल ट्रॅक स्पर्धेत विजय मिळवून आपल्या हंगामाची सुरुवात शानदारपणे केली. वर्ल्ड ॲथ्लेटिक्स कॉन्टिनेंटल टूर चॅलेंजर स्पर्धेत चोप्राने ८४.५२ मीटर अंतरावर भाला फेकून सहा जणांच्या क्षेत्रात अव्वल स्थान पटकावले.

भारतीय स्टारने दक्षिण आफ्रिकेच्या २५ वर्षीय डाऊ स्मिथच्या सर्वोत्तम ८२.४४ मीटरच्या कामगिरीला मागे टाकले. पण चोप्राचा प्रयत्न त्याच्या ८९.९४ मीटरच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीपेक्षा कमी होता, तर डाऊ त्याच्या ८३.२९ मीटरच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीच्या जवळ पोहोचला.



या स्पर्धेत ८० मीटरचा टप्पा ओलांडणारे नीरज व स्मित हे दोनच खेळाडू होते. दक्षिण आफ्रिकेचा आणखी एक ॲथ्लिट डंकन रॉबर्टसन ७१.२२ मीटरच्या प्रयत्नासह तिसऱ्या स्थानावर राहिला.चोप्रा त्याचे नवीन प्रशिक्षक झेक प्रजासत्ताकचे जान झेलेझनी यांच्या मार्गदर्शनाखाली पॉचेफस्ट्रूममध्ये प्रशिक्षण घेत आहेत. झेलेझनी हे तीन वेळचे ऑलिम्पिक विजेते व विश्वविक्रमधारक आहेत.२७ वर्षीय नीरज चोप्रा गत वर्षी आपल्या दीर्घकाळचे जर्मन प्रशिक्षक क्लॉस बार्टोनिएझ यांच्यापासून वेगळा झाला. आता नीरज १६ मे रोजी दोहा डायमंड लीगमध्ये आपल्या एलिट-लेव्हल मोहिमेला सुरुवात करणार आहेत.

त्याने २०२० च्या टोकियो (सुवर्ण) आणि २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिक (रौप्य) मध्ये सलग दोन ऑलिम्पिक पदके जिंकलीत. २०२२ मध्ये त्याची ८९.९४ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी झाली आणि तो बराच काळ ९० मीटरचा टप्पा ओलांडण्याचा प्रयत्न करत आहे. (वृत्तसंस्था)

# इंग्लंड दौऱ्यात कडवे आव्हान असेल : रोहित शर्मा

**नवी दिल्ली, १७ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीग-२०२५ (आयपीएल) हंगामाच्या समाप्तीनंतर इंग्लंड दौऱ्यामध्ये भारतीय संघासमोर चांगले आव्हान असेल व संघाला या आव्हानाची उत्सुकता आहे, असे कर्णधार रोहित शर्मा म्हणाला.



२० जूनपासून हेडिंग्ले क्रिकेट मैदानावर सुरू होणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी भारत थ्री लायन्सचा दौरा करणार आहे. हेडिंग्ले येथे भारती संघ २००७ नंतर देशात त्यांची पहिली कसोटी मालिका जिंकण्याची आशा बाळगत आहे.

नक्कीच, गेल्या वेळी आम्ही या खेळाडूंशी खेळलो होतो तेव्हा मालिकेत २-२ अशी आघाडी होती. हो, आम्हाला यापैकी काही खेळाडूंना शंभर टक्के तंदुरुस्त राहण्याची आवश्यकता आहे. आमची मालिका उत्तम असेल आणि मला माहिती आहे की हे खेळाडू आजकाल कोणत्या प्रकारचे क्रिकेट खेळत आहेत. आमच्यासाठी हे निश्चितच एक चांगले आव्हान असेल, असेही तो म्हणाला.

इंग्लंड मालिकेदरम्यान भारतीय कर्णधारावर निश्चितच टीका होईल, विशेषतः २०२४-२५ च्या बॉर्डर गावस्कर चषक मालिकेत भारताच्या शेवटच्या कसोटी सामन्यात, जेव्हा कर्णधाराने पाच सामन्यांच्या मालिकेत केवळ ३१ धावा केल्या होत्या. रोहितने पहिली कसोटी गमावली होती आणि त्याच्या वाईट फॉर्ममुळे पाचव्या आणि मालिकेतील निर्णायक सामन्यातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. रोहितच्या जागी शुभमन गिलला संधी मिळाली, यात त्यांना सहा गड्यांनी पराभव पत्करावा लागला.

मला स्वतःशी प्रामाणिक राहावे लागले. मी चेंडू चांगला मारत नव्हतो. इतर काही खेळाडू देखील संघर्ष करत होते आणि आम्हाला खरोखर गिलने खेळावे अशी इच्छा होती. तो खूप चांगला खेळाडू आहे आणि त्याने मागील कसोटी गमावली होती, म्हणून आम्हाला वाटले की तो संधीला पात्र आहे, असे तो म्हणाला.

तुम्ही संघाला प्रथम स्थान देण्याचा प्रयत्न करता, संघाला काय हवे आहे ते पाहता व त्यानुसार निर्णय घेता. कधीकधी ते कार्य करते, कधीकधी ते होत नाही, ते असेच चालते. तुम्ही घेतलेला प्रत्येक निर्णय यशस्वी होण्याची किंवा तो योग्य असेल याची कोणतीही हमी नसते. तुम्ही केवळ संघासाठी जे चांगले वाटते तेच करता, असे रोहितने सांगितले. (वृत्तसंस्था)



# सूर्यनमस्कार स्पर्धेत लोकमंगल प्रशालेच्या तिघींची कामगिरी

## प्रणाली चव्हाण प्रथम तर वैष्णवी, अस्मिता द्वितीय व तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

राणी कित्तूर चन्नम्मा स्मारक भवन समिती सोलापूर यांच्या वतीने नूमवि शाळा डफरीन चौक येथे झालेल्या वैयक्तिक सूर्यनमस्कार स्पर्धेत लोकमंगल माध्यमिक प्रशालेच्या तिघींनी उल्लेखनीय कामगिरी केली.

आठवी ते दहावीच्या वयोगटात ४०० सूर्यनमस्कार घालत प्रणाली संतोष चव्हाण हिने प्रथम क्रमांक पटकाविला. पाचवी ते सातवीच्या वयोगटातून वैष्णवी संतोष चव्हाण हिने ३०० सूर्यनमस्कार घालत दुसरा तर अस्मिता मोरेने ४०० सूर्यनमस्कार घालत तृतीय क्रमांक पटकाविला. या खेळाडूंना रतिकांत म्हमाणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे लोकमंगल समूहाचे अध्यक्ष सुभाषबापू देशमुख, अवंती शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप साठे, कार्यकारी संचालक अभयसिंह साठे, मुख्याध्यापिका शुभांगी साठे व शिक्षक वृंदांनी अभिनंदन केले.

# मॅकगर्क सामन्याला कलाटणी देणारा खेळाडू : अक्षर पटेल

**नवी दिल्ली, १७ एप्रिल**

जॅक फ्रेझर-मॅकगर्कने या हंगामात अद्याप चांगली कामगिरी केलेली नाही, परंतु एकदा तो लयीत आला की तो सामन्याला कलाटणी देणारा खेळाडू ठरेल, असा विश्वास दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने व्यक्त केला.

दिल्ली कॅपिटल्स संघाला डळमळीत सुरुवातीचा सामना करावा लागला आहे. गत वर्षी आपल्या पहिल्याच हंगामात आपल्या पॉवर-हिटिंगने स्पर्धेत चमक दाखवणारा २३ वर्षीय सलामीवीराची बॅट या आवृत्तीत तळपली नाही.

राजस्थान रॉयल्सविरुद्ध दिल्ली कॅपिटल्सच्या नाट्यमय सुपर ओव्हर विजयातही मॅकगर्कचा वरच्या स्थानावरील संघर्ष सुरूच राहिला. कारण या हंगामात तो पाचव्यांदा पॉवरप्लेमध्येच बाद झाला.

माझे मत वेगळे आहे. जर तुम्ही चांगली सुरुवात केली नाही, तरी आम्ही अजूनही चांगली कामगिरी करत आहोत. त्यामुळे एकाच संघातून खेळण्याची संधी आहे, असे अक्षर म्हणाला.

मॅकगर्क इतका चांगला खेळाडू आहे की ज्या दिवशी तो खेळायला सुरुवात करेल तेव्हा तो सामन्याला कलाटणी देईल, असा त्याने पुनरुच्चार केला. (वृत्तसंस्था)

**स्वतःच्या कर्णधारपदावर अक्षर खुश**



आयपीएल अर्ध्या टप्प्यात पोहोचत असताना अक्षर पटेल हा आनंदी अष्टपैलू खेळाडू स्पर्धेतील सर्वात यशस्वी कर्णधार म्हणून उदयास आला आहे. त्याने सहा सामन्यांपैकी पाच सामन्यांमध्ये आपल्या संघाला विजय मिळवून दिला आहे. मी राज्य क्रिकेटसाठी कर्णधार होतो, मला काय करायचे आणि काय करू नये हे माहित आहे. जेव्हा तुम्हाला तुमच्या मनाप्रमाणे संघ चालवण्याची आणि तुम्हाला हवे तसे खेळण्याची संधी मिळते तेव्हा संधीचा फायदा का घेऊ नये, असे अक्षर म्हणाला.

# महाराष्ट्र विद्यालयातील जलतरणपटूंची ऐतिहासिक कामगिरी



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ एप्रिल -**

१४ वर्षाखालील इयत्ता आठवीमधील स्वराज्य डोईफोडे, जयसिंह शिंदे, माधव शिंदे या जलतरणपटूंनी श्रीलंकेपासून भारतापर्यंत पाल्क समुद्रधुनी ३० किलोमीटर खुल्या समुद्रात पोहण्याचा ऐतिहासिक विक्रम केला आहे.

या आधी विजयदुर्ग, मालवण, पोरबंदर आणि कोची येथे सागरी जलतरणात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. तसेच शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये देखील चमकदार कामगिरी केली आहे.

या ऐतिहासिक कामगिरीबद्दल विद्यालयाच्यावतीने खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. या खेळाडूंना पी.डी. पाटील, योगेश उपळकर व विकास पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व खेळाडूंना संस्थेचा कर्मवीर जलतरण तलाव सरावसाठी नेहमी उपलब्ध होता.

या यशाबद्दल सर्व जलतरणपटूंचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, संस्थेचे सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी.पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए.पी. देबडवार, संस्थेचे खजिनदार तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ मिराताई यादव, एस.बी. शेळवणे, संस्था सदस्य, विद्यालयाच्या प्राचार्या के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस.सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी. साठे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# सोलापूर महिला क्रिकेट संघ उपांत्य फेरीत दाखल

## पुण्याच्या दिलीप वेंगसरकर संघाशी आज लढत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १९ वर्षाखालील महिलांच्या क्रिकेट स्पर्धेत सोलापूर जिल्हा संघाने सलग तिसऱ्या विजयासह उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत त्यांची लढत शुक्रवारी पुण्याच्या दिलीप वेंगसरकर संघाशी पडेल.


आर्या उमाप


पूनम माशाळे

पुणे येथे सुपर लीग पद्धतीने सुरू असलेल्या या स्पर्धेत गुरुवारी सोलापूरने परभणी संघावर १० गडी राखून दणदणीत विजय मिळविला. पूनम माशाळे हिच्या माऱ्यांसमोर परभणीचा डाव ७१ धावात गडगडला. पूनम माशाळे ५ बळी टिपले, भक्ती पवार, विभावरी देवकते प्रतीक्षा नंदर्गी व साक्षी लामकाने यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. विजयी ७२ धावांचे लक्ष्य सोलापूरच्या आर्या उमाप हिने (नाबाद ४९) व भक्ती पवार (नाबाद १६) यांनी गाठले.

सोलापूरला स्नेहल जाधव, किरण मणियार, मानसी जाधव, सारिका कुरुलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

संघास सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील, संयुक्त सचिव धैर्यशिल मोहिते पाटील व चंद्रकांत रेंबर्सू यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.




# मारिया क्लब व परेल वर्कशॉप उपांत्य फेरीत

## रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

मध्य रेल्वे इन्स्टिट्युटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत मारिया क्रिकेट क्लब व परेल वर्कशॉप मुंबईने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात गुरुवारी झालेल्या सामन्यात मारिया क्रिकेट क्लबने हैदराबाद कर्नाटका क्रिकेट क्लबला ८ धावांनी नमविले. अष्टपैलू कामगिरी करणारा ब्रिजेश कुमार (८१ धावा व ३ बळी) सामन्याचा मानकरी ठरला.

दुसऱ्या सामन्यात परेल वर्कशॉप मुंबईने मध्य रेल्वे सोलापूर ब संघाचा २ गडी राखून पराभव केला. रोशन परते (२५ धावा व २ बळी) सामनावीर ठरला. हे पुरस्कार पंच असोसिएशनचे अध्यक्ष नंदकुमार टेळे व परेल वर्कशॉपचे रमेश ढाले यांच्या हस्ते देण्यात आला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून सचिन गायकवाड व मजहर मंगोली आणि नंदकुमार टेळे व नवीन माने तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक:** **मारिया क्रिकेट क्लब:** २० षटकांत ९ बाद १४० (ब्रिजेश कुमार ८१, शहजाद शाह २४, देवा ठाकूर १६, व्ही. नितीश ४ बळी, एमडी खदिर, नागराज व रोहन राठोड प्रत्येकी १ बळी) वि. वि. **एच.के.सी.सी. :** १९.३ षटकांत सर्व बाद १३२ (व्ही. नितीश २८, सी. मारुती २८, एल. इनित २१, ब्रिजेश कुमार ३ बळी, एस रजपांडी, रवींद्र राय व देवा ठाकूर प्रत्येकी २ बळी). **सेंट्रल रेल्वे (ब) :** २० षटकांत ६ बाद १४४ (समीर शेख ४९, श्रीकांत खोत ४८, मनीष द्रुव नाबाद १५, रोशन परते २ बळी, अभिषेक सिंग व रिशब शर्मा १ बळी) पराभूत विरुद्ध **परेल वर्कशॉप, मुंबई :** १९.३ षटकांत ८ बाद १४७ (रुपेश अंबोकर ३६, रोशन परते २५, राहुल सावंत व रवींदर सिंग प्रत्येकी १९ धावा, समीर शेख ३ बळी, मनीष द्रुव २ बळी, दिगंबर माने व संभाजी चौधरी प्रत्येकी १ बळी).

**आजचे उपांत्य सामने**

१) साऊथ सोलापूर ओल्ड विरुद्ध परेल वर्कशॉप मुंबई

२) के.बी.एन.सी.ए. विरुद्ध मारिया क्रिकेट क्लब

## महत्वाचे...

### तरुणाबरोबर झालेल्या तक्रारीतून तरुणीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर :** तरुणाबरोबर झालेल्या तक्रारीनंतर संतापलेल्या तरुणीने सडा मारण्याचा पिवळा रंग प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार बुधवारी १६ एप्रिल रोजी घडला.लक्ष्मी नागराज पेनगोंडा (वय २९, रा. लक्ष्मी चौक, जुना विडी घरकुल) असे तरुणीचे नाव आहे. बुधवारी सकाळच्या सुमारास लक्ष्मी हिची शेखर नावाच्या तरुणाबरोबर तक्रार झाली होती. या तक्रारीनंतर संतापलेल्या लक्ष्मी हिने अक्कलकोट रोडवरील पाणी टाकी जवळील स्मशानभूमी येथे दारात सडा मारण्याचा पिवळा रंग प्राशन केला. यात तिला त्रास होऊ लागल्याने आई पद्मा यांनी दुपारी ४.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### स्वत:च हातावर अन् गळ्यावर करून घेतल्या जखमा

**सोलापूर :** अज्ञात कारणातून स्वत:ला चाकूने गळ्यावर आणि हातावर मारून घेऊन जखमी करून घेतले. हा प्रकार कुमठा नाका परिसरातील पंचशिल नगरात बुधवारी रात्री ८ वाजता घडला.दिपक पांडुरंग सोनवणे (वय ३१) असे तरुणाचे नाव आहे. बुधवारी रात्री राहत्या घरात असताना अचानकपणे दिपक याने त्याच्याकडील चाकूने गळ्यावर आणि हातावर वार करून घेऊन स्वत:ला जखमी केले. यात त्रास होऊ लागल्याने भाऊ सागर याने रात्री ९.२० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकी घसरल्याने माळशिरस येथील दोघे जखमी

**सोलापूर :** दुचाकीवरून वेळापूर ते खंडाळी असे जाताना दुचाकी घसरून झालेल्या अपघातात माळशिरस येथील दोघे जखमी झाले. हा अपघात बुधवार १६ रोजी रात्री १० वाजता घडला.सचिन मनोहर साठे (वय २८) व तात्या बिटू खंडागळे (वय ३५, दोघे रा. माळशिरस) अशी जखमी झालेल्याची नावे आहेत. सचिन आणि तात्या हे दोघे बुधवारी रात्री १० च्या सुमारास वेळापूर ते खंडाळी असे दुचाकीवरून जाताना, वेळापूरजवळ ते जात असलेली दुचाकी रस्त्यावर घसरली. यात खाली पडल्याने सचिनच्या चेह-याला खरचटले तर डोक्याला मुकामार लागला. तर तात्याच्या उजव्या कानाला जखम झाली तसेच डाव्या हाताला मार लागल्याने अकलूज येथे उपचार करून ते दोघे शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कासेगाव यात्रेत हलगी वाजवण्याच्या कारणावरून पाच जणांना मारहाण

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथे शंभु महादेव यात्रेत हलगी वाजवण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून पाच जणांना बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार बुधवारी रात्री



११.५० वाजता घडला. प्रसाद प्रभाकर गायकवाड ( वय २३), सौरभ महालिंग गायकवाड (वय २३ , रा. कासेगाव ता. द. सोलापूर), समर्थ कोंडिबा गायकवाड (वय १९ , रा. नेहरू नगर, सोलापूर), सूर्यभान महादेव गायकवाड (वय १९) व ओंकार लक्ष्मण गायकवाड (वय १७, रा. कासेगाव ता. द. सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. कासेगावात बुधवारी शंभुमहादेवाची यात्रा होती. त्यादिवशी रात्री ११.५० वाजता हलगी वाजवण्याच्या कारणावरून त्यांचा वाद झाल्याने त्यांना अमोल बबन जाधव, तुषार जाधव व इतर १५ ते २० जणाच्या जमावाने लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात पाच जणांना सर्वांगास मुकामार लागल्याने मध्यरात्री २.४० वाजता येथे उपचारासाठी दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### ढोकबाभुळगावात तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर :** मोहोळ तालुक्यातील ढोकबाभुळगाव येथे अज्ञात कारणातून तरुणाने कोणत्यातरी गोळ्या खावून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार बुधवारी रात्री १० वाजता घडला.महेश अशोक पवार (वय २८) असे तरुणाचे नाव आहे. बुधवारी रात्री १० वाजता घरी असताना महेश याने अज्ञात कारणातून कोणत्या तरी २० गोळ्या खाल्ल्या. मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेऊन रात्री १२.५० वाजता भाऊ बापू पवार याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## निधन वृत्त...

### चंद्रकांत मंद्रुपकर



**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

पोलिस खात्यातील जुने अधिकारी कर्णिक नगरमधील रहिवासी कै. चंद्रकांत चनबसय्या मंद्रुपकर (स्वामी) वय वर्ष (८७) यांचे दीर्घ आजाराने ८ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले, सुना व एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### सैफन जमादार



**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

येथील सैफन बाशासाब जमादार (वय ७९, वर्ष, रा. आपना नगर, नई जिंदगी, मजरेवाडी, सोलापूर, मूळ राहणार हैद्रा, ता.अक्कलकोट) यांचे दि. १६ एप्रिल रोजी दुपारी एक वाजता राहत्या घरी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सात रस्ता येथील मोदी मुस्लिम कब्रस्तान मध्ये दफनविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर आरटीओ कार्यालयातील लिपिक महीबूब जमादार यांचे ते वडील होत.

### शैलेंद्र माने



**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

बी.बी सोनी नगर सोरेगाव येथील शैलेंद्र माने यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक सून असा परिवार आहे. ते जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून सेवेत होते.

# मंद्रूप-सोलापूर बस सेवेचा प्रश्न ऐरणीवर

## संध्याकाळच्या वेळेस एसटी बस सुरु करण्याची शिवसेनेची (उबाठा) मागणी; सामाजिक कार्यकर्तेही सक्रिय

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**
**मंद्रूप, दि. १७ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप हे एक मोठं बाजारपेठेचं गाव असून, परिसरातील भंडारकवठा, लवंगी, निंबर्गी, सादेपूर, विंचूर, कुसूर, येळेगाव, कंदलगाव या गावांचे शैक्षणिक, वैद्यकीय आणि दैनंदिन व्यवहार मंद्रूपमार्गे सोलापूर शहरात होतात. मात्र, मंद्रूपहून सोलापूरकडे संध्याकाळच्या वेळेस सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विशेषत: काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाला, विद्यार्थ्यांना आणि आजारी नागरिकांना रात्रीच्या वेळेस परतीची बस नसल्यामुळे अडचणी निर्माण



होत आहेत.

या पार्श्वभूमीवर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने सोलापूर एसटी आगारप्रमुख यांना निवेदन देण्यात आलं. संध्याकाळी आठ ते दहा या वेळेत मंद्रूपमार्गे सोलापूरसाठी एसटी बस सेवा सुरू करण्यात यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले, उपजिल्हाप्रमुख रविकांत कांबळे, युवासेना उपजिल्हाप्रमुख खंडू सलगरकर, उपशहर प्रमुख संतोष घोडके, रोहित तळवळकर, विक्री खंडागळे, शिवा नाईक उपस्थित होते.



रस्ता हरवलेली व्यवस्था
भाग-३

मंद्रूप हे अनेक गावांसाठी केंद्रबिंदू आहे. येथून दररोज शेकडो नागरिक सोलापूरला प्रवास करतात. त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी संध्याकाळची बस सेवा अत्यंत आवश्यक आहे. राजकीय पक्षांनी पुढाकार घेतला आहे, आता प्रशासनानेही गांभीर्याने पावलं उचलावीत. नागरिकांना होणाऱ्या गैरसोयी पाहता लवकरात लवकर ठोस उपाययोजना कराव्यात. लवकरात लवकर मंद्रूप ते सोलापूर आणि मंद्रूप ते सोलापूर संध्याकाळची बस सेवा सुरू करण्यात यावी

**- अनमोल केवटे, सामाजिक कार्यकर्ते**

जिल्ह्यातील इतर तालुक्यांशी तुलना केली असता, दक्षिण सोलापूरकडे फारच कमी एसटी बस सेवा उपलब्ध आहे. मंद्रूपला उशिरापर्यंत सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध झाल्यास औराद, होनमुर्गी, बसवनगर, वडकबाळ, वांगीसह परिसरातील अनेक छोट्या गावांतील प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. संध्याकाळी आठ ते दहा या वेळेमध्ये एसटी बससेवा सुरू झाल्यास व्यापारी वर्गालाही चालना मिळेल.

**- सुरज खडाखडे, सामाजिक कार्यकर्ते**

## अन्नछत्र मंडळाचे महाप्रसाद सेवेसह मोठे कार्य

### मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १७ एप्रिल-**

राज्यातील एक अग्रगण्य संस्था असलेल्या स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात महाप्रसाद सेवेसह सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रातील कार्य महत्वाचे असल्याचे मनोगत राज्याचे मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केले. त्यांच्या सम वेत आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजीभाऊ पवार हे उपस्थित होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली



व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून हे कार्य राज्यातील एक आदर्श असल्याचे ते म्हणाले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत अमोलराजे भोसले यांच्या हस्ते मंत्री राणे व आमदार पडळकर यांचा श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, पुष्पहार श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. आमदार पडळकर यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने गेल्या ३८ वर्षात दिव्यांग व निराधारांना समर्थ महाप्रसादसेवा तसेच शहर व तालुक्यातील कुस्तीगीरांसाठी प्रसादरूपी खुराक दिल्याबद्दल कौतुक केले. यावेळी गोरक्षक सुधीर बहिरगोंडे, ओम साई प्रतिष्ठानचे शिवराज गायकवाड, मिलन कल्याणशेट्टी, अभिषेक लोकापुरे, कांतु धानशेट्टी, सुनिल कटके, प्रथमेश पवार, राजेंद्र बंदीछोडे, बाबुराव जानकर, अम ोल कारंडे, माऊली हळणकर, उम ेश पांढरे, महेश कोकरे, सिद्धेश्वर जाधव, नागेश कलशेट्टी, सिद्धेश्वर माळी, प्रथमेश जोजन, योगेश कटारे, राहुल जोजन, न्यासाचे सचिव शामराव मोरे काका, सौरभ मोरे, मनोज निकम, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, उपस्थित होते.

## राष्ट्रवादीच्या एकीकरणाचे काहीही मागितले नाही

### प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे : पंढरपूरात सहकुटूंब घेतले विठ्ठल दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर ,दि.१७ एप्रिल -**

राष्ट्रवादीच्याएकीकरणासंदर्भात अजित पवार व शरद पवार यांची राष्ट्रवादी पुन्हा एकत्र यावी यासाठी मी विठुरायाला कोणतेही मागणे घातलेले नाही आणि ते घालण्याचे कोणतेही कारण नाही असे मोठे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज पंढरपूर येथे केले.

श्री. तटकरे गुरुवारी सहकुटुंब विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी पंढरपुरात आले होते. दर्शनानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. आमचे नेते अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली मी, छगन भुजबळ,



प्रफुल्ल पटेल आदींनी मिळून एनडीए सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय आहे. उद्याच्या राजकीय भविष्यासाठी आम्ही हा निर्णय घेतला आहे. त्यात आम्हाला यश मिळत राहो. या विचारांशी जे असतील त्यांच्या सोबत आम्ही आहोत असेही त्यांनी सांगितले. श्री. तटकरे यांच्या विधानामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील अशी शक्यता कमी असल्याची चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान तटकरे यांच्या बरोबर दीपक साळुंखे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा रत्नमाला गायकवाड तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्री. तटकरे यांचा सत्कार केला.

## श्री.वटवृक्ष स्वामी देवस्थान राणे कुटुंबीयांचे श्रद्धास्थान

### मंत्री नितेश राणे : अक्कलकोट मंदिरात घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१७ एप्रिल-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे श्री स्वामी समर्थांचे म ूळस्थान आम्हा राणे कुटुंबीयांचे मुख्य श्रद्धास्थान असल्याचे मनोगत महाराष्ट्र राज्याचे मत्स्य उद्योग व बंदरे विकास मंत्री व सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केले. ते आज येथील श्री स्वामी समर्थांचे मूळस्थान असलेल्या श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी ना.नितेश राणे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी ना.राणे बोलत होते. पुढे बोलताना ना.राणे यांनी

श्री.स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन मला आनंद तर झालेला आहेच, परंतु



वयोवृद्ध, ज्येष्ठ, दिव्यांग भाविकांसाठी मंदिरात असलेली स्वतंत्र दर्शन व्यवस्था पाहून मन प्रसन्न झाले असल्याचे सांगून मंदिर समितीचे हे कार्य अत्यंत पुण्याईचे असल्याचे मनोगत व्यक्त करून श्री.स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त मंदिर समितीच्या वतीने घेण्यात येत असलेल्या धार्मिक कार्यक्रमांबद्दल जाणून घेवून मंदिर समितीचे उपक्रम गौरवास्पद असल्याचे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजीभाऊ पवार, पो.नि. राजेंद्र टाकणे, गोरक्षक सुधीर बहिरगोंडे, मंदिर समीतीचे सचिव आत्म ाराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथम ेश इंगळे, ओम साई प्रतिष्ठानचे शिवराज गायकवाड, मिलन कल्याणशेट्टी, अभिषेक लोकापुरे, कांतु धनशेट्टी, सुनिल कटके, प्रथमेश पवार, राजेंद्र बंदीछोडे, बाबुराव जानकर, अमोल कारंडे, माऊली हळणकर, उमेश पांढरे, महेश कोकरे, सिद्धेश्वर जाधव, नागेश कलशेट्टी, सिद्धेश्वर माळी, प्रथमेश जोजन, योगेश कटारे, राहुल जोजन, श्रीशैल गवंडी आदी उपस्थित होते.

## पोलीस उपनिरिक्षक अजीम शेख यांचा उत्तम सेवेबद्दल सत्कार

**श्रीपूर, दि. १७ एप्रिल-**

कोंढारपट्टा- नेवरे (ता. माळशिरस) येथील रहिवाशी व सध्या मुंबई येथे पोलीस उपनिरीक्षक असलेले अजीम शेख यांनी ३२ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीस कर्नाटकातील मंगलोर येथून शिताफीने अटक केल्याबद्दल मुंबईचे पोलीस सहआयुक्त सत्यनारायण यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांना गौरवण्यात आले.

पोलीस उपनिरीक्षक शेख हे सध्या म ुंबईमध्ये डॉ.डी.बी. मार्ग पोलीस ठाण्यात सेवा बजावत आहेत. त्यांच्या कार्यक्षेत्रातील संजीवा मुतु शेट्टी हा आरोपी ३२ वर्षांपासून फरार होता. त्याला पकडण्यासाठी पोलिसांनी विशेष पथक नियुक्त केले होते. त्याचे नेतृत्व पोलीस उपनिरीक्षक शेख यांच्याकडे होते. पोलीस उपायुक्त डॉ. मोहितकुमार गर्ग, सहाय्यक पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर वाघ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गायकवाड, पोलीस निरीक्षक विलास भोसले व जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेख, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश बागल, पोलीस हवालदार विनोद म्हात्रे, पोलीस कॉन्स्टेबल प्रवीण राठोड व सागर दिवटे यांच्या



पथकाने आरोपी शेट्टी याचा सायबर तंत्रज्ञाने व आपल्या गोपनीय बातमीदारांमार्फत सुगावा लावून त्याला मंगलोर येथील उलाल पोलीस ठाण्याच्या हद्दीतून सापळा रचून अटक केली. त्यामुळे ३२ वर्षांपासून मुंबई पोलिसांना हवा असलेला आरोपी सापडला आहे. पोलीस उपनिरीक्षक शेख यांच्या नेतृत्वाखालील पोलीस पथकाने ही कामगिरी यशस्वी केल्यामुळे शेख व त्यांच्या सहकाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले आहे.

## मानसिक त्रासाला कंटाळून एकाची आत्महत्या

### अनगरमधील घटना; १३ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मोहोळ,दि.१७ एप्रिल-**

शेतीच्या वादामुळे होत असलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या करत असल्याचा मेसेज टाकून एकाने आत्महत्या केली असल्याने आई, वडील, भाऊ, वहीणीसह १३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १६ एप्रिल रोजी सकाळी साडेआठ वाजण्यापूर्वी घडली.

याबाबत मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार अनगर( ता. मोहोळ) येथील सिद्धेश्वर सत्यवान गुंड (वय ३५ ) यांने शेताचे वादावरुन होत असलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून हे पाऊल टाकत आहे असे मेसेजद्वारे कळवुन गळफास घेतला. याबाबत घरातील लोकांनी माझ्या जावयास आत्म हत्येस प्रवृत्त केल्यामुळे माझ्या जावयाने स्वतःचे शेतातील जांभळाच्या झाडाला गळफास घेवून आत्म हत्या केली आहे. अशा आशयाची फिर्याद शिवाजी सुर्यभान सालगुडे (रा. कुरणवाडी) यांनी मोहोळ पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. त्यामुळे वडील सत्यवान गुंड, आई इंदु, भाऊ बळीराम उर्फ दादा गुंड, वहीनी बनिता (चौघे रा.अनगर, ता. मोहोळ) बहीण सुरेखा लटके, नंदवा अंकुश लटके (रा. अंजनगाव (खे), ता. माढा), भाऊ बळीराम याचे मसाला संतोष शेंबडे (रा. कोन्हेरी, ता. मोहोळ), भाऊ बळीराम याचे मावस सासु प्रमिला सगरे (रा. अनगर, ता. मोहोळ), मामा हनुमंत पवार (रा.बिटले, ता. मोहोळ), शेजारी ज्ञानदेव सरक (रा.अनगर, ता. मोहोळ), चुलत भाऊ गजानन गुंड व दत्तात्रय मुहूरा. दिवाण (रा. भोसे, ता. पंढरपूर), चुलत बहीण रेणुका डोके (रा. सोलापूर) या तेरा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पीएसआय करणेवाड करित आहेत.

## शेटफळ येथे शॉक लागून एकाचा मृत्यू तर दोघे जखमी

### तीन अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ,दि.१७ एप्रिल-**

तुटन पडलेल्या तारेचा शॉक लागून एकाचा मृत्यू तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना शेटफळ येथे घडली असून याबाबत एमएसईबीच्या तीन अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहितीनुसार शेटफळ येथील एमएसईबी डी पी जवळ शेती गट नंबर १३ लगत असलेल्या एमएसईबी डीपीला आग लागले असल्याने ते विझवण्यासाठी मनोज



विलास डंके, आबासाहेब नामदेव खडके, नामदेव चंद्रकांत खडके व सिद्धू खडके तेथे गेले होते. आग विझवून परत येत असताना मनोज डंके हा तुटून पडलेल्या तारेचा शॉक लागून खाली पडला. त्यास नामदेव खडके व अरुण भोसले यांनी पकडल्याने त्यांनाही शॉक लागून ते जखमी झाले. आबा खडके यांनी धावत जाऊन डीपीतील फ्युज काढले आणि म नोज डंके यास उपचारास दाखल केले असता उपचारा पूर्वी मयत झाला. ही घटना १५ एप्रील रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत मोहोळ पोलिस ठाण्यात अरुण अर्जुन भोसले यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार मनोज डंके याच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या एमएसईबीचे अधिकारी कलशेट्टी नेमणूक तालुका अधिकारी मोहोळ, पुरुषोत्तम ढेरे नेमणूक सहाय्यक अभियंता सब शाखा शेटफळ कार्यालय, राठोड उपविभागीय कार्यालय अभियंता सोलापूर यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पीएसआय चव्हाण हे करित आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत



## 'उत्तर' मधील ग्रामपंचायत सरपंच पदाची २२ एप्रिलला आरक्षण सोडत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील सन २०२५ ते सन २०३० या कालावधीमध्ये मुदत संपणा-या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी दुपारी १२.०० वाजता बहुउद्देशिय सभागृह जुने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सन २०२५ ते सन २०३० या कालावधीमध्ये मुदत संपणा-या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी महाराष्ट्र ग्राम पंचायत (सरपंच/उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मध्ये सरपंच पदाच्या आरक्षणबाबत तरतुदी निश्चित केल्या आहेत. सदर नियमान्वये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग, खुला व महिला (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व नागरीकांचा मागास प्रवर्गाच्या स्त्रीयांसह ) सरपंच पदे निश्चित करावयाची आहेत. तालुक्यातील पदाधिकारी व नागरिकांनी ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडत कार्यक्रमास निश्चित केलेल्या दिनांकास वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन तहसिलदार, उत्तर सोलापूर यांनी केले आहे.




# रेशन दुकानदारांची जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी घेतली झडती



### सुनावणीत १६५ दुकानदारांचे म्हणणे घेतले जाणून

### २४ एप्रिलपर्यंत ई-केवायसी वाढविण्याची दिली डेडलाईन

#### नोटीस देवूनही न आलेल्यांना २४ तारखेची दुसरी नोटीस

आजच्या सुनावणीसाठी नोटीस देवूनही जे दुकानदार उपस्थित राहिले नाहीत त्यांना पुन्हा दुसरी नोटीस पाठविली आहे. यावेळी त्यांना आजच्या झालेल्या बैठकीची माहिती दिली असून, त्यांना या आठवड्यात ई-केवायसीमध्ये सुधारणा करून दप्तर घेवून येण्यास सांगितले आहे. जर पुढील तारखेला पुन्हा ई-केवायसीबाबत दिलेल्या सुचनानुसार काम न केल्यास संबंधित दुकानदारांवरही कारवाई करण्याचा इशारा सरडे यांनी दिला आहे.

#### कॉल सेंटरवर येणाऱ्या तक्रारींचीही घेणार दखल

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात एआय कॉल सेंटर सुरू केले आहे. या कॉल सेंटरवरून रोज २ हजारांहून अधिक लोकाना रोजच कॉल जात असून, याद्वारे रेशन दुकानात मिळणाऱ्या स्वस्त धान्याबाबत माहिती संकलीत केली जात आहे. नागरिकांच्या तक्रारी, सुचना, लाडकी बहीण योजना आदींची माहिती घेतली जात आहे. दरम्यान, या कॉल सेंटरवर नोंदल्या गेलेल्या राशन दुकानदारांच्या तक्रारींचा पाठपुरावा करून दुकानदार दोषी आढळल्यास कारवाई करणार असल्याच्या सुचनाही जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिल्या आहेत. दरम्यान, या 'एआय' योजनेमुळे धान्य वितरणात अधिक पारदर्शकता येणार आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांची ई-केवायसी करायच्या कामात हयगय केलेल्या ११ तालुक्यातील तब्बल १६५ राशन दुकानदारांना बोलावून ई-केवायसीबाबत जाब विचारत जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी आज (दि. १८) या धान्य दुकानदारांची चांगलीच झडती घेतल्याची माहिती अधिकृत सुत्राकडून देण्यात आली.

याबाबतचे अधिक वृत्त असे की, शासन जीआरप्रमाणे गेल्या ३ ते ४ महिन्यापासून शहर आणि जिल्ह्यातील राशन दुकानांतून शिधापत्रिकाधारकांसाठी ई-केवायसी करण्याची मोहीम चालू आहे. ही मोहीम पूर्ण करण्यासाठी ३० एप्रिल अंतिम मुदत आहे. इतका मोठा कालावधी मिळूनही जिल्ह्यातील तब्बल १६५ राशन दुकानदारांनी त्यांच्या दुकानातून ३० ते ५० टक्केपर्यंतच ई-केवायसी पूर्ण केली आहे. यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी अशा दुकानदारांना नोटिसा पाठवून आज गुरूवारी सुनावणीसाठी बोलावले होते. यावेळी सरडे यांनी प्रत्येक दुकानदारांचे म्हणणे ऐकून घेवून त्यांना येत्या २४ तारखेपर्यंत राहिलेली ई-केवायसी पूर्ण करण्याची मुदत दिली आहे. यावेळी काही दुकानदारांनी आपल्या भावना पुरवठा अधिकाऱ्यांकडे मांडल्या. आम्ही फोन करून कार्डधारकांना बोलावतो मात्र ते येत नाहीत, काही ग्राहकांचे अंगठे पॉस मशीन घेत नाही, घरी जावून आलो तरी त्यांची भेट होत नाही...अशाही तक्रारी मांडल्या.

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी या सप्ताहात पुन्हा एकदा ई-केवायसीसाठी प्रयत्न करा आणि ज्या ग्राहकांचे जसे अनुभव आले तसेच रेकॉर्डवर घ्या आणि हे रेकॉर्ड २४ एप्रिलला माझ्याकडे घेवून या असा आदेश दिला आहे.

कारण आपल्या जिल्ह्यात आजतागायत ७५ टक्केच ई-केवायसी झाली आहे. यामुळे या दुकानदारांना पुन्हा २४ एप्रिलला पुढील सुनावणीसाठी सोलापूरची वारी करावी लागणार आहे. दरम्यान, ई-केवायसीमध्ये हयगय करणाऱ्या दुकानदारांना आज नोटिसा देवून बोलावून घेताच काही माजी आमदार, आमदार आणि इतर काही नेत्यांचे फोनही जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना आले आणि दुकानदारांवर कारवाई करू नका, अशा सुचनाही आल्या.




## विकास बँक बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या चेअरमनपदी सीए राज मिणियार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

विकास सहकारी बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटला रिझर्व बँक ऑफ इंडियाची मान्यता मिळाली असून त्याच्या चेअरमनपदी सीए राज मिणियार यांची निवड करण्यात आली.

सीए सुनील माहेश्वरी, सीए सुभाष महेश, प्रा. प्रवीण बजाज, बँकेचे चेअरमन कमलकिशोर राठी व संचालक मनीष बलदवा असे इतर या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य असतील. या निवडीबद्दल संचालक मंडळात सर्व सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले. मार्च २०२५ अखेरपर्यंत बँकेच्या एकूण ठेवी ३५१ कोटी आहेत. कर्ज व्यवहार २०८ कोटी असून बँकेस ढोबळ नफा एकूण रुपये ५ कोटी ८२ लाख झालेला आहे. सतत ४ वर्षापासून बँकेचे नेट एनपीए प्रमाण ०% आहे. या प्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष राजगोपाल चंडक ,संचालक मंडळाचे इतर सभासद व मॅनेजर पांडुरंग मंत्री उपस्थित होते.



## पायऱ्या उतरताना पडून एकजण जखमी

**सोलापूर :** घरातील पायऱ्या उतरताना तोल जाऊन पडल्याने एकजण जखमी झाला. हा प्रकार कमला नगरात बुधवारी दुपारी चारच्या सुमारास घडला. जगदीश बाबू बागडी (वय ३४) असे जखमीचे नाव आहे. बुधवारी दुपारी चारच्या सुमारास जगदीश हा घरातील पाय-या उतरत होता. त्यावेळी तोल जाऊन खाली पडल्याने त्याच्या डोक्याला जखम झाली. त्याला उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.










**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# निलंगा इथे परमनंट सुरक्षा रक्षक भरती

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१७ एप्रिल -**

सूक्ष्म लघु मंत्रालय भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत आणि भारत सरकारच्या पसारा ऍक्ट २००५ च्या नियमाप्रमाणे स्थानिक तरुणांसाठी कायमस्वरूपी नोकरीसाठी खडज मान्यताप्राप्त शिवस्वराज्य सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस प्रा.लि. आणि महाराष्ट्र शिक्षण समितीचे महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, करिअर काउन्सलिंग आणि प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१ ते २४ एप्रिलपर्यंत एकूण ४ दिवस सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

भरती होणाऱ्या युवकांना परमनंट नोकरी दिली जाणार आहे.

त्याचबरोबर सर्व सुविधा ज्यामध्ये पी.एफ. सुविधा, मेडिकल, ग्रॅज्युटी, पी.एफ. पेन्शन, विधवा पेन्शन,

अनाथ पेन्शन, व नियमानुसार भत्ते दिले जातील, तसेच पेमेंट हे महाराष्ट्र गार्ड बोर्ड नियमाप्रमाणे मिळेल. जे १५ हजार ते २३ हजार पर्यंत मिळेल. ही भरती प्रक्रिया दि.२१ ते २४ एप्रिलपर्यंत सकाळी ८ ते दुपारी १ पर्यंत महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथे सुरू राहणार आहे.

तरी या भरतीचा जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी लाभ घ्यावा असे आवाहन भरती अधिकारी महेश सरतापे, चंद्रशेखर सिंग व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपूके यांनी केले आहे.

# औसा मतदारसंघातील ग्रामीण भागातील सहाशे विद्यार्थीनींना सायकलचे वाटप

## आ. अभिमन्यू पवारांचा पुढाकार... क्रिएटिव्ह फाऊंडेशनची संकल्पना...



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१७ एप्रिल -**

आजही ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना आपल्या शाळेत जाण्यासाठी दररोज अनेक किलोमीटर पायी चालत जावे लागते. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी अजूनही सार्वजनिक वाहतुकीची साधनं नाहीत. ज्या ठिकाणी आहेत ती मर्यादितच आहेत.अशा या ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शाळेत येण्यासाठी सोयीस्कर मार्ग उपलब्ध करून देऊन शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे. या उदात्त हेतूने क्रिएटिव्ह फाउंडेशन च्या संकल्पनेतून व आ. अभिमन्यू पवार यांच्या पुढाकाराने औसा मतदारसंघातील सहाशे विद्यार्थीनींना मोफत सायकलचे वाटप करण्यात आले.

औसा मतदारसंघातील गरजवंत शालेय विद्यार्थिनींना आमदार अभिमन्यू पवार यांच्या पुढाकाराने व क्रिएटिव्ह फाउंडेशनच्या संकल्पनेतून औसा तालुक्यातील किल्लारी येथे सहाशे मोफत सायकल वाटप करण्यात आले. औशाचे गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, निलंगा गटविकास अधिकारी सोपान अकिले, औसा बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे,क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष अड परिक्षित अभिमन्यू पवार, रोहयो समिती अध्यक्ष सदाशिव जोगदंड, औसा शिक्षणाधिकारी गोविंद राठोड, निलंगा शिक्षणाधिकारी सुरेश गायकवाड, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष महादेव खिचडे, जिल्हा माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, बाजार समितीचे संचालक प्रविण कोपरकर, सचिन आनसरवाडे, बालाजी निकम, नितीन कवठाळे, ईश्वर दंडगुले आदींसह मतदारसंघांतील विविध शाळांचे विद्यार्थी व पालक उपस्थित होते. आ. अभिमन्यू पवार म्हणाले, मुलींना उच्च शिक्षण देणे आवश्यक आहे.राजमाता जिजाऊ शाळा माझी न्यारी या उपक्रमांतर्गत मतदारसंघातील मुले चांगले शिकली पाहिजेत. त्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. जेणेकरून त्यांचे चांगले भविष्य घडावे. या हेतूने मतदारसंघातील ३ शाळा प्रायोगिक तत्त्वावर विकसित करण्यात आल्या आहेत. येणाऱ्या काळात याच धर्तीवर जवळपास सर्वच शाळेत शैक्षणिक व शिक्षणेत्तर सुविधा उभारल्या जाणार आहेत. आगामी जून पासून लातूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली असून यासाठी यापुढील काळात लातूर येथे शासकीय डेंटल कॉलेज उभारणीसाठी पाठपुरावा करणार असल्याचा विश्वास यावेळी आ. पवार यांनी उपस्थितांना दिला.

### मुलांनाही सायकलीचे वाटप होणार : अॅड. परिक्षित पवार

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शाळेत येण्यासाठी सोयीस्कर मार्ग उपलब्ध करून देऊन शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याच्या हेतूने शाळेत जाण्यासाठी मुलींना मोफत सायकल वाटप करण्यात आले आहे. यापुढे या उपक्रमांतर्गत शालेय मुलांना सायकल वाटप करण्यात येणार असल्याची माहिती अॅड. परिक्षित पवार यांनी यावेळी दिली.

### विद्यार्थ्यांची पायपीट थांबणार : महादेव खिचडे

आ. अभिमन्यू पवार व क्रिएटिव्ह फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमांचे कौतुक करुन ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण घेण्यासाठी पायपीट करावी लागत होती. या उपक्रमांतर्गत मुलीसह मुलांची पायपीट संपणार असल्याचे मत औसा तालुका शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष महादेव खिचडे यांनी व्यक्त केले.

# आंबेडकरांची त्रिसूत्री भारताला महासत्ता बनवेल : प्रा. खंदारे




**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१७ एप्रिल -**

बाबासाहेब आंबेडकरांची त्रिसूत्रीच भारत महासत्ता बनण्याची गुरुकिल्ली आहे असे प्रतिपादन श्यामलाल कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक बी.एम. खंदारे यांनी केले. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात सामाजिक समता सप्ताहानिमित्त 'म. फुले, राजर्षी शाहू आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा आणि आजचे वास्तव' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य प्रा. मनोहर पटवारी होते. मंचावर प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस.एन. हल्लाळे, सामाजिक कार्यकर्ते रंगा राचुरे, समिती प्रमुख प्रा.डॉ.बी.एस. भूक्तरे, पर्यवेक्षक प्रा.टी.एन. सगर यांची उपस्थिती होती. खंदारे पुढे म्हणाले की, बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली त्रिसूत्री म्हणजे शिक्षण, समता आणि न्याय हे तत्व, महासत्ता होण्यासाठी शेतकऱ्यांना विकसित करावे लागेल, आंबेडकरांनी समाजातील प्रत्येक घटकासाठी मांडलेले समान न्यायाच्या तत्वाचे पालन केल्यास तोच त्यांचा विचाराचा जागर होईल. महापुरुषांचे आणि विचार आचरणीय झाल्यास त्यांना खरे वंदन होईल.

अध्यक्षीय भाषणात प्रा. पटवारी यांनी सामाजिक परिस्थिती सुधारणा करण्यासाठीची जवाबदारी उच्चशिक्षित लोक आणि संस्थांनी घेतल्यास देशाची प्रगती होईल. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. मस्के यांनी, सूत्रसंचालन प्रा. प्रवीण जाहुरे यांनी तर आभार प्रा. प्रवीण आंबेसंगे यांनी मानले.

# मंगेशकर महाविद्यालयातील सानिया मुल्ला यांना विद्यापीठाच्या वतीने पारितोषिक प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१७ एप्रिल -**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील सानिया अजिम मुल्ला (बी.ए.द्वितीय वर्ष) यांना विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेतील यशाबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडून पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

विद्यापीठातील डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्राच्या वतीने आयोजित विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेत पदवी गटातून 'उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक' संपादित केल्याबद्दल सानिया मुल्ला यांचा दि.१६ रोजी विद्यापीठात आयोजित पारितोषिक वितरण समारंभात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, ग्रंथ, प्रमाणपत्र व ५०० रूपयांचा धनादेश देऊन गौरव करण्यात आला.

सानिया मुल्ला यांनी 'मराठवाडा मुक्तिसंग्राम आणि स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान' या विषयावर निबंध सादर केला होता. महाविद्यालयातील महात्मा बसवेश्वर बौद्धिक मंडळाच्या पुढाकाराने सदर स्पर्धेत महाविद्यालयाच्या एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्र. कुलसचिव डॉ.ज्ञानेश्वर पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेन्द्र चव्हाण व डॉ. संगिता माकोने, डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. योगिनी सातारकर इत्यादी उपस्थित होते. पारितोषिक स्वीकारताना महाविद्यालयातील महात्मा बसवेश्वर बौद्धिक मंडळाचे समन्वयक डॉ. भगवान कदम व डॉ. शंकर कल्याणे तसेच पालक अजिम गफूरसाब मुल्ला उपस्थित होते.

सानिया मुल्ला यांच्या यशाबद्दल शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपसचिव पंकज बियाणी, संचालक मंडळ, संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. विजयकुमार पवार, डॉ. अशोक नारनवरे यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अठरा तास अभ्यास करुन डॉ. आंबेडकर जयंतीला अनोखी मानवंदना

## वाचन, ध्यानसाधना आणि संगणकीय ज्ञानाचा अनोखा संगम...



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१७ एप्रिल -**

देवणी तालुक्यातील जवळगा येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांनी सलग अठरा तास अभ्यास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखी मानवंदना दिली.

या उपक्रमात शाळेतील ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत विविध विषयांवरील पुस्तकांचे वाचन करत ध्यानसाधना केली. या वेळी तहसीलदार सोमनाथ वाडकर व पोलीस निरीक्षक माणिकराव डोके यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले आणि डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने यशस्वी जीवन घडवण्याचे आवाहन केले. दुपारच्या सत्रात जवळग्याचेच सुपुत्र, IT अभियंता अक्षय पाटील यांनी विद्यार्थ्यांना संगणक विषयातील सखोल ज्ञान दिले आणि डिजिटल युगात संगणकीय प्रणालीचा योग्य वापर करण्याचे मार्गदर्शन केले.

यानंतर गुणले सरांनी गणिताचे महत्त्व उलगडून दाखवत विविध सूत्रे, ट्रिक्स व सोप्या पद्धतीने गणित समजावले. त्यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांनी गणित विषयावरील भीतीवर मात केली. या उपक्रमाला माजी जि.प. सदस्य प्रशांत पाटील, कुमार सोनकांबळे, माजी प.स. सभापती संजीव रेड्डी, सरपंच विजयकुमार पाटील, माजी सरपंच हनुमंत बिरादार, तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष श्री. शेषेराव पाटील, ग्रामपंचायत सदस्य युसुफ सय्यद, माजी उपाध्यक्ष यशवंत सोनकांबळे, पत्रकार आनंद अंकुलगे यांची उपस्थिती लाभली. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक सुरेंद्र चौहान, अध्यक्ष अनिल पाटील, शिक्षक कदम डी.आर., सुडे मंजुषा, हुसेन शेख, शिवकुमार बिरादार, गुंडाजी महानुरे, राजकुमार सोनकांबळे, लक्ष्मण चिंते, सुनीता सावंत, शरद देशमुख, ग्रामस्थ किशोर सौदागर, किशोर बिरादार, राघवेंद्र जाधव, सूर्यवंशी, नारायण कळसे, सुनीता एल्के यांचे विशेष योगदान लाभले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी जागरूकता निर्माण झाली असून, हा उपक्रम तालुक्यात एक प्रेरणादायी पाऊल ठरला आहे.

# जेष्ठ किर्तनकार चंद्रकांत डोकडे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१७ एप्रिल -**



तालुक्यातील उजनी येथील जेष्ठ किर्तनकार तथा श्री संत गणेशनाथ महाराज यांचे निस्सिम भक्त हभप. चंद्रकांत डोकडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने गुरुवार दि.१७ रोजी ११ वा. दरम्यान निधन झाले. सायंकाळी ६ वा. अंत्यसंस्कार करण्यात आले.

आपल्या रसाळ वाणीतून ग्रंथ वाचनासाठी उजनी व परिसरात परिचित होते.

त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुप्ना, नातवंडे असा परिवारा आहे.

*** उदगीर, दि.१७ एप्रिल -**

संस्कृती संवर्धन प्रतिष्ठाणच्या वनीने नैतिक मुल्य शिक्षणाची परीक्षा महाराष्ट्रातील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी दिली होती.

या परीक्षेत प्रत्येक शाळेतून जे विद्यार्थी प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र दिले जाते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १३४ तोफांची सलामी

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१७ एप्रिल -**

भारतरत्न बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या निमित्ताने येथील सम्राट मित्र मंडळाच्या वतीने मध्यरात्री बारा वाजता १३४ तोफांची सलामी देऊन अनोख्या पद्धतीने अभिवादन केले.



प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी आतिषबाजी आणि तोफांची सलामी हा उपक्रम सम्राट मित्र मंडळाच्या वतीने घेण्यात आला. याप्रसंगी तक्षशिला बुध्द विहाराचे प्रमुख भंते महाविरो थेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीचे अध्यक्ष माजी आ. बब्रूवान खंदाडे, माजी मंत्री विनायकराव जाधव पाटील, माजी नगराध्यक्षा सरस्वती कांबळे, आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे, विद्राही कवी राजेंद्र कांबळे, शेषेराव ससाणे, भगवान ससाणे, अशोक लामतूरे, अरूण वाघंबर, राहूल तलवार, भगवान ससाणे, विनय ढवळे, प्रा.बालाजी आचार्य आदीसह विविध राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

मध्यरात्री ठीक बारा वाजता डॉ. बाबासाहेब आबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास विविध जयंती मंडळांच्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आले.

सोबतच कोल्ड फायर आणि फटाक्यांची आतिषबाजी करत १३४ तोफांची सलामी देण्यात आली. याप्रसंगी सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष संयोजक डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी या कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विकास ससाणे, संविधान कदम, शिवाजीराव भालेराव, आकाश सांगवीकर, शरद सोनकांबळे, बालाजी मस्के, शरद कांबळे, सिध्दार्थ बनसोडे, सचिन बानाटे, आकाश पवार, अजय भालेराव, भीमराव कांबळे, दयानंदराव वाघमारे, गणेश मूंडे, डॉ. बालाजी थिट्टे आदींनी पुढाकार घेतला.

# अपुऱ्या बसगाड्यामुळे अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांची दमछाक

**तभा वृत्तसेवा / शंकर मिटकर**
**शिरूर अनंतपाळ, दि.१७ एप्रिल -**



अनंतपाळ येथील बसस्थानकावरून अनेक मार्गावर बसेसची संख्या वाढवण्याची व बसस्थानकामध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी प्रवाशांमधून करण्यात येत आहे.

महामंडळाने शिरूर अनंतपाळ येथे लाखो रुपये खर्चुन भव्य असे बसस्थानक प्रवाशांच्या सेवेत तयार केले आहे. मात्र, या बसस्थानकात प्रवाशांसाठी लागणाऱ्या सुविधांचा अभाव मोठ्या प्रमाणामध्ये जाणवत आहे. यामध्ये प्रामुख्याने स्वच्छतागृहाची दुरवस्था, सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा अभाव, पोलिस चौकी या अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मुलींच्या छेडछाड करणाऱ्या रोडरोमीओंची संख्या वाढत आहे. तसेच भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. याप्रकरणी प्रवाशांनी अनेक वेळा महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रारी मांडूनही अद्याप काहीच उपयोग झाला नाही.

शिरूर अनंतपाळ येथे नूतन बसस्थानकाचे सुशोभीकरणाचे काम करण्यात आले आहे. मात्र बसेसची संख्या वाढविण्यात आलेली नाही. या सुविधा सोबतच बसस्थानकावरून नांदेड, उदगीर, अहमदपूर, लातूर, भालकी, या गाड्या धावतात परंतु तालुका होण्याच्या अगोदर निलंगा नांदेड, निलंगा परभणी, निलंगा मुखेड, निलंगा वसमत, निलंगा भोकर या बसेस गाड्या या मार्गावर धावत होत्या त्या गाड्या शिरूर अनंतपाळ तालुका झाल्यापासून बंद झाल्याने तालुक्यांसह या मार्गावरील नागरिकांमधून तिव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. तसेच दोपारी एक दोन च्या दरम्यान लातूर जाण्यासाठी एकही बस नसल्यामुळे शिरूर अनंतपाळ येथे स्टॅण्ड बाय गाडीची आवश्यकता आहे. परंतु निलंगा आगारातील अपुऱ्या बसगाड्या मुळे येथील आगारप्रखाची चांगलीच दमछाक होत असल्यामुळे परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सिमावर्ती भागात असलेल्या निलंगा आगारातील या समस्यांचे निवारण करुन येथील अधिकाऱ्यांना होणाऱ्या त्रासापासून मुक्ती देवून प्रवाशांची गैरसोय होत असलेली दुर करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

आगारप्रमुख राजेंद्र बिडवे निलंगा येथे आल्यापासून येथील कर्मचाऱ्यांच्या सहवासात राहून त्यांनी या आगाराला अनेक बक्षिसे मिळवुन दिले आहेत. स्वच्छता अभियान अंतर्गत महाराष्ट्रात दुसरा, उत्कृष्ट कामगिरी बद्दल महाराष्ट्रात दुसरा तसेच त्यांच्या कार्यकाळात सुसज्ज असे बसस्थानक उभारण्यात आले आहे. त्यांच्या कार्यकाळात आम्हा कर्मचाऱ्यांना कुठल्याही अडचणी येवू दिल्या नाहीत निलंगा आगारात बसगाड्यांची संख्या खुपच कमी आहेत. तरी पण त्यांचे नियोजनबद्ध काम असल्याने प्रवाशांना समाधान करणारा अधिकारी लाभल्यामुळे कर्मचारी व प्रवासी यांच्यातून समाधान व्यक्त केले जात आहे.
**- राजकुमार सुर्यवंशी,** मरापम. कामगार संघटनेचे अध्यक्ष रा.बाकली ता. शिरूर अनंतपाळ

धाराशिव
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती धाराशिव, सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गुणवंत कर्मचारी म्हणून उमाकांत सूर्यवंशी यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१७ एप्रिल -**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागातर्फे विविध विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून वेळोवेळी उल्लेखनीय कार्य होत असते. त्यामुळे त्यांनी केलेल्या कार्याचा गुणगौरव शासनाकडून सन २००५ यावर्षीपासून प्रत्येक वर्षी करण्यात येतो.

संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येते.

त्याचाच एक भाग म्हणून सन २०२२-२३ या कालावधीत उत्कृष्ट सेवा बजावलेल्या विविध खात्यातील विभागनिहाय एकूण ३५ अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड शासनातर्फे करण्यात आली असल्याचे दि.१६ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन निर्णयात करण्यात आले आहे.



उपरोक्त ३५ गुणवंतांमध्ये लोहारा तालुक्यातील हराळी येथील मूळ रहिवासी मात्र सध्या प्राथमिक आरोग्य केंद्र वाडेबोल्हाई ता.हवेली जि.पुणे येथे कनिष्ठ सहाय्यक पदावर कार्यरत असलेले उमाकांत सुरेश सुर्यवंशी यांची पुणे विभागातून उत्कृष्ट कर्मचारी म्हणून निवड करण्यात आली.



### नगर परिषदेचा नागरिकांच्या जीविताशी खेळ...

## धाराशिव शहरातील कचरा डेपोमुळे आरोग्य धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ एप्रिल -**

धाराशिव शहरातील कचरा डेपोमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सतत कचऱ्याचा दुर्गंधीयुक्त धूर शहराच्या विविध भागांत पसरत असल्याने आबालवृद्धांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी होत असलेला खेळ थांबवून हा कचरा डेपो इतरत्र हलवावा यासाठी २८ एप्रिलपासून आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन युवा सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

गुरुवारी दि. १७ युवा सेनेचे शहरप्रमुख रवि वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली मागणीचे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले की, शहरातील उचलण्यात येणारा कचरा हा शहरालगतच्या कचरा डेपो येथे टाकण्यात येतो. गेल्या काही महिन्यांपासून या कचरा डेपोमधून सतत धूर निघून तो परिसरातील लोकवस्ती असलेल्या भागात पसरत आहे. या धुरामुळे व दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.



### डेपो इतरत्र ठिकाणी हलविण्याच्या मागणी...

धुरामुळे अनेकांच्या डोळ्यांना त्रास होत आहे. तसेच श्वसनाचाही अनेकांना त्रास सहन करावा लागत आहे. धुरामुळे डोळ्यांचे व श्वसनाचे विकार जडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सततच्या धुरामुळे उमर मोहल्ला, ख्वाजानगर, गणेशनगर, दर्गाह रोड, तालीम गल्ली, बस डेपो परिसर, आयुर्वेद महाविद्यालय परिसर, अहिल्यादेवी होळकर चौक, आगड गल्ली भागांतील नागरिकांना सध्या या धुराचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नगरपरिषदेच्या गलथान कारभाराचा फटका नागरिकांना सहन करावा लागत आहे.

या कचरा डेपोत दररोज जमा होत असलेल्या कचऱ्याचे विलगीकरण करावे. ओला व सुका कचरा वेगळा करावा.

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी. कचऱ्यावर योग्य प्रक्रिया व कचऱ्याचे विलगीकरण करावे. कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची योग्य ती विल्हेवाट लावणे शक्य नसेल तर हा कचरा डेपो इतरत्र हलवून परिसरातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राखावे, यासाठी संबंधित यंत्रणेला योग्य ते आदेश द्यावेत, अशी विनंती करणारे निवेदन नागरिकांच्या वतीने यापूर्वीही देण्यात आलेले आहे. तरीही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून तातडीने यावर उपाययोजना करावी, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २८ एप्रिल २०२५ पासून आमरण उपोषण करण्यात येईल, असे निवेदनात नमूद केले आहे.

## शाकुंतल नाटकाला मिळाला भरघोस प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ एप्रिल -**

मराठी नववर्षानिमित्त धारासूर मर्दिनी महिला फेडरेशनने महाकवी कालिदास यांची अजरामर कलाकृती शाकुंतल या नाटकाचे नगर परिषद येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात आयोजन केले होते.

पुणे येथील मराठी भाषा संवर्धन मंडळ निर्मित या शाकुंतल नाटकाचा मराठी अनुवाद, रंगावृत्ती गणेश दिघे यांनी केलेला आहे. तसेच अनिकेत अदिनाथ नेमाने यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केलेले होते. प्रमुख भुमिकेत शुभम मारडकर, समृद्धी भोसले, युक्ता नाईक, प्रतिक्षा कदम, पराग जगताप यांच्या होत्या. मुळ धाराशिवच्या पण पुणे येथे वास्तव्य असलेल्या प्रा. माया मुळे या नाटकाच्या संयोजिका होत्या. धाराशिवची कन्या श्वेता आनंद कुलकर्णी हिने पण या नाटकात भूमिका साकारली होती.सर्व धाराशिव शहरातील प्रतिष्ठित रसिकांनी या नाटकाचा आस्वाद घेतला.

धारासूरमर्दिनी फेडरेशन च्या ह्या वेगळ्या उपक्रमाच्या आयोजनबद्दल सर्व कार्यकारिणीचे कौतुक केले.

## मनोहरराव (आप्पा) सोबा, राठोड; विमुक्त भटक्यांचे दैवत

विद्यानगर बावी - येथील वसंत प्राथमिक, जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेचे संस्थापक-अध्यक्ष स्व. मनोहरराव (आप्पा) सोबा राठोड हे एक खऱ्या अर्थाने असामान्य व अलौकिक व्यक्तिमत्व होते. त्यांचा जन्म १८ एप्रिल १९३८ रोजी पूर्वीच्या वाघजाई घाट लमाणतांडा येथे एका अशिक्षित व शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या कुटुंबाचा परंपरागत धंदा शेती. घरात शिक्षणाची पार्श्वभूमी नसतानाही आई-वडिलांच्या प्रेरणेमुळे त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण वाघजाई घाट (दिपकनगर) तांडा येथे तर माध्यमिक शिक्षण नरेंद्र आर्य विद्यालय, अपसिंगा येथे अत्यंत प्रतिकूल परिस्थित पूर्ण केले. पुढे १९६२ ते १९९२ या कालावधीत ग्राम सेवक ते ग्रामविस्तार अधिकारी जिल्हा परिषद, धाराशिव येथे अत्यंत इमानदारी व सचोटीने शासकीय सेवा केली.



या काळात अतिउत्कृष्ट सेवा केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाने आगाऊ वेतनावाढी देवून त्यांचा कार्याची विशेश बहुमान केला. आपण ज्या उपेक्षित भटक्या विमुक्त जातीत जन्म घेतला, तो समाज निरक्षर, अंधश्रद्धा जोपासणारा असल्यामुळे विकासापासून कोसो दूर होता. त्यांच्या सर्वांगिण विकास शिक्षणाशिवाय शक्य नाही हे ओळखून त्यांनी १९८३ मध्ये तांबेवाडी तांडा (ता. बार्शी) येथे प्राथमिक आश्रमशाळा व १९८५ मध्ये विद्यानगर बावी (ता. धाराशिव) येथे वसंत प्राथमिक आश्रमशाळेची शासन मान्यतेने स्थापना केली. पुढे या आश्रमशाळेचे माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत रूपांतर झाले. तसेच मागासवर्गिय मुलांचे वसतीगृह व अनाथ मुलांसाठी बालगृहाची स्थापना केली. गेल्या ४० वर्षापासून व वसतीगृहातून विमुक्त भटक्या जातीचे हजारो विद्यार्थीनी शिक्षण घेवून आपले जीवनमान उंचावले. दिन-दलित बहुजन वंचित समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी केलेला बहुमोल कार्यामुळे शासन व समाजाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितमित्र पुरस्कार, महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार व शिक्षण महर्षी पुरस्काराने त्यांना सन्मानित केले.

स्व. मनोहरराव आप्पांनी आपले संपूर्ण आयुष्य शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी समर्पित केले.

त्यांचे मूर्तिमंत उदा. म्हणजे बावी आश्रमशाळा संकुलाची निर्मिती. त्यांनी अनेक राजकीय व सामाजिक चळवळीचे नेतृत्व करून उपेक्षित व वंचिताना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. अशा समाजभूषण व अलैकिक व्यक्तीमत्वाची आज ८७ वी जयंती साजरी होत असून त्यांचा पवित्र स्मृतीस शतशः अभिवादन...

त्यांच्या जयंतीनिमित्त विद्याभारती धाराशिवच्या वतीने शिक्षकांचा पंचकोष विकास अभ्यास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून सदर कार्यशाळेस विद्याभारती सलग्न शाळेतील शिक्षकांनी विद्यानगर बावी येथे आज रोजी सकाळी ठिक ९.३० वाजता उपस्थित राहण्याचे आवाहन माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेचे प्राचार्य श्री. दयानंद मनोहरराव राठोड यांनी केले आहे.

**- अभिवादक**
**बळीराम उद्धवराव जगताप**
**माजी मुख्याध्यापक, आश्रमशाळा, बावी**

## तुळजापूरात हनुमान जन्मोत्सव सप्ताह्याची मिरवणुकीने सांगता

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ एप्रिल -**

शहरात सार्वजनिक मोठ्या जल्लोषात हनुमान जन्मोत्सव सोहळा संपन्न झाला. बुधवारी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक पासून महाद्वार, बोंबला चौक, किसान चौकी,आर्य चौक, कमान वेस मंगळवार पेठ ते डॉ. बाबासाहेब चौक मार्गावर जय बजरंग जय वडार युवा प्रतिष्ठान तर्फे भव्य मिरवणूक काढून सांगता करण्यात आली.

हनुमान जन्मोत्सव सोहळा १२ एप्रिल ते १६ एप्रिल दरम्यान साजरा करण्यात आला. या मिरवणुकीत हनुमान मूर्तीची नगर प्रदर्शना काढण्यात आली. ड्रोनच्या सहाय्याने बाल हनुमानाची उड्डाण आकर्षन बनले होते. पारंपरिक वाद्यासह सामूहिक नृत्याविष्कारात हनुमान भक्तांनी आपला सहभाग नोंदवला.

जय बजरंग जय वडार युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रावण पवार, लक्ष्मण पवार,धर्मराज पवार यांच्या सह उत्सव समिती अध्यक्ष सोमनाथ पवार, उपाध्यक्ष बाळू शिंगे, कोषाध्यक्ष सनी इटकर, मिरवणूक प्रमुख सुरज इटकर, तुकाराम देवकर, मशा काका पवार, चंद्रकांत पवार,राम देवकर, संदीप पवार आदी शेकडो सदस्य मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते.



## उत्तुंग व दूरदृष्टी असलेले नेते; सहकार महर्षी दिलीपराव देशमुख

राज्यातील सहकार, साखर उद्योग क्षेत्रात भरीव योगदान करत राज्यांत सहकार साखर कारखानदारीत लातूरचे नाव राज्यात नव्हे आज देशात नावलौकिक करणारे सहकार चळवळीतून समृद्धीकडे वाटचाल करण्यात ज्यांचा मोठा वाटा लातूर जिल्ह्यात राहिलेला असे राज्याचे माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री सहकार महर्षी लातूरचे भूषन दिलीपरावजी देशमुख साहेब यांचा राज्यभर उल्लेख होतो. एक उत्तुंग व्यक्तिमत्व दूरदृष्टी असलेले नेते म्हटल्यास वावगं ठरणार नाही. गेल्या पन्नास वर्षापासून राजकारण समाजकारण करत असताना त्यांनी ज्या ज्या क्षेत्रात पाऊल ठेवले त्या क्षेत्रात भरीव योगदान राहिलेले आहे. त्याकडे मागच्या २५ ते ३० वर्षापूर्वी त्या भागातील क्षेत्रात आपण सहजपणे बघितलं तर असे दिसेल की जिथं दिलीपराव देशमुख साहेब यांचा स्पर्श झाला आहे. त्या क्षेत्राचा त्या उद्योगाचा वटवृक्ष झाला आहे, असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेले माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचा आज ७५ वा वाढदिवस अमृत महोत्सवी वर्ष आहे त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!



**सहकार क्षेत्रात भरीव काम...**

राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी मागच्या ४० वर्षापासून सहकार क्षेत्रात कार्यरत आहेत. अतिशय सूक्ष्म नियोजन पारदर्शकता ठेवून कार्य करत असताना त्यांनी ३८ वर्षापुर्वी पहिल्यांदा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासकीय चेअरमन म्हणून पदभार स्वीकारला. तेव्हा लातूर जिल्हा बँकेत पगारी द्यायला पैसे नव्हते. लोकांकडे थकबाकी मोठया प्रमाणावर राहिली होती. त्या काळात फारसी दळणवळण यंत्रणा नव्हती पण स्वतः दिलीपराव देशमुख यांनी सर्व अधिकारी कर्मचारी यांना सोबत गावागावात जावून मेळावे घेतले. लोकांनी आपापल्या गावात आल्यावर दिलीपराव देशमुख यांचे गावाच्या वेशीवर मोठे स्वागत करत चावडीवर गावात बैठका घ्यायचे अक्षरशः लोक बँकेची थकबाकी भरण्यासाठी लाईन लावून पैसे आणायचे कधी काळी बँकेला कर्मचाऱ्यांना पगारी द्यायला पैसे नसणारी लातूर जिल्हा बँक आज दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सलग ३८ वर्षापासून यशस्वी पने घौडदौड करत. राज्यात पहिल्या टॉप ३ जिल्हा बँकात लातूर बँकेचा समावेश आहे. राज्यात अनेक ऐतिहासिक निर्णय घेणारी जिल्हा बँक राज्यात नव्हे तर देशात अग्रेसर राहिलेली आहे. ५ लाख रुपये शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज देणारी व शेतकऱ्यास १०४ कोटी रुपये हार्वेस्टर यंत्र वाटप करणारी लातूर जिल्हा बँक देशातील पहिली ठरली आहे. असे वेगवेगळे ऐतिहासिक निर्णय घेत शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम या नेतृत्वाने करत या भागातील शेतकऱ्यांना सहकाराच्या माध्यमातून समृद्धीकडे घेवून जाण्याचे स्वप्न साकार झाल्याचे आज दिसत आहेत. याचे सर्व श्रेय लोकनेते विलासराव देशमुख साहेब त्यानंतर सहकार चळवळ टिकून ठेवून वाढवण्याचे काम सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी केले आहे, हे आपल्याला मान्यच करावे लागणार आहे.

**उत्तुंग व्यक्तिमत्व धाडसी निर्णय...**

माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी ज्या क्षेत्रात पाऊल ठेवले त्यां क्षेत्रात प्रगती झालेली दिसेल अगदी सहकार क्षेत्रातील साखर उद्योग असेल किंवा एखादी शैक्षणीक संस्था असेल तिथं प्रगतीकडे वाटचाल झालेली दिसायला आपल्याला बघायला मिळत आहे. आज राज्यात नावलौकिक पहिल्या ३ साखर कारखान्यात विकास रत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखाना त्या कारखान्याचे स्वतः दिलीपराव देशमुख साहेब चेअरमन आहेत. अतिशय सूक्ष्म नियोजन पारदर्शकता ठेवून काटकसर करून गेल्या पंचविस वर्षात कारखान्याकडे बघितल्यास मोठी प्रगती करण्याबरोबरच या भागातील उस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता देण्याचे काम या मांजरा साखर कारखान्याच्या माध्यमातून झालेले आहे. लातूर तालुका सुजलाम सुफलाम झाला आहे. त्यांचे सर्व श्रेय लोकनेते विलासराव देशमुख साहेब सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या कडे जाते कधी काळी या भागात दुष्काळ उद्योग नव्हते. मांजरा साखर कारखाना सुरु झाला तेथून गाव सुधारली लोकांकडे पैसा उभारला. शेती सुधारली पक्की घरे झाली मुल उच्च शिक्षित झाले या मांजरा साखर कारखान्याने शेतकऱ्यांना अधिक भाव देण्याचा निर्णय घेतला. लोकनेते राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब जेव्हा कारखाना सर्वसाधारण सभेत भाषणात नेहमी बोलायचे आम्हाला थोडा तोटा झाला. तर चालेल मात्र शेतकऱ्यांना अधिक भाव देवू असा विचार असायचा तोच विचार पावलावर पाऊल ठेवून दिलीपराव देशमुख साहेब कार्य करत आहेत. कारखाना केवळ उस गाळप इथक्यावर थांबला नाही अनेक उपपदार्थ प्रकल्प सुरू करून शेतकऱ्यांना अधिक भाव देत अनेक धाडसी निर्णय घेण्यात आघाडी घेतली आहे.

**जिथं जाल तिथं समृध्दी...**

दिलीपराव देशमुख साहेब यांनी कुठे गेले तिथं एखादा प्रकल्प सुरू केला तिथं सोन झालेले दिसत आहे. १३ वर्षापूर्वी जागृती शुगर साखर कारखाना सुरू केला. त्या भागात पाणी साठा नव्हता पडीक जमिनी होत्या. पीक जेमतेंव निघायचे तत्कालीन माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याकडे मुख्यमंत्री पद मिळाले. या भागाचा कायापालट झाला देवणी तालुका साठवण तलाव बांधले. तेव्हा दिलीपराव देशमुख साहेब यांच्या कडे देवणी तालुक्याचे पालकत्व होते. १३ वर्षापूर्वी माळरान असलेले तळेगाव येथे जागृती शुगर दिलीपराव देशमुख साहेब यांनी कारखाना सुरू केला. एकेकाळी वलांडी देवणी जवळगा येथे प्लॉट १ गुंठा पाच दहा हजार रुपये किमतीला मिळायचा आज या जागृती शुगरमुळे एक प्लॉट गुंठा ५० लाख रुपयाला झालेला आहे. मोठी बाजारपेठ जागृती शुगर मुळे वाढलेली आहे. शेजारी ५ किलोमिटर वर कर्नाटक तेलंगणा राज्याच्या सीमा असल्याने त्या भागात या साखर कारखानदारी मुळे फायदा झालेला आहे. जिथं स्पर्श झाला तिथं प्रगती झालेली दिसत आहे. राजकारणात राहूनही निवडणूक झाली की विसरून जावून समाजकारण करने त्यांनी नेहमी पसंत केल्याने सर्वच राजकीय पक्षांचे पदाधिकारी त्यांना उतूंग व्यक्तिमत्व विकास पुरुष असे मानतात. राजकारणाच्या पलिकडे जाऊन लोकांत स्वतःचे वेगळेपण सिद्ध केले आहे.

**राजकारण कमी समाजकारण जास्त...**

राजकारणात कॉंग्रेस पक्षाचे नेते म्हणुन राज्यभर ओळख आहे. पक्षाच्या जडणघडणीत लातूर जिल्हा, मराठवाड्यात त्यांना मानणारा खूप मोठा वर्ग आहे. जी जवाबदारी दिली. ती समर्थपणे पार पाडलेली आहे राजकारण बाजूला सारून सर्वांना मदत करणारे दिलीपराव देशमुख यांना सबंध मराठवाड्यात ओळख आहे. पक्षाच्या वतीने विविध कार्यक्रमात उत्तुंग व्यक्तिमत्व दूरदृष्टी विचार करणारे नेते पक्षातील कार्यकर्ते, पदाधिकारी यांना सन्मान देवुन त्यांना योग्य वेळी संधी देवुन पाठीवर शाबासकीची थाप मारणारे हे नेतृत्व आहे. तळागाळातील लोकांच्या अडचणी समजून घेवून त्यात मार्ग काढून त्यांना नेहमी मदत करणारा नेता म्हणून आज दिलीपराव देशमुख साहेब यांच्याकडे लोकांची वेगळी छाप पडली आहे. सत्ता असेल नसेल पण लातूरचे आशियाना निवासस्थान मात्र लोकांच्या गर्दीने खचाखच भरलेले दिसते.

लातूरकरांच्या हाकेला कायम धावून जाणारे दिलीपराव देशमुख साहेब यांचा आशियाना बंगला कायम लोकांना विठ्ठलाचे दार कायम लोकांसाठी खुले असते. सर्वसामान्य माणूस सहज साहेब यांच्या कडे जावू शकतो. त्यांचे कुठलेही प्रश्न असू द्या त्या प्रश्नाचे निरसन करूनच बाहेर कॉफी घेवून येतो. त्या माणसांच्या चेहऱ्यावर हास्य सगळ सांगून जातो. एक उत्तुंग व्यक्तिमत्व दूरदृष्टी असलेले नेते राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्ष वाढदिवस निमीत्ताने हार्दिक शुभेच्छा देत असताना त्यांना दीर्घायुष मिळो कायम लोकांच्या सेवेत राहावे, अशी प्रार्थना साई चरणी करतो.

**विविध क्षेत्रात सक्रिय सहभाग...**

दिलीपराव देशमुख साहेब हे गेज्या ५० वर्षापासून राजकारणात राहूनही विविध क्षेत्रात कार्यरत आहेत शहरातील धार्मिक, सामाजिक संस्था, दर्गा, शैक्षणिक, सांस्कृतीक, संगिताक, क्रीडा, वेगवेगळ्या क्षेत्रात लोकांना मदत कारणे प्रत्येक समाजातील लोकांना आर्थिक सामाजिक क्षेत्रात पुढे येवून लोकांना संस्थांना मदत करणे, मार्गदर्शन करणे हा साहेब यांचा मोठा हातखंड राहिलेला आहे. त्यांचेकडे कुठलाही व्यक्ती आला तर त्याला काय पाहिजे ते साहेब यांनाच जास्त लवकर कळते. त्यामुळे इथ येणारा प्रत्येक व्यक्ती आशियाना निवासस्थान हे सर्वांसाठी विठ्ठलाचे दार असे ठरले आहे.

अशा या लोकाभिमुख व उत्तम प्रशासक असलेले बहुआयामी व्यक्तिमत्व दूरदृष्टी असलेले नेते राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांना वाढदिवसाच्या निमित्ताने खूप खूप शुभेच्छा...

**हरिराम कुलकर्णी**
ज्येष्ठ पत्रकार लातूर.
९९७००८१०७७

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूरच्या चित्रकाराचे जहांगीर कला दालनात चित्र प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -** लातूर जिल्ह्यातील युवा चित्रकार गणेश मोहनराव शिंदे यांच्या चित्रांचे प्रदर्शन एप्रिल २२ ते २८ दरम्यान मुंबईच्या जहांगीर कला दालनामध्ये भरणार आहे. सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत हे प्रदर्शन रसिकांना पाहता येईल.

निवळी गावचा मूळ रहिवाशी असलेल्या गणेश शिंदे यांचे रेखा व रंगकला पदविकेचे शिक्षण अभिनव कला महाविद्यालय पुणे येथे झाले आहे. त्यांच्या चित्रकलेतील योगदाना बद्दल 2020 मध्ये बॉम्बे आर्ट सोसायटीचा श्री. भीम बी. पुरोहित मेमोरियल पुरस्कार मिळाला आहे. सीमा अवार्ड शो २०२२, ललित कला अकादमी द्वारा आयोजित ६१ वे राष्ट्रीय प्रदर्शन 2020, आर्ट सोसायटी ऑफ इंडिया प्रदर्शन २०१८, सिमा आर्ट मेला, व्हिज्युअल आर्ट्स गॅलरी, नवी दिल्ली, सिमा आर्ट मेला, सिमा गॅलरी, कोलकाता प्रदर्शनाठी गणेश शिंदे यांची निवड झाली होती.

चित्र म्हणजे केवळ रंग आणि रेषांचा खेळ नसतो. ते आपल्या अंतर्मनाशी जोडणारे एक माध्यम असते. चित्र काढताना येणाऱ्या भावना, विचार, अनुभव आणि अभिव्यक्ती हे सगळे मिळून त्याला खरे अर्थ देतात. चित्रविषय खूप व्यापक आहे. त्यामध्ये रूप, रंग, रचना, अवकाश, समतोल आणि क्षणिक अनुभूती यांचा समावेश असतो. हे सगळे विषय केवळ दृश्यकलेपुरते मर्यादित नसून, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि विज्ञान यांच्याशीही जोडलेले असतात. चित्रनिर्मिती ही केवळ काहीतरी बघण्यासारखे तयार करणे नाही, तर ती एक अनुभवाची प्रक्रिया आहे. एक विचार किंवा भावना रंगांमधून आणि आकारांमधून साकार होते. कधी ते रूप खूप साधं असतं, तर कधी त्यामागे खोल अर्थ दडलेला असतो. शिंदे यांना चित्रांचे प्रदर्शन भरवण्याची संधी मिळाल्यामुळे लातूरच्या चित्रकार रसिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत शिल्पा कोरे हिचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी)वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत शिल्पा शिवाजीराव कोरे हिने उत्तुंग यश मिळविले आहे.

राज्य सरकारचा कारभार जिथून चालतो त्या मंत्रालयात तिची सामान्य प्रशासन विभागात सहाय्यक पदावर निवड झाली आहे. या यशाबद्दल तिचे वडील शिवाजीराव कोरे, आई काशीबाई कोरे, अनुसया काळे, राजु कोरे, अशोकराव काळे, योगेश हरडगे, दत्ता भंडारे, मनोज चव्हाण, हेमंत मोरे, विनोद धायगुडे, आयुष काळे, कल्पना काळे, अलका मुळे , आचल काळे, रमेश धुमाळ यांच्यासह कोरे व काळे परिवारातील आणि अष्टविनायक मित्र मंडळाचे पदाधिकारी आणि सदस्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## महानगरपालिका कर्मचाऱ्यांना ड्रेस/ गणवेश कोड सक्तीचा करावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -** येथील लातूर शहर महानगरपालिका फाईव्ह स्टार नामांकन मिळालेली मराठवाड्यातील एकमेव महानगरपालिका असल्याने या नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना गणवेश सक्ती करणे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचे सुशोभीकत करणे, पूर्व भागात साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे सार्वजनिक वाचनालय करणे आणि स्वामी विवेकानंद जलकुंभ परिसरात वाकिंग ट्रॅकसह ओपन जिम तात्काळ करण्यात यावे म्हणून लातूर शहर पूर्व भाग नागरी हक्क कृती समितीने महानगरपालिका आयुक्तांची प्रतक्ष भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. यावेळी लातूर शहर पूर्व भाग नागरी हक्क कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे,बाबासाहेब बनसोडे,नितीन चालक,भगवेश्वर धनगर इत्यादी उपस्थित होते.

## पालकांनी आपल्या पाल्यांच्या भविष्यवेधी शिक्षणासाठी सज्ज व्हावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -** बदलल्या काळात केवळ पाठ्यपुस्तकावर भर न देता कृतीवर आधारित शिक्षण, नैतिक मूल्य आणि कृत्रिम बुध्दिमत्तेची(एआय) समज देणं हे भविष्यासाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे बदलत्या प्रवाहातील शैक्षणिक बदल लक्षात घेऊन पालकांनी आपल्या पाल्यांच्या भविष्यवेधी शिक्षणासाठी सज्ज व्हावे असे आवाहन प्राचार्य गोविंद शिंदे यांनी केले.

यावेळी ते स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयात आयोजित इयत्ता १ ली ते ४ थी वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठीच्या पालक मेळाव्यात बोलत होते. पालक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य मारुती सूर्यवंशी हे उपस्थित होते. तसेच पालक प्रतिनिधी विजयकुमार जगदाळे व भाग्यश्री क्षिरसागर हे उपस्थित होते.

## बुध्द हे दुःख मुक्तीचा मार्ग दाखवतात :उत्तम कांबळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -** जग हे दुःखाने भरले आहे. या दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग हा तथागत गौतम बुद्धांनी दाखवला आहे. जन्माला येणारा प्रत्येक जण हा मृत्यूनंतर मुक्त होतो आणि हेच मुक्तीचे कारण असल्याचं बुद्धांनी सांगितले असल्याचे प्रतिपादन साहित्यिक उत्तम कांबळे यांनी बौद्ध साहित्य संमेलनात केले.

भारतीय संविधान अमृत महोत्सव वर्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि परिवर्तन क्रांतीच्यावतीने लातूर येथील भालचंद्र ब्लड बँक या ठिकाणी बौद्ध साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. यावेळी विचार पिठावर आमदार संजय बनसोडे, संपादक तथा साहित्यिक उत्तम कांबळे, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, स्वागताध्यक्ष चंद्रकांत शिंदे, संपादक तथा संयोजक डॉ.राजेंद्र कांबळे, यू.डी. गायकवाड, प्रा डॉ. शिवाजीराव गाढे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.


# पालकमंत्र्यांनी घेतला पाणीटंचाई उपाययोजनांचा आढावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -** जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणासाठी केल्या जाणाऱ्या कामांना प्राधान्य द्यावे. ज्या वाड्या, वस्ती आणि गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण होईल, त्या ठिकाणी तातडीने कार्यवाही करून पाणीपुरवठ्यासाठी उपाययोजना राबवाव्यात. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविल्या जाणाऱ्या शंभर दिवसीय सात कलमी कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले.

पालकमंत्री भोसले यांनी बुधवारी जिल्ह्यातील पाणीटंचाई उपाययोजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि सात कलमी कृती कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या या बैठकीस सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, आमदार विक्रम काळे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार रमेश कराड, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर,



पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, महापालिकेचे प्रभारी आयुक्त देविदास जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, 'रोहयो'च्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, महावितरणचे अधीक्षक अभियंता उमेश सांगळे यांच्यासह सर्व उपविभाग आणि तालुका पातळीवरील अधिकारी उपस्थित होते.

जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यातील कामांना गती देण्याची गरज आहे. ही कामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण होण्यासाठी नियोजनबध्द काम व्हावे, असे सहकारमंत्री पाटील यांनी सांगितले. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तालुका पातळीवरील शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी नमूद केले.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित विमा कंपनीला योग्य सूचना देण्याची गरज आहे. तसेच, जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून खबरदारी घेणे आवश्यक आहे, असे आमदार काळे यांनी सांगितले.

राज्य शासनाची 'जलतारा' योजना लातूर जिल्ह्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीला गती द्यावी. जिल्ह्यातील बंधारे आणि सिंचन प्रकल्प जुने असून, त्यांच्या दुरुस्तीसाठी विशेष मोहीम राबवावी, असे आमदार निलंगेकर यांनी सांगितले.

जिल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढली असून, अनेक वाड्या आणि तांड्यांवर पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यासाठी प्रशासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे आमदार बनसोडे यांनी सांगितले.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या कंपनीकडून योग्य अंमलबजावणी होत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. विमा कंपनीचे अधिकारी आणि प्रशासनाने समन्वयाने काम करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, असे आमदार कराड यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी पाणीटंचाई निवारण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. सात कलमी कृती कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचीही त्यांनी माहिती दिली.

### पाणीटंचाईचे वाढले चटके

सूर्य रौद्ररूप धारण करू लागल्याने जिल्ह्यात उन्हाची दाहकता वाढली आहे. जलसाठ्यातील पाणी आटू लागले आहे, तर विहिरी तळ गाठू लागल्या आहेत. परिणामी, उन्हाबरोबर पाणीटंचाईचे चटके बसू लागले आहेत. जिल्ह्यात गतवर्षी सरासरीच्या १११ टक्के पाऊस झाला असून सध्या जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये ३६.४५ टक्के पाणीसाठा आहे. जल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढली असून, अनेक वाड्या आणि तांड्यांवर पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.

## शेतरस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आयोजित केली जाणार 'सस्ती अदालत'

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -** शेतकरी बांधवांसाठी आपल्या शेतात जाण्यायेण्यासाठी शेतरस्ता, पाणंद रस्ता अत्यंत महत्वाचे असतात. अतिक्रमित व बंद झालेले शेत रस्ते, पाणंद रस्ते गाव नकाशाप्रमाणे मोकळे करुन देण्यासाठी तालुका पातळीवर सस्ती अदालत उपक्रम राबविण्याचे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिले.

शेतकरी बांधवांनी शेतरस्ते मोकळे देण्यासाठीच्या या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यातील नागरिक आपल्या शेतातील जाण्या-येण्याच्या रस्त्याबाबत अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही. हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी बुधवारी मराठवाड्यातील शेतकऱ्यांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधून शेतरस्ते शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबतच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी अपर आयुक्त बाबासाहेब बेलदार, अपर आयुक्त के.आर.परदेशी, उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे यांच्यासह लातूर येथून निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी उपस्थित होते.

## दोन सराईत अटकेत; दोन दुचाकीसह दोन ऑटो जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी दोघा सराईत गुन्हेगारांना अटक करून लातूर व ठाणे जिल्ह्यातून चोरी केलेल्या दोन दुचाकी आणि दोन ऑटोरिक्षा जप्त केल्या. यातून तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना देण्यात आल्या आहेत. दाखल विशेषतः दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पथके स्थापन करण्यात आली आहेत.

सोमवारी दुचाकी चोरीच्या गुन्ह्यातील निलंगा तालुक्यातील गौर पाटी येथील आरोपीची माहिती पथकाला मिळाली. पथक तत्काळ गौर पाटी येथे पोहचले.

घरासमोर थांबलेल्या ओम हनुमंत कांबळे याला ताब्यात घेऊन त्याने लपवून ठेवलेल्या दुचाकी व ऑटोसंदर्भात कसून चौकशी करण्यात आली.

तो आणि त्याचा आणखीन एक साथीदार असे मिळून सदरचे ऑटो लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतून एक तर ठाणे जिल्ह्यातून एक आणि गांधी चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन दुचाकी चोरल्याची कबुली त्याने दिली. त्याच्याकडून २ लाख १० हजार रुपये किमतीच्या दोन दुचाकी व दोन ऑटोरिक्षा जप्त करण्यात आल्या. आरोपी ओम कांबळे व रोहित विष्णू क्षीरसागर (वय २२, रा. येळवट पाटी, किल्लारी, ता. औसा) यांना अटक करण्यात आली. पुढील कार्यवाहीसाठी आरोपींना शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे, पोलीस अंमलदार माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, तुराब पठाण, राजेश कंचे, गणेश साठे, प्रदीप स्वामी, पुट्ठेवाड, नकुल पाटील यांनी ही सेवा बजावली.

## वीरशैव लिंगायत समाजाचे प्रश्न सोडवा

### खासदार डॉ. काळगेंच्या हस्ते पालिका आयुक्तांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -** गेल्या अनेक महिन्यांपासून वीरशैव लिंगायत समाजाचे प्रश्न प्रलंबित आहेत. या प्रश्नांची सोडवणूक करण्यात यावी, याबाबतचे निवेदन माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या उपस्थितीत समाजबांधवांच्यावतीने खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांच्या हस्ते महापालिका आयुक्तांना देण्यात आले.

शहरातील महात्मा बसवेश्वरांच्या पुतळा परिसराची दूरवस्था झाली आहे, ढासळलेली संरक्षक भिंतीचे तत्काळ नवीन बांधकाम करावे, पुतळा परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे, शहरातील कन्हेरी येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीसाठी वीस वर्षांपूर्वी खरेदी केलेली जागा अद्यापही समाजाच्या ताब्यात देण्यात आली नाही. याबाबत सर्व प्रक्रिया पूर्ण करून लवकरात लवकर ती जागा समाजबांधवांच्या अंत्यविधीसाठी उपलब्ध करून देण्यात यावी तसेच आर्वी येथे असलेल्या वीरशैव लिंगायत स्मशानभूमीपर्यंत जाण्यासाठी रस्ता व्यवस्थित करून द्यावा व या स्मशानभूमी भोवतालची कंपाऊंड वॉल नव्याने बांधण्यात यावी या मागण्यांबाबत बसवजयंतीपर्यंत गांभीर्याने पूर्तता करावी अन्यथा समाज बांधवांना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा निवेदनाद्वारे आयुक्तांना देण्यात आला.

शिष्टमंडळाने खासदार डॉ. काळगे यांच्या हस्ते आयुक्तांना निवेदन दिले. यावेळी शहराचे आमदार अमित देशमुख हे उपस्थित होते. वीरशैव लिंगायत समाजबांधवांचे सर्व प्रश्न तत्काळ मार्गी लावावेत, अशी सूचना आमदार देशमुख यांनी महापालिका प्रशासनाला दिल्या.

प्रारंभी बसवंतप्पा भरडे यांनी शहरातील समाजाच्या वाढत्या संख्येमुळे अंत्यविधीसाठी अडचण येत असल्याचे सांगत महात्मा बसवेश्वरांच्या पुतळा परिसराच्या झालेल्या दूरवस्थेमुळे समाजबांधवांत तीव्र असंतोष निर्माण झाल्याचे उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

या शिष्टमंडळात ॲड. जी. एन. हामने, बाबूप्पा सोलापुरे, रामलिंग ठेसे, वीरभद्र वाले, व्यंकटराव अक्कानवरू, दगडूप्पा मिटकरी, भालचंद्र मानकरी, प्रा. मन्मथ पंचाक्षरी, विजय चितकोटे आदी समाजबांधव सहभागी होते.

## पाणी शुध्दीकरणासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाची मदत घ्यावी : देशमुख



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -** शहरात नळाद्वारे गढूळ आणि पिवळे पाणी वितरित होत असल्याच्या नागरिकांकडून येत असलेल्या तक्रारीची दखल घेऊन माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी बुधवारी सकाळी खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्यासह महापालिकेत आढावा बैठक घेतली. अद्ययावत तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञांची मदत घेऊन पाण्याचे योग्य पध्दतीने शुध्दीकरण करून पाणीपुरवठा करावा, अशा सूचना माजी मंत्री आमदार देशमुख यांनी केल्या.

प्रारंभी आमदार अमित देशमुख यांनी धरणातील पाण्याची उपलब्धता, पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक यासंदर्भात माहिती घेतली. पिवळे पाणी वितरित होण्याबाबतच्या कारणांची माहिती जाणून घेतली, धरणातील पाणी शेतीसाठी कॅनॉलद्वारे सोडल्यानंतर पाण्यात मोठ्या हालचाली होऊन, शेवाळे वरच्या बाजूला येतात. या शेवाळ्यांचा तीव्र उन्हाशी संपर्क आल्यानंतर, शेवाळ्याचा रंग पाण्यात उतरत असल्याचे बैठकीदरम्यान सांगण्यात आले. पाण्याचा रंग पिवळा पडत असला तरी ते पिण्यास योग्य असल्याचा खुलासाही महापालिका प्रशासनाकडून यावेळी करण्यात आला.

नळाला गढूळ आणि पिवळे पाणी येणे ही गंभीर बाब आहे, त्यात तातडीने सुधारणा करावी, आवश्यक त्या तंत्रज्ञानाची उपलब्धता करावी. कोणत्याही परिस्थितीत यापुढे असे पाणी वितरित होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना आमदार देशमुख यांनी संबंधितांना दिल्या. पिवळे असलेले पाणी पिण्यास योग्य आहे, असा महापालिका अधिकाऱ्यांचा दावा असला तरी, नागरिक हे पाणी पिण्यास धजावत नाहीत. त्यामुळे सर्व प्रकारच्या उपयोजना करून स्वच्छ पाणीपुरवठा करावा, असे निर्देश आमदार देशमुख यांनी यावेळी दिले. या बैठकीस आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, पाणीपुरवठा विभागाचे शहर अभियंता विजयकुमार चव्हाण, मुख्य लेखापरीक्षक कांचन तावडे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगाने, जनसंपर्क अधिकारी रुक्मानंद वडगावे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क विकसित करावे

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क विकासाचा सर्वंकष आराखडा तयार करण्याच्या यापूर्वीच सूचना दिल्या आहेत. हा आराखडा त्वरित तयार करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य दिव्य पुतळा बनवण्याची जबाबदारी महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्याकडे सोपवावी. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याशेजारी उभारावा, हुतात्मा स्मारक, मराठवाडा मुक्तिसंग्राम स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज वाचनालय या सर्व आवश्यक सोयी सुविधांसह हा विकास आराखडा तयार करावा व त्याची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करावी, अशी सूचनाही आमदार अमित देशमुख यांनी केली.

## बेवारस वाहनांमुळे होणारी समस्या दूर पोलीस ठाणे घेत आहेत मोकळा श्वास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ एप्रिल -** जिल्ह्यातील पोलीस ठाण्यातील ८३८ वाहनापैकी ३६४ वाहने मूळ मालकास परत तर ४७४ वाहनांचा लिलाव करण्यात आला असून तब्बल १७ लाख ३७ हजार रुपयांचा महसूल शासनास जमा करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, लातूर जिल्ह्यातील पोलिस ठाण्यात विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेली, तसेच बेवारस वाहनाचा खच अनेक वर्षापासून पोलिस ठाण्यात साचला होता. विविध गुन्ह्यांतील कारवाई दरम्यान वाहने जप्त करण्यात आली होती. वाहनांच्या मालकी हक्क अथवा घेऊन जाण्याबाबत कोणी संपर्क साधला नसल्याने अनेक वाहने पोलिस ठाण्याच्या आवारात बेवारस स्थितीत पडून होती अशा वाहनांची अक्षरशः दाटी झाली होती.

महाराष्ट्र शासनाच्या शंभर दिवसाच्या कृती आराखडा सात कलमी कार्यक्रम अंतर्गत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी पोलीस ठाण्यात बेवारसरीत्या पडून असलेल्या ८३८ वाहनाच्या मालकांचा शोध घेऊन त्यांना ते परत देण्याचे व मालकी हक्क सिद्ध न झालेल्या बेवारस वाहनांचा लिलाव करण्यासंदर्भात पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन व सूचना केले होते.

लातूर जिल्ह्यातील २३ पोलीस ठाणे अंतर्गत एकूण ८३८ वाहने त्या त्या पोलीस स्टेशनला पडून होती. संबंधित पोलीस ठाणे कडून या वाहनांच्या मालकी हक्काबाबत पोलिस विभागाने प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे संपर्क साधून वाहनचालकांचे नाव आणि पत्ता मिळवीत १२१ वाहने मूळ मालकास परत केली असून विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केलेले २४३ वाहने न्यायालयाच्या आदेशान्वये मूळ मालकास परत करण्यात आली आहे. तर मालकी हक्क सिद्ध न करता आलेले ४७४ बेवारस वाहनांचा लिलाव करण्यात आला. सदरची लिलाव प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे तालुका तहसीलदार व कमिटी यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशनला पार पडली. ४७४ वाहनाच्या लिलावांमधून १७ लाख ३७ हजार ४०० रुपये जमा झाले असून ते शासनास जमा करण्यात आले आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सुनील तटकरे यांनी घेतले श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१७ एप्रिल -

महाराष्ट्र राज्याचे माजी जलसंपदा मंत्री व रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी दि.१७ एप्रिल रोजी सकाळी सहकुटुंब कुलस्वामिनी श्री. तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. तटकरे कुटुंबीयांनी श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन देवींची ओटी भरत कुलधर्म कुलाचार केले.

यावेळी तटकरे कुटुंबीयांनी देवींची आरती केली. खा. सुनील तटकरे हे कुटुंबीयांसह खास हेलिकॉप्टरने श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनाकरिता आले होते. मंदिर संस्थानच्या वतीने तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) अरविंद बोळंगे यांनी श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा, कवड्याची माळ व महावस्त्र भेट देऊन सुनील तटकरे यांचा सत्कार केला. आमदार अनिकेत तटकरे यांचाही मंदिर संस्थानच्या वतीने सन्मान करण्यात आला.



यावेळी गोकुळ शिंदे, महेश चोपदार, प्रशांत जाधव, गणेश निर्वळ, विक्रम कदम, दीपक शेळके व कर्मचारी उपस्थित होते.



## धाराशिव परिसरातील अनधिकृत ढाबे, हॉटेल्समधून अवैध मद्यविक्री

### बार चालकांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१७ एप्रिल -

जिल्ह्यातील ढाबे व हॉटेलमधून अनाधिकृतपणे होणारी मद्य विक्री तसेच वाईन शॉप व बिअर शॉपी मधून अवैध मद्य विक्री करणाऱ्यांवर कायमस्वरूपी कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी धाराशिव जिल्हा परमिट रूम असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. त्याचबरोबर परमिट रूम चालकांवर होत असलेला अन्याय दूर करावा अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यात परमिट रूम अनुज्ञप्ती नूतनीकरण फी १५ टक्क्याने वाढवल्यामुळे आणि शासनाने १०% व्हॅट वाढविल्याने याला कंटाळून २० ते २५ अनुज्ञप्ती धारकांनी नुतनीकरण केलेले नाही. तरी ही बाब शासनाला न परवडणारी आहे.

शासनाचा महसुल देखील मोठ्या प्रमाणात बुडणार आहे. परमिट रूम व्यवसाय धारकाच्या व्यवसायामध्ये बऱ्याच अडचणी निर्माण झालेल्या आहेत. यामुळे परमिटरूम व बिअरबार मधील मद्य विक्रीची बऱ्याच प्रमाणात घट झालेली आहे.



सध्या धाराशिव शहरात व जिल्ह्यात अनेक विनापरवाना अनाधिकृत ढाबे व हॉटेल्स आहेत. या ढाबे, विना परवाना हॉटेल्स, हातगाडे चालकांकडून अनाधिकृतपणे सर्रास मद्यविक्री केली जाते तरी त्यांच्यावर कसलेही गुन्हे दाखल केले जात नाहीत. केवळ किरकोळ स्वरूपाचे गुन्हे दाखल करुन त्यांना सोडले जाते. त्यामुळे अनुज्ञप्तीधारकावर हा अन्यायच आहे.

तरी त्यांच्यावर कलम ६८/८४ नुसार जागा मालक, ढाबा चालक यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करावे. दोन गुन्ह्यापेक्षा जास्त गुन्हे असणाऱ्या व्यक्तींना हद्दपार करण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

निवेदनावर संपतराव डोके, राजेंद्र आवटे, धर्मराज सुर्यवंशी, बाळासाहेब लाकाळ, सुभाष शेट्टी, दयानंद नलावडे, कुमेश पवार, सोमलिंग खरे, नवनाथ भोसले, योगेश जाधव, सुनील सुर्यवंशी, सुहास पाटील, दत्तात्रय सुर्यवंशी, राजाभाऊ सुर्यवंशी, ज्ञानेश्वर घोगरे आदींची स्वाक्षरी आहे.

### बाबासाहेबांना अभिवादन...



#### नारायण सावंत यांचे एमबीबीएस परीक्षेत यश

इटकळ, दि.१७ एप्रिल -

तुळजापूर तालुक्यातील उमरगा (चि.) येथील शेतकरी विजयकुमार सावंत यांचे चिरंजीव नारायण सावंत यांनी पुणे येथील बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन डॉक्टर पदवी प्राप्त केल्याने त्यांचे गाव परिसरातून कौतुक केले जात आहे. डॉ. नारायण विजय सावंत हे तुळजापूर तालुक्यातील उमरगा चि. येथील रहिवासी असून त्यांनी इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत शिक्षण हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरगा चि. येथे पूर्ण केले. २०२५ मध्ये झालेल्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेची परीक्षा देऊन त्याने प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला. डॉ. नारायण विजयकुमार सावंत यांनी डॉक्टर ही पदवी मिळवल्याने गाव परिसरातून कौतुक करीत अभिनंदन केले जात आहे.




#### पाच विद्यार्थी राष्ट्रीय सुवर्ण बाण प्राप्त

तुळजापूर, दि.१७ एप्रिल -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चव्हाणवाडी येथील पाच विद्यार्थी राष्ट्रीय सुवर्ण बान परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थी यांचा सन्मान करण्यात आला. बीटस्तरीय सावित्री ज्योतिबा फुले शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा २०२४-२५ च्या कार्यक्रमात प्रमाणपत्र, शाल व गुच्छ देऊन कार्तिक ढगे, सार्थक चव्हाण, आशुतोष चव्हाण, समर्थ सुरडे, शिवराज चव्हाण मार्गदर्शक शिक्षक कब मास्टर सुखदेव भालेकर, भोयटे बलभीम यांचा प्राथमिक शिक्षणाधिकारी सन्मान अशोक पाटील, गटशिक्षण अधिकारी सन्मान अर्जुन जाधव यांच्या उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी प्रा.डॉ कळलावे, प्रा. अंजली सुर्यवंशी, संचालिका महानंदा माने, विस्तार अधिकारी जंगम, मल्लिनाथ काळे, मल्हारी माने, तात्यासाहेब माळी, चेअरमन सुर्यवंशी, लालासाहेब मगर आदी उपस्थित होते.

#### वडजे यांची पोलीस डिस्ट्रिक्ट क्लर्कपदी निवड

इटकळ, दि.१७ एप्रिल -

तुळजापुर तालुक्यातील मडमरगा चि. येथील सुपुत्र सागर बाळकृष्ण वडजे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत उज्वल यश संपादन करीत डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस डिस्ट्रिक्ट क्लर्क पदी मजल मारली. घरची परिस्थिती अगदी हलाखीची पण स्वतःच्या बुद्धीमत्तेवर विश्वास ठेवत जिद्द बाळगली कशाची ही पर्वा न करता अभ्यासात लक्ष केंद्रित केले आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत सर्व सामान्य कुटुंबातील सागर बाळकृष्ण वडजे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उज्वल यश संपादन केले. ध्येय साध्य करीत डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस डिस्ट्रिक्ट क्लर्क पदी गवसणी घातली.सागर यांनी मिळविलेल्या या यशा बद्दल गाव परिसरातून कौतुक करीत अभिनंदन केले जात आहे.



## कष्ट करणाऱ्यांना समाजात आदराचे स्थान मिळावे : उमाकांत कुलकर्णी



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१७ एप्रिल -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी श्रमाला अत्यंत महत्व दिले. श्रम म्हणजे केवळ शारीरिक काम नसून सामाजिक विकासाचे महत्वाचे साधन आहे. त्यामुळे कष्ट करणाऱ्यांना समाजात नेहमीच आदराचे स्थान मिळाले पाहिजे, असे मत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

शिक्षक परिषद महिला आघाडीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सफाई कामगार महिलांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका गटशिक्षणाधिकारी असरार सय्यद होते. याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी बापू शिंदे, माजी केंद्रप्रमुख अनुरथ नागटिळक, महिला आघाडीच्या पदाधिकारी पल्लवी गोरे, शुभांगी पाटील, सारिका चंदनशिवे, सीमा धस, नंदिनी सूर्यवंशी, विद्या घुले, संतोष पोतदार, नवनाथ गुरमे, अशोक शेजाळ, सिकंदर सुकाळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी असरार सय्यद यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करत महिला आघाडीच्या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. शहरात दररोज रस्ते साफसफाईचे काम करणाऱ्या देवई पेठे, सत्यभामा धावारे, उषा गायकवाड, शितल आगळे, सुषमा रसाळ, मुद्रका सरवदे, वत्सला क्षीरसागर, सुनिता रसाळ, शितल रणदिवे, वृंदावना रसाळ या महिलांचा पैठणी साडी, ब्लाऊज पीस, शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी रुपाली वेदपाठक, रेखा शिंदे, सुनिता नाडे, मीरा ढोले, शिवकन्या शेळके, मंगल वनवे, उज्वला शिंदे, संजीवनी इंगळे, प्रमिला पडुळकर, प्राजक्ता जठार, रेखा जेवळीकर, वंदना जाधव, वैशाली माळी, संजीवनी सरवदे, वैशाली आडसुळ, महानंदा पांचाळ, नंदिनी मस्तुद, हेमलता सुत्राबे, ललिता लोमटे, पुजा गुरव, चिलवार, स्मिता नवले, रमेश गटकळ, सुनिल काळे, शरद करडे, सुरेश गायकवाड, रुपेश जावळे, हरी शेके आदींनी परिश्रम घेतले.

## विश्व कदम याची तुळजाभवानी सैनिक स्कूलला निवड



तभा वृत्तसेवा
जळकोट, दि.१७ एप्रिल -

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी विश्व नारायण कदम (इ.५ वी) याची श्री. तुळजाभवानी सैनिकी विद्यालय, तुळजापूर येथे इयत्ता सहावीसाठी परीक्षेमधून निवड झाली आहे.

त्यानिमित्त विश्व कदम याचा शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वीरभद्र पिसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पालक शितल कदम शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप तरमोडे शाळेतील शिक्षक संतोष सारणे, पुष्पलता कांबळे, जयराम शिंदे, समाधान पवार, वैष्णवी कदम हे उपस्थित होते. विश्व कदम याचे शिक्षकवृंद व गावकरी यांनी अभिनंदन केले आहे.

## युवा ग्राम विकास मंडळाच्या असुरक्षित कुटुंबांच्या सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१७ एप्रिल -



धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यातील ९६ गावांमध्ये असुरक्षित आणि जोखमीच्या कुटुंबांचा सर्वेक्षण कार्य सुरू आहे. युवा ग्राम विकास मंडळ गेल्या २ महिन्यांपासून या सर्वेक्षणाच्या कामाचे उद्दिष्ट असुरक्षित कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे आहे.

युवा ग्राम विकास मंडळ, जस्ट राईट्स फॉर चिल्ड्रेन आणि नीति आयोग-एवीए यांच्या सहयोगाने बाल संरक्षणाच्या उपक्रमात एक महत्वाचा पाऊल उचलले आहे. नीति आयोग आणि एवीएने देशभरातील सर्वात दुर्बल भागांमध्ये लहान मुलांचे शिक्षण, सशक्तिकरण व संरक्षण यावर लक्ष केंद्रित करण्यास सहकार्य केले आहे आणि या उपक्रमांतर्गत १०४ ब्लॉक्समध्ये १५,००० गावांना 'बाल विवाहमुक्त' घोषित करण्याचा संकल्प केला आहे. युवा ग्राम विकास मंडळाचे संचालक एच पी देशमुख म्हणाले, आम्ही धाराशिव जिल्ह्यात बाल विवाहाच्या विरोधातील प्रयत्न सुरू ठेवणार आहोत.

युवा ग्राम विकास मंडळाच्या या उपक्रमामध्ये एच.पी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सारिका अंधारे, सारिका लांडगे, अश्विनी देवकर, रुपाली शिंदे, कविता घोगरे, पुष्पा सावंत, शहाजी ढोरे, बाळू पवार, सारिका सोळुंके, निकिता इंगळे यांनी अहम भूमिका बजावली आहे. तसेच, संतोष रेपे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून सर्वेक्षण काम पारदर्शक व अचूक होण्यासाठी मदत केली आहे.

## आरळी ग्रामदैवत ख्वाजा बंदेनवाज उरुसास प्रारंभ


### सर्वधर्म समभाव जपणाऱ्या यात्रेला १०० वर्षांपेक्षा जास्त वर्षांची परंपरा...

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१७ एप्रिल -

गाव म्हटलं की ग्रामदैवत आलंच, तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रूकच्या ख्वाजा बंदेनवाजची यात्रेला जवळपास १०० वर्षांपेक्षा जास्त वर्षांची परंपरा आहे. मुळात हिंदू बहुसंख्य असलेल्या आरळी गावात मुस्लिम ग्रामदैवताची यात्रा सर्व धर्मातील लोक उत्साहाने साजरे करतात.

तंत्रज्ञाचा विकास होण्यापूर्वी गावखेडी संस्कृती व परंपरा यांनी समृद्ध होती. उन्हाळ्यात खळेदळे झाले की ग्रामदैवतांची यात्रा साजऱ्या केल्या जायच्या. यात्रा साजऱ्या होण्यामागचा उद्देश हाच होता की माणसं एकत्र यायची, कामामधून वेळ भेटायचा, यात्रेनिमित्त सासुरवाशीण असणाऱ्या लेकीबाळी आपापल्या माहेरी यायच्या, माणस आपली सुख-दुख एकमेकांसोबत वाटायची. यात्रेनिमित्त गावामध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजनदेखील होत असायचे.

आरळी (बु) गावाला फकीर नसल्यामुळे त्या काळात बंदेनवाजाच्या फकिरीचा मान चिंचोली गावातील फकीर यांना मिळाला.



गावातील जुन्या जाणकाऱ्यांच्या चर्चेतून यात्रेबद्दल अनेक गोष्टी समजल्या पूर्वी गावामध्ये यात्रा असली की, कुस्त्या, भाकरीवरील तमाशा इत्यादी असायचे पुढे तंत्रज्ञान विकसित झाल त्याप्रमाणे गावात पडद्यावरील चित्रपट दाखवला जायचे.


गावची सध्याची ग्रामपंचायत जिथे आहे तिच्या पाठीमागील मोकळ्या शेतात शोभेचे दारूकाम केल जायच फटाक्यांची आतषबाजी केली जाते.

आजही प्रतिवर्षी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे यात्रा कमिटीच्या माध्यमातून आयोजन केले जाते.

आरळी बुद्रुक गावचे ग्रामदैवत ख्वाजा बंदेनवाज यात्रेची सुरुवात संदलने सुरू होते आज देखील ही परंपरा कायम आहे. आताही आरळीतील ग्रामस्थ उत्साहाने यात्रा साजरी करतात, गावात असणारी सर्वधर्म समभावाची परंपरा गावातील जुन्या पिढीकडून मिळालेला वारसा नवी पिढी नक्की जपेल भविष्यातही ग्रामदैवत ख्वाजा बंदेनवाज यात्रा आणखी उत्साहात साजरी केली जाईल.

## धाराशिव जिल्ह्यात प्रथमच फुलवली सफरचंदाची यशस्वीरित्या शेती

### तुळजापुरात सफरचंदाच्या शेतीचा अनोखा प्रयोग... तुळजापुरात पिकतंय काश्मिरी सफरचंद... सेंद्रिय खताचा वापर करून लागवड...



तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१७ एप्रिल -

थंड हवेच्या ठिकाणी म्हणजे काश्मीर हिमाचल प्रदेशातील प्रमुख पीक म्हणून ओळखणारे सफरचंदाची लागवड तुळजापूर सारख्या उष्ण तापमानाच्या शहरात करून अनोखा प्रयोग यशस्वीरित्या सफल केला आहे.

कमी तापमानात येणारे सफरचंद फळाची धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात प्रथमच उष्ण तापमानात देखील यशस्वीरित्या प्रयोग करून सेंद्रिय खतांच्या सहाय्याने ७० सफरचंद झाडाची यशस्वीरित्या बाग फुलवली आहे. येथील माजी नगराध्यक्ष तथा प्रगतशील शेतकरी बाळासाहेब शिंदे यांनी सिंदफळ शिवारात २१ एकर शेतामध्ये डोंगर माळरान ट्रॅक्टर आणि जेसीबीच्या साह्याने व्यवस्थित करून दहा एकर केशर आंब्याची सेंद्रिय खताचा वापर करून कमी पाण्यामध्ये ठिबकद्वारे माळरानावर बाग फुलवली आहे. ज्या शेतामध्ये डोंगराळ भागामुळे कुठलेही उत्पन्न घेता येत नाही तेथे विविध फळझाडे लावून हिरवीगार फळबाग यशस्वीरित्या फुलवून इतर शेतकऱ्यांसाठी आदर्श निर्माण केला आहे. आंब्याच्या झाडांसोबतच सिताफळ अंजीर आणि प्रथमच उष्ण तापमानात १०० सफरचंदाची झाडे लावली होती. त्यातील ७० झाडे यशस्वीरित्या जगण्यात त्यांना यश आले आहे शिंदे यांनी युट्युब गुगलच्या माध्यमातून सफरचंद शेतीची माहिती घेतली. हिमाचल प्रदेश मध्ये हरीमन सिंग यांनी ४२ अंश तापमानामध्ये सफरचंद झाडाचे यशस्वी प्रयोग केल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी नगरहून सफरचंदाचे रोपे आणून शंभर झाडांची लागवड केली. भविष्यात कमी तापमान करण्यासाठी नेट टाकून कमी तापमानाची वातावरण निर्मिती करून जास्तीत जास्त उत्पन्न काढण्याचे त्यांचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. सफरचंदाच्या एका झाडाला कमीत कमी ४० फळे येतात. दहा एकर मध्ये साधारण दीड ते दोन हजार केशर आंब्याच्या झाडाची त्यांनी लागवड केली आहे. संपूर्ण बागेमध्ये गर्भधारणेसाठी म्हणून दोन हापूस आंबा एक बदाम आंबा आणि दोन केळी आंबा आणि एक दोन गावरान आंब्याची झाडे देखील पाण्यामध्ये लावण्यात आली आहेत.

सफरचंदाच्या झाडासह संपूर्ण बागेस सेंद्रिय खत म्हणून २०० लिटर पाण्यामध्ये २५ किलो गाईचे शेण, पाच लिटर गोमूत्र, पाच लिटर शिळे ताक, दोन किलो काळा गुळ आणि दोन किलो गावरान हरभऱ्याचे बेसन पीठ हे सर्व मिश्रण एकत्रित करून आठ दिवस मुरवायचे आणि त्यानंतर प्रत्येक झाडाला पाच लिटरचा महिन्यातून एकदा या सेंद्रिय खताचा डोस द्यायचा याच्या व्यतिरिक्त कुठलेही रासायनिक खत त्यांनी वापरले नाहीत. कुठलीही शासकीय अनुदान स्कीम न घेता शिंदे यांनी ही बाग उभी केली आहे. भविष्यात संत्र्यांची बाग देखील करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे.

जिल्ह्याभरातून त्यांची बाग पाहण्यासाठी शेतकरी येत आहेत. तर पंचक्रोशीत सर्वत्र त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.

#### सेंद्रिय खताचा वापर करून शेती करा रासायनिक खताचा वापर करू नका

तरुणांनी इतर व्यवसायासोबतच शेतीला पूरक व्यवसाय म्हणून प्राधान्य द्यावे. आधुनिक तंत्रज्ञान वापरून पण रासायनिक खताचा वापर न करता सेंद्रिय खताचा वापर करून शेती करावी सुरुवातीला मोठा उपक्रम न राबवता एक एकर मध्ये सेंद्रिय खताचा वापर करावा. काळ्या आईची ओटी भरल्यानंतर नक्कीच सेंद्रिय खते वापर केल्यास शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी यश येईल. रासायनिक खताचा वापर न करता सेंद्रिय खताचा वापर करून शेतकरी कमी खर्चामध्ये शेती करू शकतात. रासायनिक खताचा वापर टाळा आणि सेंद्रिय खताचा वापर करूनच शेती करा.

**- बाळासाहेब शिंदे**
प्रगतशील शेतकरी, तुळजापूर

## लोहारा तालुक्यातील ४४ ग्रा.पं. च्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.१७ एप्रिल -

लोहारा तालुक्यातील एकूण ४४ ग्रामपंचायतीसाठी सरपंच पदासाठी चा आरक्षण सोडत कार्यक्रम उपजिल्हाधिकारी उदयसिंह भोसले (मांजरा प्रकल्प धाराशिव) यांच्या अध्यक्षतेखाली दि १६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता लोहारा पंचायत समिती सभागृहात संपन्न झाला.

यावेळी लहान मुलीच्या व मुलाच्या हस्ते चिठ्ठ्या काढुन आरक्षण काढण्यात आले. आरक्षण पुढीलप्रमाणे विलासपुर पांढरी (अनु.जाती महिला), चिंचोली रेबे (अनु.जाती महिला), हराळी (अनु.जाती महिला), दक्षिण जेवळी (अनु.जाती), जेवळी (अनु जाती), फणेपूर (अनु.जाती), वडगाव वाडी (अनु.जाती), लोहारा खुर्द (ना.मा.प्र.महिला), तोरंबा (ना.मा.प्र.महिला), आष्टा का (ना.मा.प्र.महिला), हिप्परगा (रवा) (ना.मा.प्र.महिला), धानुरी (ना.मा. प्र.महिला), कानेगाव (ना.मा.प्र. महिला), नागूर (ना.मा.प्र.), कास्ती बु. (ना.मा.प्र.), माळेगाव (ना.मा.प्र.), हिप्परगा सय्यद (ना. मा.प्र.), वडगाव गांजा (ना.मा.प्र.),मुर्शदपुर(ना.मा.प्र.), करजगाव, उंडरगांव, कोंडजीगड, मोघा बु., नागराळ, बेंडकाळ (सर्वसाधारण महिला), भातागळी (सर्वसाधारण महिला), कास्ती खुर्द (सर्वसाधारण महिला), मार्डी (सर्वसाधारण महिला), भोसगा (सर्वसाधारण महिला), तावशीगड (सर्वसाधारण महिला), बेलवाडी (सर्वसाधारण महिला), उदतपुर (सर्वसाधारण महिला), कोंडजीगड (सर्वसाधारण महिला), खेड (सर्वसाधारण), राजेगाव, अचलेर, दस्तापुर, सास्तुर, होळी, चिंचोली काटे सालेगाव (सर्वसाधारण), आरणी (सर्वसाधारण), करवंजी (सर्वसाधारण), माकणी (सर्वसाधारण), असे सरपंच पदाचे आरक्षण काढण्यात आले.